"देवगड महाविद्यालयाला
आणि
माननीय बॅ. अंतुलेसाहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
आणि
ना. एस. एन. देसाई, सहकार राज्यमंत्री
यांचे आगमनास
आमच्या हार्दिक शुभेच्छा"

卐

**मुख्य कार्यालय**
मु. पो. मोंड
ता० देवगड
जि. रत्नागिरी

**कोंकण मँगोदलाल असोशिएशन**
महात्मा ज्योतिबा फुले मंडई
मुंबई ४०० ००१

मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई ४०० ००४.



**श्री. जगन्नाथ तथा भाऊ पारकर**

भाऊंचा सर्वांनाच आधार असतो. तसा देवगड महाविद्यालयास मिळाला.



**सौ. निराबाई जगन्नाथ पारकर**

२३ एकर जागा कॉलेजसाठी मोफत देणारी व्यक्ती. आज देवगडमध्ये या जागेची किंमत ४ लाखांपेक्षा जास्त होईल.

"ईश्वरी प्रेरणेने स्थापन झालेल्या देवगड महाविद्यालयाला सुरुवातीसच शुभशकुन झाला तो सौ. निराबाई जगन्नाथ पारकर आणि श्री. जगन्नाथभाऊ पारकर यांनी महाविद्यालयासाठी विनाअट दिलेल्या २३ एकर जमिनीच्या दानाचा!"

या प्रित्यर्थ या महाविद्यालयाच्या परिसराचे नाव—

## "सौ० निराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी"


असे करण्यात येत आहे.

# रसराज

१९८२•८३



## ॥ आमचा आधार - वट ॥



मान. श्री. शां. कृ. तथा बापूसाहेब पंतवालावलकर
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड.

WITH BEST COMPLIMENTS FROM

PRINCIPAL
DEVGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE
DEVGAD, Dist : Sindhudurg

PDF Reducer Demo

शिक्षण विकास मंडळ या संस्थेचे
कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

# 'रसराज' वार्षिक

१९८२-८३
अंक तिसरा

**संपादक मंडळ**
प्राचार्य आर. ए. कुलकर्णी / अध्यक्ष
प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर / कार्यकारी संपादक

**विभागीय संपादक**
प्रा. अविनाश वि. कांबळे / कथा व काव्य विभाग
प्रा. लता वळसंगकर / लेख व इतर विभाग

**संपादन सहाय्य**
सतीश कोयंडे
एम्. आर. खान
सुशील राणे
सदानंद देसाई

**प्रकाशक**
प्राचार्य आर. ए. कुलकर्णी

**मुद्रक :**
कल्याण सहकारी मुद्रणालय,
देवगड (सिंधुदुर्ग)

**मुखपृष्ठ व ब्लॉक मेकर :**
भास अॅडव्हर्टाइझिंग, कोल्हापूर



## देवगड कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

# स्थानिक नियामक समिती

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. वसंतराव साटम | अध्यक्ष |
| २ | ,, अमृतराव राणे | सदस्य |
| ३ | ,, प. रा. जोशी | ,, |
| ४ | ,, मुरलीधर जोशी | ,, |
| ५ | ,, गु. शां. शिरसाट | ,, |
| ६ | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ७ | प्रा. ल. दा. गोलतकर | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८ | प्रा. डी. सेल्व्हराज | ,, |
| ९ | श्री. एस्. एस्. पाटील | कर्मचारी प्रतिनिधी |

# देवगड महाविद्यालय विद्यार्थी महामंडळ १९८२-८३

| | | |
|---|---|---|
| १ | जनरल सेक्रेटरी व विद्यापीठ प्रतिनिधी | एम्. आर्. खान |
| २ | विद्यार्थिनी प्रतिनिधी (एल्. आर.) | सीमा गानू |
| ३ | क्रीडा विभाग (जिमखाना) | संजय कदम |
| ४ | स्नेहसंमेलन | श्रीकांत धुपकर |
| ५ | 'रसराज' भित्तिपत्र | सतीश कोयंडे |
| ६ | सहल | एन्. एस्. शेख |
| ७ | वादविवाद मंडळ | तुळशीदास डामरी |
| ८ | अभ्यास मंडळ | अंकुश आचरेकर |
| ९ | प्रसिद्धी विभाग | अविनाश सावंत |
| १० | सजावट | उदय दांडेकर व सुधाकर कदम |



## ॥ अंतरंग ॥

मुखपृष्ठ व ब्लॉक मेकर–
मास अ‍ॅडव्हर्टाइझिंग, कोल्हापूर
छायाचित्रे–
नवयुग फोटो स्टुडिओ, देवगड
संपादकीय–
प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर /३
पाच कथा–
उध्वस्त / संजीवकुमार कुलकर्णी/७
ज्ञानेश्वर माऊली / रमेश मालंडकर / १३
बेवारशी / नथुराम उपरकर / १५
लव्ह इज ब्लाईंड / एम्. आर. खान / १९
पराजित / सतीश कोयंडे / २५
रसगंध–
माधुरी धुपकर / निळ्या नभातून / २७
आशा गोखले / इच्छा / २७
शिवप्रसाद पेडणेकर / मी...तू... / २८
विनोद मेस्त्री / स्वप्न / २८
सुनंदा भांडारी / इशारा / २८
अलका हर्डीकर / निसर्ग आणि माणसे /२८
अलका बापट / आर्जव / २९
संतोष बांदेकर / का ? / २९
प्रकाश मराठे / वेडा मुसाफिर / ३०
चित्ररेखा पाटणकर / रातराणी / ३०
चित्ररेखा पाटणकर / पण / ३१
नथुराम उपरकर / तुझाच / ३१
राजेंद्र हिंदळेकर / पांथस्थ / ३१



## ॥ संपादकीय ॥

रसिकराज हो,

... वनदेवी नटली ही वसंतासी रमवाया नव बहर येई लतिकांना, कुसुमांना, कलिकांना.... ऋतुराज वसंत चोरट्या पावलांनी अवतीर्ण होत असताना ' रसराज '-च्या छापील अंकाचे आगमन होत आहे. हा जणू विद्यार्थ्यांच्या साहित्यिक गुणांना आलेला 'वसंतबहरच' होय ! विकसित होणाऱ्या पुष्पांचा हा भावसुगंध रसिकांच्या मनाला आनंद देईल, अशी आशा बाळगतो. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करण्याचा हा उपक्रम आहे. हा अंक साकार करण्यासाठी आवश्यक अशा स्वावलंबन आणि परिश्रम या दोन मुल्यांची जोपासना अशाप्रकारच्या उपक्रमातूनच होत असते. प्रस्तुतचा अंक त्याचाच आदर्श ठरावा.

महाविद्यालयीन शिक्षणामध्यें पाठ्यपुस्तकांचा सहभाग महत्त्वाचा असतोच. परंतु या शिक्षणाचे प्रमुख ध्येय विद्यार्थ्यांची मने संस्कारक्षम आणि सुसंस्कृत बनविणे हे असते. लोकशाहीचे तत्वज्ञान आणि त्यासाठीं लागणाऱ्या उदात्त मुल्यांची जोपासना विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्षरीत्या व्हावी यासाठीं विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाची महाविद्यालयीन निवडणुकीद्वारें दरवर्षी स्थापना होते. विविध प्रकारचे उपक्रम या विद्यार्थी प्रतिनिधीं मंडळाकडून साकारले जातात. त्यांपैकीच ' रसराज ' भित्तिपत्रक हा एक उपक्रम होय. त्या भित्तिपत्रकाचाच हा वार्षिक अंक छापील स्वरुपात आपणांपुढे सादर होत आहे.

या अंकात असणारे साहित्य आमच्या महाविद्यालया-तील उदयोन्मुख लेखक–कवींनी निर्मिले असल्याने त्याला दर्जेदार साहित्याच्या कसोटया न लावता

विलास राणे / स्मृती / ३२
प्रकाश सरवणकर / निद्रिस्त ज्वालामुखी / ३२
प्रकाश सरवणकर / का ? / ३३
श्रीकांत गावकर / तारुण्य / ३३

**तीन व्यक्ती – तीन प्रतिक्रिया–**

अलका हर्डीकर / आठवणी दाटतात / ३५
सुनंदा भांडारी / नव्या पहाटेची चाहूल /३९
माधुरी धुपकर / तयाचा वेलू नेला / ४३

**लेख : ललित / वैचारिक–**

विजय खवळे / माझे शिवमनोगत / ४७
अरुण दांडेकर / निसर्गाचा सौंदर्यसोहळा / ४९
विलास राणे / विद्यार्थी आणि राष्ट्रीयत्व / ५३
अलका हर्डीकर / कवी अनिल आणि त्यांची काव्यसंपदा /५५

**राष्ट्रीय सेवा योजना–**

अलका हर्डीकर / राष्ट्रीय सेवा योजना– एक सामाजिक गरज / ६१
श्रीकांत धुपकर / विजयदुर्ग– एक अविस्मरणीय शिबिर / ६३

**वाटचाल–**

वर्षभरातील घडामोडी / ६७
स्नेहसंमेलन / ६९
ग्रंथालय / ७१
'रसराज' भित्तिपत्रक / ७१
सहल विभाग / ७३
राष्ट्रीय सेवा योजना / ७३
क्रीडा विभाग (जिमखाना) / ७७
निवडणूक / ७७

वाचकांच्या मनोरंजनाचा आणि उद्‌बोधनाचा अल्पसा प्रयत्न आहे; अशा दृष्टिकोनातून वाचकांनी त्याकडे पहावे.

ह्या अंक साकार करताना ह्या सांघिक कार्याला ज्यांनी बहुमोल सहकार्य केले, त्यांचीही नोंद घेणे आवश्यक आहे. आजपर्यंत प्राचार्य गोपाळराव मयेकरांच्या बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ झालेल्या आमच्या महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीत शिस्त, जिद्द आणि महत्त्वाकांक्षा निर्माण करण्यासाठी महाविद्यालयाचे नूतन प्राचार्य आर. ए. कुलकर्णी कटिबद्ध आहेत. एका विशिष्ट विश्वासाने त्यांनी माझ्यावर ही जबाबदारी सोपवली, वेळोवेळी मार्गदर्शन केले, मौलिक सूचनाही केल्या. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. प्रा. अविनाश वि. कांबळे व प्रा. लता नळसंगकर यांनी अंक साकार करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याला तर तोडच नाही. या अंकाचे मुखपृष्ठ व ब्लॉक्स् या बाबतीत कोल्हापूरच्या 'मास ॲडव्हर्टाइझिंग यांनी केलेले बहुमोल सहकार्य विसरता येणार नाही. या अंकाची छपाई, मांडणी व सजावट लक्षवेधक करून अंक देखणा करण्याची जबाबदारी देवगडच्या 'कल्याण सहकारी मुद्रणालया' तील व्यवस्थापक व कर्मचारीवर्गाने तत्परतेने व मोठ्या स्नेहाने उचलली व ती व्यवस्थितपणे पार पाडली, याबद्दल या सर्वांचे आभार मानतो. महाविद्यालयाच्या 'रसराज' च्या विद्यार्थी–संपादकांनी व इतर विद्यार्थ्यांनी जाहिराती मिळवून हा अंक सादर करणे सुलभ केले. त्याबद्दल त्यांचे आभार मानणे योग्य नसले, तरी कौतुक मात्र अवश्य करावे लागेल. त्यांनी गोळा केलेल्या जाहिरातींच्या उत्पन्नातूनच हा संपूर्ण अंक साकार होऊ शकला आहे. तसेच ज्यांनी महाविद्यालयावरील प्रेमामुळे जाहिराती देऊन सहकार्य केले, त्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद !

प्रस्तुत अंकात जे जे काही चांगले आहे त्याचे श्रेय या सर्व सहकारी मित्रांचे आहे व त्यातील उणिवांची जबाबदारी माझी. शेवटी संत ज्ञानेश्वरांच्या शब्दांत एवढेच म्हणावेसे वाटते–

इतर, पारितोषिके व शिष्यवृत्त्या /
**इतर किरकोळ—**
शुभदा जोशी / आजकालचे शब्दार्थ / ३७
जयंत साटम / विनोद / ४१
एस्. एस्. पाटील / टोपण नावे / ५७
प्राध्यापक विशेष / ६५

"जैसा स्वभावो मायेबापांचा ।
अपत्य बोले जऱ्ही बोवडिया वाचा ।
तऱ्ही अधिकाधिक तेयांचा । संतोखु चि आथि ॥
तऱ्ही न्यून तें । अधिक ही सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनविले मियां ॥"

**– प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर**
कार्यकारी संपादक, ' रसराज ' १९८२–८३

Statement about ownership & other particulars about the periodical

**RASRAJ**

Form IV (Rule 8)

| | | |
|---|---|---|
| 1) | Place of publication : | Devgad |
| 2) | Periodicity of its publication : | Yearly |
| 3) | Printer's Name : | J. P. Hadakar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Kalyan Sahakari Mudranalaya, Devgad, Dist : Sindhudurg |
| 4) | Publishers's Name : | Prin. R. A. Kulkarni |
| 5) | Nationality : | Indian |
| | Address : | Devgad College of Arts & Commerce |
| 6) | Editor's Name : | Prof. Purushottam Gothosakar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Devgad College of Arts & Commerce, Devgad |
| 7) | Ownership of Publication : | Devgad College of Arts & Commerce, Devgad |

I, R. A. Kulkarni, hereby declare that the perticulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd R. A. Kulkarni
Signalure of Publisher

प्रकाशक : प्राचार्य आर्. ए. कुलकर्णी, संपादक : प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर
मुद्रक : कल्याण सहकारी मुद्रणालय, देवगड (सिंधुदुर्ग)
या अंकातील लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच, असे नाही.
FOR PRIVATE CIRCULATION ONLY

# ॥ शुद्धिपत्रक ॥

| | चुकीची जागा | चूक | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १) | 'यांनी गोवर्धन तोलला !' या पानावरील पहिले छायाचित्र | श्री. वसतराव साटम | श्री. वसंतराव साटम |
| २) | 'रसगंध' विभागातील पान क्र. ३२ व ३३ वरील 'निद्रिस्त ज्वालामुखी' व 'का?' ह्या कविता | प्रकाश सारंग | प्रकाश सरवणकर |
| ३) | पान क्र. ४१ वरील 'विनोद' | जयत साटम | जयंत साटम |
| ४) | 'लेख : ललित / वैचारिक' या विभागातील पान क्र. ५५ वरील लेख | तृतीय वर्ष कला | द्वितीय वर्ष कला |


## सहकारितेची ३ मुख्य ध्येये

१) **स्वावलंबन :** स्वतःचे सामर्थ्यावर उन्नत्ती करून घेणे,

२) **काटकसर :** स्वतःची जमा व खर्च पाहून शिल्लक वाढवित जाणे.

३) **परस्पर सहाय्य :** संघटित प्रयत्नांची उन्नती करण्यासाठी, एकमेकांच्या कल्याणासाठी एकमेकांनी प्रामाणिक यत्न करणे.

# कल्याण

## सहकारी मुद्रणालय, देवगड

आपले लक्ष असू द्या–

छपाई कामाच्या गरजासाठी – आपल्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.

–: त्याचप्रमाणे :–

**सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांना लागणारी**

**स्टेशनरी तसेच इतर विविध प्रकारचे फॉर्म**

**शिवाय विविध डिझाईन्सच्या आकर्षक लग्नपत्रिका मिळतील.**

देवगड तालुक्यातील सहकारी प्रेस

इतर, पारितोषिके व शिष्यवृत्या /

**इतर किरकोळ–**

शुभदा जोशी / आजकालचे शद्बार्थ / ३७

जयंत साटम / विनोद / ४१

एस्. एस्. पाटील / टोपण नावे / ५७

प्राध्यापक विशेष / ६५

"जैसा स्वभावो मायेबापांचा ।
अपत्य बोले जऱ्ही बोवडिया वाचा ।
तऱ्हीं अधिकाधिक तेयांचा । संतोषु चि आथि ॥
तऱ्ही न्यून तें । अधिक ही सरतें ।
करूनि घेयावे हें तुमतें । विनविले मियां ॥"

– प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर
कार्यकारी संपादक, 'रसराज' १९८२–८३

Statement about ownership & other particulars about the periodical

**RASRAJ**

Form IV (Rule 8)

| | | |
|---|---|---|
| 1) | Place of publication : | Devgad |
| 2) | Periodicity of its publication : | Yearly |
| 3) | Printer's Name : | J. P. Hadakar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Kalyan Sahakari Mudranalaya, Devgad, Dist : Sindhudurg |
| 4) | Publishers's Name : | Prin. R. A. Kulkarni |
| 5) | Nationality : | Indian |
| | Address : | Devgad College of Arts & Commerce |
| 6) | Editor's Name : | Prof. Purushottam Gothosakar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Devgad College of Arts & Commerce, Devgad |
| 7) | Ownership of Publication : | Devgad College of Arts & Commerce, Devgad |

I, R. A. Kulkarni, hereby declare that the perticulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd R. A. Kulkarni
Signalure of Publisher

प्रकाशक : प्राचार्य आर्. ए. कुलकर्णी, संपादक : प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर

मुद्रक : कल्याण सहकारी मुद्रणालय, देवगड (सिंधुदुर्ग)

या अंकातील लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच, असे नाहीं.

FOR PRIVATE CIRCULATION ONLY

# शिक्षण विकास मंडळ, देवगड

## नियामक समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शां. कृ. पंतवालावलकर | अध्यक्ष |
| २) | ,, के. जे. ठाकूर | उपाध्यक्ष |
| ३) | ,, अर्जुनराव नलावडे | उपाध्यक्ष |
| ४) | ,, वसंतराव साटम | कार्यवाह |
| ५) | ,, आम. अमृतराव राणे | सहकार्यवाह |
| ६) | ,, मुरलीधर जोशी | सभापती नियामक समिती |
| ७) | ,, डॉ. अरुण खाडिलकर | कोषाध्यक्ष |
| ८) | ,, स. ज. पारकर | सभासद |
| ९) | ,, य. द. राणे | ,, |
| १०) | ,, ह. अ. नलावडे | ,, |
| ११) | ,, ल. य. कोयंडे | ,, |
| १२) | ,, डॉ. मा. रा. नेने | ,, |
| १३) | ,, य. ग. पोकळे | ,, |
| १४) | ,, रा. धों. पारकर | ,, |
| १५) | ,, पु. ज. ओगले | ,, |
| १६) | ,, प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| १७) | ,, स. भि. जामसंडेकर | ,, |
| १८) | ,, डॉ. वा. कृ. आपटे | ,, |
| १९) | ,, गु. शां. शिरसाट | ,, |
| २०) | ,, भाऊसाहेब केळकर | ,, |
| २१) | ,, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | (निमंत्रित) |
| २२) | ,, आ. गो. बांबुळकर | (निमंत्रित) |
| २३) | ,, वा. ज. कुलकर्णी | (निमंत्रित) |

# आमचा प्राध्यापक वर्ग

१) प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, एम्. ए. (इंग्रजी) (मराठी)
२) प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर, एम्. ए. (इंग्रजी)
३) ,, ल. दा. गोलतकर, एम्. ए. बी. एड्., (इतिहास)
४) ,, मधुकर म. गावडे, एम्. ए. बी. एड्. (भूगोल)
५) ,, हेरंब ल. पटवर्धन, एम्. कॉम्., सी. ए. (अकौंटन्सी)
६) ,, प्रकाश शं. रानडे, बी. कॉम्., एल्एल्. बी. (कायदा)
७) ,, टी. सेलव्हराज, एम्. ए., बी. एड्. (अर्थशास्त्र)
८) ,, शशिकांत रा. धुमाळ, एम्. कॉम्. ( कॉमर्स )
९) ,, सुरेश म. सोमटक्के, एम्. ए. (अर्थशास्त्र)
१०) ,, अनंत पु. मिरीकर, एम्. ए. एल् एल्. बी. (इतिहास)
११) ,, दत्तात्रय बा. बलवान, एम्. कॉम् (कॉमर्स)
१२) ,, भारत ना. भोसले, एम्. एस्सी. (संख्याशास्त्र/गणित)
१३) ,, लता भी. बळसंगकर, एम्. ए., बी. एड्. (मराठी)
१४) ,, अरुण गो. पणदुरकर, एम्. ए. (अर्थशास्त्र / सहकार)
१५) ,, अविनाश वि. कांबळे, एम्. ए. (मराठी)
१६) ,, प्रकाश म. उपाध्ये, एम्. ए. (इंग्रजी)
१७) ,, कालिदास ग. जोशी, एम्. ए. (अर्थशास्त्र)
१८) ,, श्रीकृष्ण शं. बोराडे, एम्. ए., बी. एड्. (भूगोल)
१९) ,, शाम सा. पाटील, एम्. कॉम्. (कॉमर्स / अकौंटन्सी)

## ग्रंथालय

१) श्री. एस्. एस्. पाटील, एम्. ए., बी. लिब्. एस्सी. (ग्रंथपाल)
२) ,, यशवंत तुकाराम वेऊलकर, मुख्य शिपाई

## कार्यालय

१) श्री. गणेश भा. गोडबोले, मुख्य लिपिक
२) ,, महेश्वर बा. लेले, वरिष्ठ लिपिक
३) ,, श्रीनिवास आ पळसुले, बी. कॉम् कनिष्ठ लिपिक
४) ,, चंद्रकांत यशवंत महाडिक, शिपाई
५) ,, वसंत वासुदेव धोपटे, ,,
६) ,, नामदेव दाभाजी केतकर, ,,
७) ,, अनंत कृष्णा बाणे, रखवालदार

## ॥ शुद्धिपत्रक ॥

| चुकीची जागा | चूक | दुरुस्ती |
|---|---|---|
| १) 'यांनी गोवर्धन तोलला !' या पानावरील पहिले छायाचित्र | श्री. वसतराव साटम | श्री. वसंतराव साटम |
| २) 'रसगंध' विभागातील पान क्र. ३२ व ३३ वरील 'निद्रिस्त ज्वालामुखी' व 'का?' ह्या कविता | प्रकाश सारंग | प्रकाश सरवणकर |
| ३) पान क्र. ४१ वरील 'विनोद' | जयत साटम | जयंत साटम |
| ४) 'लेख : ललित / वैचारिक' या विभागातील पान क्र. ५५ वरील लेख | तृतीय वर्ष कला | द्वितीय वर्ष कला |


## सहकारितेची ३ मुख्य ध्येये

१) **स्वावलंबन :** स्वतःचे सामर्थ्यावर उन्नती करून घेणे,

२) **काटकसर :** स्वतःची जमा व खर्च पाहून शिल्लक वाढवित जाणे.

३) **परस्पर सहाय्य :** संघटित प्रयत्नांची उन्नती करण्यासाठी, एकमेकांच्या कल्याणासाठी एकमेकांनी प्रामाणिक यत्न करणे.

# कल्याण

## सहकारी मुद्रणालय, देवगड

आपले लक्ष असू द्या—

छपाई कामाच्या गरजासाठी – आपल्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.

-: त्याचप्रमाणे :-

सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांना लागणारी


स्टेशनरी तसेच इतर विविध प्रकारचे फॉर्म

शिवाय विविध डिझाईन्सच्या आकर्षक लग्नपत्रिका मिळतील.

देवगड तालुक्यातील सहकारी प्रेस.

सहकार्यवाह

कार्यवाह




श्री. वसंतराव साटम



आम. श्री. अमृतराव ऊर्फ दादा राणे

सभापती नियामक समिती



श्री. मुरलीधर जोशी

उपाध्यक्ष



श्री. अर्जुनराव नलावडे




☆

शिक्षण विकास मंडळ,
देवगड
पदाधिकारी

—यांनी
गोवर्धन
तोलला !


☆

उपाध्यक्ष




श्री. के. जे. ठाकूर

खजिनदार



डॉ. श्री. अरुण खाडिलकर

"निरोप तुज देता..."



प्राचार्य गोपाळराव मयेकर यांना निरोप

"आगमनें मन प्रमुदित झाले...



नूतन प्राचार्य आर. ए. कुलकर्णी आपल्या कार्यालयात

"कथा ही संकटकाळी बाहेर पडण्याची खिडकी आहे. जेंव्हा कादंबरी, लघुनिबंध, काव्य आदी क्षेत्रांत कोंडी, कुचंबणा, आंधळेपणा निर्माण होतो; तेंव्हा मुळात कादंबरीकार, लघुनिबंधकार, कवी असलेली मने मुक्त श्वास घेण्यासाठी कथेकडे वळतात. तेंव्हा इतर वाङ्मयक्षेत्रात जडावस्था असते, तेंव्हा त्याच कारणाने कथासाहित्य बहरून येते; आणि जेंव्हा इतर साहित्यक्षेत्रांत चैतन्य असते तेंव्हा ही कथा अनावश्यक खिडकीसारखी मिटलेली, निरुपयोगी ठरते."

–डॉ. द. भि. कुलकर्णी,
'तिसऱ्यांदा रणांगण', पृष्ठ ६१-६२

# पाच कथा

## ।। उध्वस्त ।।

।। संजीवकुमार कुलकर्णी / प्रथम वर्ष वाणिज्य ।।

'रसराज' पारितोषिकप्राप्त कथा

सायंकाळची वेळ होती. साधारण तीन वाजले असतील. ते दिवस एप्रिल ते मे महिन्याचे होते. त्यामुळे थोडेसे उनही होते. हवेत उष्मा जाणवत होता आणि त्याचवेळी डॉ. शिवप्रसाद यांची मर्चिडीस गाडी वेगाने पूणा–बंगलोर रोडवरुन जात होती. गाडीचा वेग ८० ते ९० कि. मी. एकसारखा होत होता. बाहेर गरम हवा असल्यामुळे गाडीत उष्णतेचा वारा वाफारा मारीत होता. गाडीमध्ये टेपरेकॉर्डर लावलेला होता. त्यावर डिस्को संगीत लावलेले होते. परंतु त्यापैकी एकाही गोष्टीवर डॉ. शिवप्रसाद यांचे लक्ष नव्हते. त्यांना प्रथम लवकर बंगलोर कव्हर करावयाचे होते. कारण एक सिरीयस पेशंट आहे, अशी तार त्याना दुसऱ्या एका डॉक्टरची मिळाली होती. त्यांच्याच हॉस्पिटलमधल्या. पुण्यात चिंचवड येथे त्यांचे घर होते व ते दहा दिवसांच्या रजेसाठी आले होते. परंतु त्यांना चार दिवस झाले नाही तोपर्यंत त्याना परत बोलावणे आले होते. कारण ते एक लोकप्रिय डॉक्टर होते आणि त्या लोकप्रियतेची दुसरी एक महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे लाघवी व गोड बोलणं ! ते लोकांची मने जिंकीत आणि धीर देत. त्यामुळे त्यांचा अर्धा आजार आपोआपच बरा होत असे.

साधारण आठच्या सुमाराला त्यांच्या गाडीने बंगलोरची सीमा गाठली. एव्हाना गाडीचा वेग बराच कमी झाला होता. साधारण अर्ध्या-पाऊण तासाने गाडीने हॉस्पिटल गाठले व हॉस्पिटलच्या मागच्या कुंपणातून पुढे पोर्चच्या दारात गिर्रेबाज वळण घेऊन गाडी थांबली. डॉ. शिवप्रसाद खाली उतरले. त्यानी मुख्य दरवाजातून सरळ आंत प्रवेश केला. त्यावेळी त्यांच्या सोबतचे डॉक्टर त्यांना सामोरे जाऊन हस्तांदोलन केले. नंतर ते त्यांच्याबरोबर जिथे तो पेशंट होता त्या वॉर्डमध्ये जाण्यास निघाले. वॉर्डच्या दरवाज्यापाशी येऊन त्यानी दार उघडले आणि ते जरा दचकले. तिचा तो सुदृढ बांधा व गव्हाळी रंग गुलाबी साडीत उठून दिसत होता. तिच्या लांबसडक केसाना 'यू' आकाराचा कट होता आणि कपाळावर मधोमध एक रेघ होती. गळयात मंगळसूत्र होते. तिचे मुखकमल एकदम निस्तेज होते. ते जरा स्तंभितच झाले. ही रेखा तर नाही ना ? पण हो रेखाचऽऽ... असे त्यांना एकदम वाटले. पण ते लगेच भानावर आले.

डॉ. शिवप्रसादांनी तिचा हात धरला. ती मूर्च्छित अवस्थेत होती. तिच्या बाजूला त्यांच्याच वयाची एक व्यक्ती

उभी होती. अर्थातच तो तिचा पती होता. डॉक्टरनी तिला लगेच तपासण्यास घेतले. तपासणीनंतर त्यानी तिला सहा इंजेक्शन्स् देण्यास सांगितली आणि थोडया वेळानें ती शुद्धीवर येईल असेही सांगितले. नंतर तिला रक्त द्यावे लागेल असेही सांगितले. लगेच त्यानी तिच्या पतीकडून ती प्रथमावस्थेत कशी होती, हे विचारले. त्याने सांगितले एक दिवस हिच्या पोटात दुखत असल्यामुळे आम्ही तिला दुसऱ्या दवाखान्यात नेले होते. परंतु त्या डॉक्टरनी तुम्हाला दाखविण्यास सांगितल्याने आम्ही तुमच्याकडे लगेच घेऊन आलो. त्यावेळी ती मूर्च्छित अवस्थेत होती व कांही केल्या शुद्धीवर आली नाही. नंतर दुसऱ्या डॉक्टरांशी कांही संगनमत करुन ते आपल्या खोलींत गेले.

खोलीत जाऊन ते खुर्चीवर बसले व नऊइंची "रुटमस" सिगारेट काढून ती शिलगावली. पण प्रथम ते पेशंटसाठी धडपडत होते, बेचैन होत होते. तर आता त्या रेखाला पाहून ते परत-परत बेचैन झाले. सिगारेटचा धूर सोडता सोडता त्यांच्या डोळयापुढे त्यांचे गतकाळातील प्रसंग दिसू लागले.

रेखा हे त्यांचे जीवनसर्वस्व होते. ते कॉलेज शिकत असताना त्यांचे रेखावर प्रेम जडले. ती दोघे एकमेकांवर प्रेम करु लागले. दोघांच्या आईवडिलाना हे सर्व माहीत होते. त्या एकमेकांचे वडील मध्यम वर्गातील गृहस्थ होते. कारण त्या दोघांनी एकमेकाबद्दल आपल्या आईवडिलाना भरपूर सांगितले होते. थोडयाच दिवसानी रेखा B.A. झाली, तर ते M.B.B.S. डॉक्टर झाले. परंतु त्यांची इच्छा विलायतेला जाऊन तज्ञ होण्याची होती. म्हणून त्यानी अमेरिकेला जाण्याचे ठरविले. हे सर्व रेखाला कळल्यावर ती फार दुःखी झाली. अमेरिकेला जाण्याच्या अगोदर त्या दोघानी एकमेकांवरचे प्रेम कायम राखण्याचा व अमेरिकेतून आल्यानंतर लग्न करण्याचे ठरविले. आणाभाका घेतल्या.

पुढे ते अमेरिकेला गेले व भरपूर अभ्यास केला. त्यानी Cardiogram & Ex-Ray मशिनचा पुरा अभ्यास करुन ते त्यातले एक तज्ञ बनले. आता त्यांचें स्वप्न साकार होणार होते. त्यानी येण्याच्या आदल्या दिवशी रेखासाठी भरपूर वस्तू घेतल्या आणि ते भारतात आले. परंतु त्याना रेखाचे एक वर्षापूर्वीच लग्न झालेले समजले. तेंव्हा त्याना फार दुःख झाले.

एवढ्यात दुसऱ्या डॉक्टरनी त्याना हांक मारली. त्याबरोबर त्यांची विचारमालिका तुटली. थोडयाच दिवसांत रेखा पूर्णतः बरी झाली. तिला नवजीवन डॉ. शिवप्रसादानी दिले. परंतु आपण केलेल्या ट्रिटमेंटचे पैसे त्यानी घेतले नाहीत. परंतु एक दिवशी रेखा स्वतःहून त्यांच्याकडे आली. डॉ शिवप्रसादांची क्षमा मागू लागली. ती म्हणाली "मी स्वतःहून लग्न केले नाही, तर माझ्या आई-वडिलानी माझे जबरदस्तीने दुसरीकडे लग्न करुन दिले" आणि तिने डॉक्टरांच्या बोलण्याची वाट न पहाता निघून गेली. तिने त्यांना बोलायला पण दिले नाही. या आश्चर्यकारक प्रकारामुळे त्याना कांहीसुद्धा कळले नाही. ते विस्मितच झाले.

त्यानंतरच्या चार-पांच दिवसांनी ते सहज आपल्या खोलीत पेपर वाचीत बसले होते. वाचता वाचता कोपऱ्यातल्या फोटोकडे त्यांचे लक्ष गेले. ते मनाशीच पुटपुटले, 'ही रेखा तर

नाही नां! ’म्हणून त्यानी फोटोच्या खाली पाहिले तर गूढ मृत्यू असे लिहिले होते. “ मरण की आत्महत्या?” त्यानी पुढे वाचावयास सुरवात केली. रेखा जगदाळे हिचा गूढ मृत्यू. वैद्यकीय तपासणीत Poison आढळले. वाचताना ते एकदम थांबले. त्यांच्या हृदयांत एकदम कळ आली. त्याचबरोबर ते मोठ्याने ओरडले. लगेच नर्स, इतर डॉक्टर्स धावत आले. पण त्यांची ती आरोळी शेवटची होती. ते अनंतात केंव्हाच विलीन झाले होते.

# विचार-मौक्तिके

Time is that, which man is always trying to kill, but which ends in killing him.

**– Herbert Spencer**

☆ ☆ ☆

The only demand that one can make on all educated men is to use their education, to use their skill, to use all their wisdom for the purpose of integration of society.

**– Dr. S. RadhaKrishnan**

☆ ☆ ☆

For love and beauty and delight
There is no death nor change : their might,
Exceeds our organs, which endure,
No light, being themselves obscure.

**– Shelley**

☆ ☆ ☆

प्रत्येक अच्छा आंदोलन पाँच अवस्थाओमेंसे गुजरता है उदासीनता या उपेक्षा, व्यंग या उपहास, दुरुपयोग या गालीं, दमन या विरोध और सम्मान या प्रतिष्ठा !

**– म. गांधी**

॥ श्री ॥

देवगड महाविद्यालयाला
आणि
"रसराज" ला हार्दिक शुभेच्छा !

मे. लक्ष्मण रघुनाथ जोशी

**व्यापारी**

देवगड, जि. सिंधुदुर्ग.

☎ 39

रसराजला आमच्या—
卐 हार्दिक शुभेच्छा ! 卐

मे. अमृत विष्णु नलावडे

जनरल मर्चंट

देवगड, जि. सिंधुदुर्ग.

☎ 16

रसराज या वार्षिक अंकासाठी-

हार्दिक शुभेच्छा !



श्री. आशीक अहमद नाखवा, रत्नागिरी

**[देवगड]**

## ॥ ज्ञानेश्वर माऊली ॥

॥ रमेश मालंडकर / द्वितीय वर्ष कला ॥

ज्ञानदादाऽऽ, ज्ञानदादाऽऽऽ नुकत्याच समाधिस्थ झालेल्या ज्ञानेश्वर 'माऊली' च्या समधीच्या पाषाणावर डोके ठेवून मुक्ताई एकसारखा आक्रोश करीत होती. काळजाला भिडणारे मुक्ताईचे शब्द आबाल वृद्धांच्या हृदयाचा थरकाप उडविणारे होते.

लहानपणीच आई-वडिलांनी आपल्या बालकांना शुध्दिपत्र मिळण्यासाठी देहान्त प्रायश्चित घेतलेले ! सहाजिकच मुक्ताईची माऊली ते बनले. पण आजपर्यंतच्या सर्व महामुनींचे आणि मराठी भाषेचे माऊलीत्व त्यांनी स्वीकारले. त्यांच्या मुखातून मराठी भाषेची थोरवी स्पष्ट करणारे शब्द बाहेर प...:

माझा मराठचि बोलु कौतु.. ।
परि अमृतातेंही पैजासी जिंके
ऐशी अक्षरे रसिके । मेळवीन ॥ ६:१४ ॥

अमृताशी स्पर्धा करणारे हे बोल ज्ञानेश्वर माऊलीच्या मुखातून बाहेर पडले, अवघा महाराष्ट्र धन्य झाला ! अवघ्या महाराष्ट्राने "ज्ञानेश्वरी" तील ज्ञानामृत चाखले, त्याला अमृताचा अनुभव प्राप्त झाला, महाराष्ट्र मनोमनी तृप्त झाला.

क्षण शाश्वत झाला !
कण अनंत झाला !!
बिंदु सागर झाला !!!

"ज्ञान" सागरांनी सकलात्मक अभ्यंगस्नान केले. ओठांच्या पाकळयातून दरवळलेल्या शब्दांचा सुगंध घेतला, निर्गुण निराकार परमात्म्याच्या विराट स्वरुपाचे ॐ काराच्या नादरुपात दर्शन घेतले-

ॐ नमो जी आद्या । श्री वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरुपा ॥ १:१ ॥

सकल कामना पूर्ण करणाऱ्या, नेत्रात अंजन घालून ज्ञानदृष्टी देणाऱ्या निवृत्तीनाथांच्या चरणी शिष्यभावाने लीन होऊन ज्ञानेश्वर माऊलीची रसवंती भरभरुन वाहू लागली, श्रोतृवृंदांना आळवू लागली:

जैसे शारदियेचे चंद्रकळे । माजि अमृतकण कोंवळे
ते वेंचिता मने मवाळें । चकोरतलगे
तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अतिहळुवारपण चित्ता । आणुनिया ॥ १:५६५७

श्रोतृवृंद डोलू लागला. ओव्यांची फुले वेचू लागला. अर्थाचा परिमल अंतराला सुखवू लागला. श्रोत्यांना आपल्या प्रतिभेच्या पंखावर बसवून आनंदाच्या आकाशात उंच नेऊन सोडले. सकलांचे नयन - कर्ण तृप्त होऊ लागले.

ज्ञानेश्वर माऊली–ज्ञानाची रसगंगा दुथडी भरुन वाहत होती. ज्ञानदीप तिच्या प्रवाहावर तरंगू लागले होते. अनंताचा सूर्य शांतीचे चांदणे फुलवू लागला होता. दिवसामासी ज्ञानदेवी वाढली, पूर्णत्वाला गेली. मोठं कार्य सिद्धीला गेलं. वक्ता व श्रोता धन्य झाले. ज्ञानदेवांनी हात जोडले. जगन्नायकाजवळ पसायदान मागितलं. ज्यांनी उभ्या जन्मभर उपेक्षा, अवहेलना केली त्याच माणसांसाठी ! कारण आपपरभाव आता उरला नव्हता, उरली होती एक करुणा! त्या करुणेनं सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी म्हटलं–

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो
भूतां परस्परे जडो । मैत्र जीवांचे ॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छील तो ते लाहो । प्राणिजात ॥

१८:१७९३, १७९४, १७९५

## सुभाषिते

- जीभ तोंडात असते, पण कधी कधी ती डोके फिरवते.
- केवळ स्वतःसाठी जगणे ही आत्महत्या होय.
- जलसिंचनाने फुले फुलतात तसे भावसिंचनाने मने फुलतात.
- ज्याला कोणा शिक्षकाचीच गरज नसते, त्याला काळ शिकवतो.
- केवळ दगडाला देव मानला की माणसांचा दगड झालाच म्हणून समजा.
- आयुष्य ही एक तिजोरी आहे. तिची किल्ली ज्याला सापडत नाही त्याला आतील काय दिसणार ?
- निराशावादी संधीला अडचण मानतो, पण आशावादी अडचणीची संधी साधतो.
- मुरडणाऱ्या लता होण्यापेक्षा चमकणारी विद्युल्लता व्हायचा प्रयत्न करावा.
- माणसाचे भवितव्य त्याच्या हातावरील रेखांत नाही, तर ते मनगटात असते.

## ॥ बेवारशी ॥

॥ नथुराम उपरकर / प्रथम वर्ष कला ॥

‘अगं रश्मी, हा बघ कोण आला!’ तात्या दरवाजात पाय टाकताच ओरडले. रश्मी केस विचंरत होती. लगोलग बाहेर आली. तर काय तिच्या हृदयात थोडी हलचल उठली. आपल्याला काय होतंय हे तिलाच समजत नव्हते. आपण याला कोठेतरी पाहिलं आहे. रश्मी अवाक् होऊन पहात होती. तात्यांना कोडे पडले, रश्मी असे का पाहते ? शेवटी त्यांना रश्मीला जागं करावं लागलं, “ अरश्मी ! रश्मी ! ” “ अं – हो – तात्या, हा माझा भाऊ ना ? किती दिवस बाहेर होता. येना आत ये !” “ अगं रश्मी, तुझा रमेश थोडा अबोल आहे. सांभाळून घे,” तात्या आत–जात म्हणाले. किती दिवस गेले. मजेत गेले, खुशीत गेले. रश्मीला माहीत. रमेशला माहीत नाही. पण तात्यांना मात्र जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. कारण तसेंच होते. पापाचे प्रायश्चित घेतल्याने समाधान होते. सध्या घर बहरलेले होते. तात्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

नाही तर भूतकाळात तात्या आणि रश्मी सारं कसं सूनं–सूनं रिक्त. एवढी मोठी बंगली आणि त्यात दोन जीव दोघांचं ही सारखं दुःख. रश्मीला आईची वाण तर तात्या – दुःख विसरता विसरत नव्हतं. गडगंज संपती निरुप-योगी होती. जिथं पहावं तिथं पोकळी, निराशा. रेश्माच्या वाढदिवशी थोडा कृत्रिम उत्साह भरत असे. त्यातही हुरहूर असायचीच. चिमुरडी रेश्मा अबोल होती. तात्यानां बंगली खायला उठायची. समजायला लागल्यावर रश्मीला आईची आठवण होताच ती हमसून रडायची. तात्यांना हे पाहवेना. योगायोगाने की परमेश्वराने तात्यांच्या या चिंतेवर पडदा टाकायचे ठरविले. आणि रश्मीला भाऊ मिळाला तात्यांना आनंद, उत्साह मिळाला, पुनर्जन्मा-सारखे ते वागू लागले.

पण रमेश परिस्थितीने लाथाडलेला, श्रीमंताच्या पैशाने निर्मिलेला रमेश, रस्त्यावर वाढलेला रमेश ही आपुलकी पाहून भारावण्याऐवजी याची त्याला कींव येऊ लागली. तो धसमुसळेपणाने वागत होता. रश्मी त्याला माणसात आणण्याचा यशस्वी प्रयत्न करत होती. पण रमेशचे मन यात गुंतत नव्हते. बंगलीसमोरचा बगीचा, आलिशान बंगली, आलिशान राहणी या सर्वांचा त्याला उबग येत होता. त्याला जवळ ओढणारे तात्या त्याच्या-बद्दल पहिल्याक्षणी जेवढी आपुलकी वाटली, ओढ वाटली त्या जागी आता असुया निर्माण झाली. गोलगोल

‘रसराज’साठी
हार्दिक शुभेच्छा !



**नंदकुमार ल. घाटे** ☎ Off 46 Res 76

**ताज्या मासळीचे व्यापारी व कोळंबी सप्लायर**

मु. पो. देवगड, जि. सिंधुदुर्ग. ४१६६१२

फिरणारी रश्मी. श्रीमंतीची मूर्तिमंत पुतळी. इथून जावं की जाऊ नये एक पाय आत व एक बाहेर अशी द्विधा स्थिती रमेशची! तात्यांच्या प्रेमाआड त्यांची संपत्ती येत होती. यात कोणाला फाटा द्यावा आणि तो का द्यावा? जगात आपलं कोणआहे? ना आई ना बाप, ना घरदार, आणि हे सारं आपल्या वाटचाला का यावं ? हे सर्व आता तो जाणत होता. त्याचे हृदय पेटून उठत होते. हे श्रीमंत, त्यांच्या नोटा या सर्वांची होळी करावी असं वाटत होतं. डोकं ठिकाणावर रहात नव्हतं आणि त्यातूनच तो प्रसंग घडला होता.

तेथील धनिक व्यापाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न रमेशच्या हातून झाला. भावनेच्या, व्देशाच्या आहारी जाऊन मनुष्य काय करु शकतो, हे त्याचं ठळक उदाहरण होतं. न्यायालयात त्याने तशी जबानीही दिली. आपला पुरा इतिहास कथन केला होता. खुनाचा प्रयत्न पण परिस्थिताने गांजून उद्वेगाने हे सर्व झाल्याचं मान्य करुन न्यायालयाने त्याची खाजगी सुधारगृहात केली होती. तेथे रमेशची चांगली वर्तणूक हे साहजिकच होतं. तो रस्त्यावरचा होता, तरी त्याची प्रवृत्ती खुनी नव्हती. येथील श्रीमंतीने त्याला जन्म दिला होता आणि तीच श्रीमंती मुळातून उपटावी असं त्याला वाटत होतं. तरी आता चक्रावलेल्या डोक्याला त्यानं काबूत आणलं होतं. अल्प काळात सुटकेत आपला चांगुलपणा त्यानं दाखवून दिला आणि सुंदर बंगलीचा दरवाजा ओलांडला.

आज सकाळीच उठून तो बागेत फिरुन आला. रश्मीला त्यामुळे काहीसा बदल वाटला. धावतच जवळ आली. "अरे रमेश, आज झोपेला लौकर पिटाळलीस. त्यामुळे आज आपल्याला शेतावर गेलंच पाहिजे. किती दिवस झालेत शेतावर फिरकलो नाही. घरातल्या घरात वैताग येऊ लागलाय. तात्या सारखे सांगतात शेतावर फिरायला जा, गडीमाणसांशी बोला, हसा, खेळा, फार मायेची आहेत लोकं. डोक्यावर घेतील," रश्मीने लेक्चर चालू केलं होतं. पण रमेशची दृष्टी शुन्यात होती. अचानक जागे झाल्याप्रमाणे, "फार मायेची आहेत गडी माणसं. रश्मी ती स्तुती कशाची करतात तुला माहीत आहे? ते जाऊ दे, तुला तरी अजून माझा इतिहास कोणापुढे मांडायला मिळाला नाही. ते एक काम होईल." रश्मी त्रासिकपणे, "हे बघ रमेश, तुला हे कसे बोलता येते. माझ्या मनाला हा विचारसुध्दा शिवत नाही. तुला एकदा मी भाऊ म्हटलं मग– मग– असे का उगाळत बसतोस? आज आपण शेतावर जायचंच." यावर रमेश काही बोलला नाही. पळत पळत रेश्मा तात्यांना हे सांगू लागली. पण तात्या उदास वाटले. कपाळावर आठया दिसत होत्या. "तात्या! असे काय करता ? तब्बेत ठीक आहे ना?" "हो रश्मी ठीक आहे. पण – पण." "तात्या, पण पण काय?", "आम्ही शेतावरुन येतो. रश्मी पोरी, तुम्ही जा. एक सांगतो तू शेतावर रमेशचा इतिहास कथन करु नको" "तात्या, एवढी का मी लहान आहे?" "तसं नाही पोरी, जा आता. मात्र लौकर परत या."

रश्मीच्या मनात पाल चुकचुकत होती. तिचं डोकं आता ठिकाणावर नव्हतं. विचारचक्रात ती पुरी सांपडली होती. तात्यांनी रमेशबद्दल शेतावर गुप्तता राखायला का सांगावं? तिच्या तर हे मनातही नव्हतं. एवढ्यात तिच्या डोळ्यासमोर सखुबाई तरळू लागली. बिचारी किती प्रेमळ, लाघवी, पोटच्या पोरीप्रमाणे माया करते. रश्मीला तर आई भेटल्याप्रमाणे वाटे. आईचा अपघाती मृत्यू. तात्यांचा पुन्हा लग्न न करण्याचा निश्चय. हे सर्व असं का? मात्र यात कोठे तरी बंध आढळतो, रश्मीनं मनातलं वादळ तसंच दडपलं. आणि बंधाऱ्यावरुन चालू लागली. शेतावरील गडीमाणसं आज कुतूहलाने पहात होती. सभोवती हिरवेगार शेत. मूर्तिमंत आनंदाचं कोठार. या हर्षात सूर्याचा ढगांबरोबरचा लंपडाव व त्याखाली वावरणारी ही माणसं किती भाग्यवान आहेत. रश्मीला त्यांचा हेवा वाटू लागला. आपणही यांच्यात रहावं असं तिला वाटू लागलं. तोंड भरभरुन ती बोलत होती. पण मायेनं 'पोरी ! पोरी,' करणारी सखुबाई तिला आज आढळली नाही. किती दिवस झालेत भेटली नाही. एवढ्यात भिमा ओरडला, "मालकीन तुमी सखुला धुडंता ना? तिची प्रकृती बरोबर न्हाय, पोटात गोळा येतोय म्हते." रश्मीला आता थांबावंसं वाटत नव्हतं. रमेश एकल-

कोंडयाप्रमाणे बांधावरच शून्यात दृष्टी लावून बसला होता. काही निश्चय करुन रश्मीने त्याला हाक मारली. रमेशनं ओळखलं, परत जायची वेळ झाली. नाहीतरी सूर्य अंगाला चटके देत होताच. हाकेनें त्याला समाधान वाटले. दोघेही आता घरची वाट चालत होती. आज रश्मीनं मनात निश्चय पक्का केला होता. आज तात्यांना खडसावून विचारावं व उत्तर घेतल्याशिवाय जेवण घ्यायचं नाही. निर्धारानं तिने आत पाऊल टाकलं. तो काय तात्या नेहमीप्रमाणें आजही घरी नव्हते. रश्मीला शेतावर पाठवून ते असे जात असत. व तिच्यापासून काहीतरी लपविण्याचा प्रयत्न करीत, हे तिला दिसत होतं.

पण आता तिला तात्यांना लौकर भेटायचे होते. या सर्वांचा तिला जाब विचारावयाचा होता. विचारातून तिने आता तात्यांच्या वाटेकडे डोळे लावले. क्षण नी क्षण ती मोजत होती. एवढयात गेट वाजल्याचा आवाज आला. बाहेर आली तो काय, तात्यांचा तोल संभाळत नव्हता. भितीने तिचं शरीर गारठलं. तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. तात्या – तात्या – करत जवळ गेली. तात्या दारु पिऊन तर्र होते. शरीरात बदल झाला होता. डोळे सफेद पडत आले होते. श्वास शेवटच्या क्षणाप्रमाणे कोंडत होता. " रमेश, " रश्मी ओरडली. रमेश धाडकन बाहेर आला. गेटवर तात्या टेकलेले पाहून थरारला. जवळ येताच डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. रश्मीला आज त्याचं अंतःकरण दिसलं तो अश्रू टिपत होता. तात्या शेवटचे क्षण मोजत होते. रश्मीची खडसावणी तशीच राहिली, "तात्या, हे काय केलंत, असं झालं तरी काय?" पण तात्यांची जीभ उचलत नव्हती– " का... काय... सां... गू .. पो...री सखू गेलो मी... कशाला .. राहू ?" " मी नाही समजले तात्या ?" " पोरी... हा... रमेश... बघ... तु... झा सख्खा भाऊ, सखूचा मुलगा... माझा... माझा... रमेश."


रसराज या वार्षिक अंकासाठी–

हार्दिक शुभेच्छा !



अनिसा लाँच कंपनी

कर्ला, रत्नागिरी

## ॥ लव्ह इज ब्लाईंड ॥

॥ एम्. आर. खान / तृतीय वर्ष वाणिज्य ॥

तीस वर्षापूर्वी परंपरेनुसार लग्न झाल्यावर 'लाईफ कम्पॅनियन' म्हणून जीवनाची साथीदार स्वीकारून मिस मेरीची मिसेस जॉन बनवणाऱ्या अंकल जॉनना 'लव्ह इज ब्लाईंड' किंवा ऑल इज फेअर इन लव्ह अँड वॉर् असलं काही तत्वज्ञान समजावूनदेखील पटलं नसतं. पण आज मात्र त्यांना ते पटवून घ्यावे लागत होतं. ते त्यांच्याच लाडक्या आणि लव्हेबल असणाऱ्या टिनामुळे !

त्यांच्या फ्री अँड फ्रॅंक कुटुंबातील सर्वात लहान मुलगी टिना लहानपणापासून सर्वांची आवडती होती. लाडकी होती. गोरीगोरी पान, नाकीडोळी छान! शिवाय लहानपणापासून चुरुचुरु गोड बोलणारी ! 'स्मार्ट ब्युटी गर्ल' म्हणून जो तो तिचे कौतुक करायचा. ती घरात जशी सर्वांची आवडती होती, तशीच घराबाहेरही! सर्वांपेक्षा तिच्या डॅडना...अंकल जॉनना तिचा खूप अभिमान वाटायचा. अगदी जीव की प्राण होती ती त्यांचा! म्हणून वयात येताच टिनाच्या भोवती जमलेलं फ्रेंडसर्कल पाहून अंकल जॉनना तिचं खूप कौतुक वाटायचं. आणि मोठ्या अभिमानाने ते म्हणायचे, "सुंदर सुवासिक फुलाभोवती भुंगे हें जमायचेच. बट माय टिना इज नॉट ऑर्डिनरी गर्ल...," पण त्याच त्यांच्या एक्स्ट्रा ऑर्डिनरी 'डॉटर' ने आज त्यांना चांगलाच धक्का दिला होता. त्यांनी तिचे फाजील लाड केले होते ते त्याना आता नडले होते. असं काही ती करील हे स्वप्नातदेखील वाटले नव्हते. त्यांच्या विश्वासाला तडा गेला होता. तसा त्यांनी तिला विरोधही केला नसता. अर्थात त्यांनी विरोध करायला, तिला अडवायला त्यांना वावच दिला नव्हता तिनं!

आपण एवढ्या सवलती टिनाला दिल्या, एवढी मोकळीक दिली मग तिनं आपल्याशी फ्रॅंक-फ्री असूनदेखिल असं करावं? आपले विचार तिला माहीत असताना तिनं आपल्याविरुद्ध का जावं ? ...अंकल जॉनच्या मनात उलटसुलट विचार येत होते. तिनं कुणावरही प्रेम करायला आपली आडकाठी कुठेच नव्हती, असं आपण तिला सांगितलं होतं. तरीदेखिल......

अंकल जॉनना मागचा एक प्रसंग आठवला. त्या दिवशी रात्री डिनरच्या वेळी मम्मीनेच म्हणजे मेरीनं तो विषय काढला.

WITH BEST COMPLIMENTS FROM

☎ 25

# SADANAND J. PARKAR

## सदानंद जगन्नाथ पारकर

मासळी व मासळी खताचे व्यापारी

सीता सदन

मु. पो. देवगड, जि. सिंधुदुर्ग. ४१६६१३

'डू यू नो जॉन...' मेरीने आपल्या डिशमधल्या ब्रेडचा तुकडा तोडून त्याचा घास तोंडाजवळ नेऊन थांबवत म्हटलं.

'व्हाट?' काहीच माहीत नसल्यामुळे जॉननी घास खात खातच तिच्याकडे पहात विचारले.

'अबाऊट युवर डिअरेस्ट डॉटर ?,' टिनाविषयी काही तक्रार असली की मेरीचा नेहमीचा सूर!

'व्हाट हॅज शी डन्?... काय केलय तिनं ?' त्यांनी मेरीला गप्प करण्याच्या स्वरातच विचारलं.

टिना मात्र चपापली आणि खाली मान घालून गुपचूप सूप पिण्यात मग्न असल्याचं भासवू लागली. तरीसुद्धा मम्मीनं मात्र तिची ही ट्रीक ओळखली...

' आस्क हर...'

'व्हाट इज मॅटर टिना?...,' आपल्या आवाजात शक्य तो मार्दव आणित आपल्या शेजारीच बसलेल्या टिनाच्या पाठीवर हलकेच थोपटीत जॉननी विचारलं. टिनानं तोंड उघडलं नाही. पण नुसती मान हलवून तिनं तोंडातल्या तोंडात पुटपुटल्यागत केलं. जणू काही तिला म्हणायचं होतं '... नथिंग...डॅ डी ऽऽऽ...'

अंकल जॉननी पुन्हा प्रश्नार्थक नजरेनं आपल्या पत्नी-कडे पाहिलं. 'यू नो, हर – फ्रेंड नाऊ अ डेज..?' मेरीच्या या प्रश्नावर जॉन खो–खो हसू लागले. मेरी-लाच काय पण टिनासहित तिच्या भांवडनांही आश्चर्य वाटलं. त्या सर्वांच्या नजरेचा वेगळा अर्थ पाहून अंकल जॉन एकदम सिरियस झाले अन् त्यांनी विचारले. 'यू मीन गोम. टिनाज बॉय फ्रेंड इज नॉट गुड. ही इज गुंडा-लोफर... शी शुड नॉट लव्ह हिम...करेक्ट?" त्यांच्या स्पष्टोक्तीने सान्यानाच धक्का बसला. टिना-सुद्धा खाली मान घालायचं नाटक विसरुन गेली आणि अवाक् होऊन आपल्या 'डॅड' कडे वेड्यासारखी पहात राहिली.

'यू मस्ट स्टॉप इट'

"शी शुड नॉट मीट हिम्..."

"गोम् इज नॉट डिझर्व्हड् टु हर बी फ्रेंड, टु बी लव्हड्"

मेरीसकट टिनाच्या भांवडांनी आपली मते व्यक्त केली.

"आय ॲग्रीऽऽ..." अंकल जॉननी हळुवारपणे म्हटले. तसे टिना वगळता सान्यांचे चेहरे फुलले. टिना तशीच गप्प बसून राहिली. जॉननी आपलं जेवण संपवलं अगदी शांत वातावरणात ! आणि उठता उठता स्वगत म्हणावे तसे शद्व फेकून दिले –

" तरी देखील, टिना नोज व्हॉट इज गुड ॲन्ड व्हॉट इज् बॅड. शी इज नबॉइट यंग नाऊ...."

सर्वांना एकाकी अनपेक्षित धक्का बसला. कारण जॉननी टिनाच्या बाजूने कौल दिला होता. तिला खूप आनंद झाला

'गोम इज माय ओन्ली फास्ट फ्रेंड डॅडऽऽऽड...' भराभर जेवण संपवून टिनानं आपल्या डॅडींच्या पाठी धाव घेतली होती. गोमशी आपण लग्नबिग्न अजिबात कर-णार नाही. अशी ग्वाही तिनं त्यावेळी जॉनना दिली होती. त्यामुळे तिची बाजू घेण्यात आपलं काहीच चुकलं नव्हतं, हे अंकल जॉनना त्यावेळी पटलं होतं... पण आज...

पण आजची गोष्ट वेगळी होती. टिनानं फक्त त्यांनाच फसवलं नव्हतं. तर येशूला देखील फसवलं होतं; आपल्या ख्रिश्चन धर्माला काळीमा फासला होता.

टिनानं 'स्टेनो' चा कोर्स करताच जॉननी आपल्या मोठ्या साहेबांची मिनतवारी करुन आपल्याच 'इन्शुरन्स' कंपनीत चिकटवली होती. सहा महिन्यांच्या कालावधीत तिच्याच डिपार्टमेंटमधल्या प्रकाश दुबेशी तिची फ्रेंडशिप जमली. तो तिथे सिनियर क्लार्क होता. प्रकाशच्या आकर्षक व्यक्तिमत्वानं भारुन टाकलं तिला. स्मार्ट, नाकी डोळी तरतरीत, गोड अन् मिठ्ठास बोल-णाऱ्या, मनमोकळ्या स्वभावाच्या प्रकाशची तिच्यावर चटकन् छाप पडली. आणि त्यालादेखील 'बेबी डॉल' सारखी दिसणारी नवी स्टेनो खूप आवडली. त्यात कंपनीच्या ॲन्युअल फंक्शनच्या निमित्तानं दोघं अधिक जवळ आली एकमेकांच्या आवडी निवडी, स्वभाव नकळत एकमेकाला जाणवले. प्रॅक्टिसच्या रुपानं एक-मेकाचा सहवास वाढू लागला आणि नंतर कळत नक-

ळत. दोघांच्या मनात एकमेकांविषयी प्रेमाचं बीज रुजत गेलं...

दोघांच्या भेटीगाठी वाढ लागल्या. स्पोर्टस् क्लब्ज, कॅन्टीनमध्ये दोघांची जोडी दिसू लागली. अर्थात अंकल जॉनच्या लक्षात त्यांची जवळीक आली. पण त्यांचा आपल्या 'टिना' वर खूप विश्वास होता. ह्या तरुण वयात मुलामुलींनी एकत्र हिंडा-फिरायचं नाही, तर काय प्रौढावस्थेत गेल्यावर ? ह्या विचारसरणीचे अंकल जॉन... शिवाय...... प्रकाश. एक हिंदू होता टिना ख्रिश्चन! आपला धर्म सोडून टिना त्याच्या एवढी काहीं आहारी जाणार नाहीं, याची अंकल जॉनना एकशे एक परसेंट खात्री होती.

साधारण वर्ष दीडवर्ष त्या कंपनीत रुळल्यावर टिना प्रकाशचे संबंध अधिकच दृढ झाले. त्यांच्या प्रीतीच्या रोपट्याचा फोफावलेल्या वृक्षाप्रमाणे विस्तृत विस्तार झाला आणि त्या दोघानांही एकमेकांशिवाय जगणं अशक्य होऊ लागलं. बोलता बोलता टिनानं डॅडींकडून काढून घेतलं कीं आपला धर्म बदलणे त्यांना कधीच आवडणार नाहीं. म्हणून टिनानं ते प्रकाशला सांगितलं, त्यावेळी त्याने उलट विचारलं,

'टिनू, मग तुझं काय म्हणणं आहे, मी ख्रिश्चन व्हावं?'
'असं कुठं म्हणतेय मी...मला फक्त एवढंच ठाऊक आहे...'

'काय?' ती बोलायचं थांबली म्हणून प्रकाशने विचारले तिला.

'आय लव्ह यु... आय लव्ह यु...', तिचे डोळे पाणावले, ओठांची आपोआप उघडझाप होऊ लागली, श्वासोश्वास अधिक गरम झाला.

'आय नो दॅट टिनू ! बट...... बट यु नो माय कंडिशन ..'

प्रकाश त्याच्या घरचा एकुलता एक मुलगा होता. चांगला शिकला सवरलेला. टिनाशी जवळीक वाढल्यावर त्याने तिला आपल्या घरी नेली होती. अर्थात ती

रसराजला आमच्या—
卐 हार्दिक शुभेच्छा ! 卐



श्री. इस्माईल आदम सोलकर
रत्नागिरी - कर्ला

देवगड महाविद्यालयाला
आणि
"रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !



रत्ना सी फुडस्
रत्नागिरी

सर्वांना योग्य वाटत असली तरी तिच्या 'ख्रिश्चन' धर्मामुळे त्याच्या पसंतीला विरोध करण्यात आला. शेवटी तिला हिंदू करुन घेऊन प्रकाशच्या इच्छेप्रमाणे तिला आपली सून म्हणून घ्यायला त्याचे आईवडील तयार झाले. टिनाला प्रकाशकडून जेंव्हा हे समजले, तेंव्हा तिनं स्वतःशी खूप विचार केला आणि आपला आपणच निर्णय घेतला, पुढे घडणाऱ्या परिणामांचा पर्वा न करता !...आणि आपल्या प्रेमपूर्तीसाठी ती हिंदू होण्याचे ठरवून पुढे सारसावली.

ताबडतोब आवश्यक ते विधी करुन 'ख्रिश्चन टिना' ची 'हिंदू रेखा' बनली व त्याच सुमूहूर्तावर देवाब्राम्हणांच्या साक्ष न प्रकाशच्या साऱ्या नातेवाईकांच्या समक्ष, त्यांच्या आशिर्वादाने प्रकाशशी तिचा विवाह झाला.

अर्थात टिनाच्या घरी कोणालाच काहीच कल्पना नव्हती. पण लग्नाच्या आदल्याच दिवशी डॅडीना तिनं पत्र लिहून पोष्टात टाकलं होतं, 'डॅड, मी प्रकाशशी लग्न करीत आहे, 'रेखा' होऊन. आपला आशीर्वाद असावा. आपल्याला हे आवडणार नाही, याची मला खात्री आहे. तरीदेखील मोठ्या मनानं आपल्या लाडक्या टिनूला क्षमा कराल हा विश्वास... ज्यावेळी हे पत्र आपणांस मिळेल त्यावेळी मी प्रकाशची हिंदू पत्नी झालेली असेन... त्यामुळे आपण काहीच करु शकणार नाहीत...'

अंकल जॉनच्या तळपायाची आग मस्तकात गेली होती. लांबच्या टूरला जायचं आहे म्हणून थाप मारून ती गेली, तेंव्हा त्यांना तिचा जरासुद्धा संशय आला नव्हता. आता स्वतःवरच ग्रामावण्यापलीकडे ते काहीच करु शकत नव्हते. जो तो त्यांना टिनाबद्दल विचारु लागला. कुजबूज वाढली, 'अंकल जॉनची मुलगी टिना प्रकाश बरोबर पळून गेली .' त्यानं त्यांचं डोकं अधिकच फिरलं मग त्यांना विचारणाऱ्यावरच ते राग काढू लागले, 'लेट हर गो टू हेल,... डोन्ट आस्क मी..., आय डोन्ट नो..., असली उत्तरे देऊ लागले

अर्थात् शेवटी झालं ते त्यांना मानावंच लागलं आणि मग स्वतःलाच दोष देत मनाला झालेलं मनस्वी दुःख लपवित ते स्वतःबरोबर घरच्यांची समजूत काढू लागले... की...'लव्ह इज ब्लाइंड......'

# विचार-मौक्तिके

ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाही ते नास्तिक होत, असे प्राचीन धर्मांनी म्हटले आहे. पण नवा धर्म म्हणतो की, ज्यांचा स्वतःवर विश्वास नाही ते नास्तिक होत.

**–स्वामी विवेकानंद**

आदमी हँसता है; दुःख, दर्द सभी में हँसता है। जैसे हँसते हँसते आदमी की प्रसन्नता थक जाती है वैसेही कभी कभी रोते रोते आदमी की उदासी थक जाती है और आदमी करवट बदलता है ताकि हँसीकी छाँहमें कुछ विश्राम कर फिर वह आँसुओंकी कडी धूपमें चल सके।

**–डॉ. धर्मवीर भारती**

ध्यानात ठेवा की आपण जगाचे ऋणी आहोत. जग आपले ऋणी नाही. जगासाठी काही कार्य करण्याची संधी मिळणे ही मोठ्या सद्भाग्याची गोष्ट आहे. जगाला सहाय्य केल्याने वास्तविक पाहता आपण स्वतःलाच सहाय्य करीत असतो.

**–स्वामी विवेकानंद**

WITH BEST COMPLIMENTS FROM

☎ 76

# HAJIM AHMED GULAM & SONS

DRY FISH MERCHANTS & COMMISSION AGENTS

**AWAR, MALVAN, DEVGAD**

Dist- SINDHUDURG

DEALERS :
DRYFISH, FISHMAWS,
SHARKFINS FISHOIL
FISH MANURE & ALL
KINDS OF FISH PROPUCTS

HEAD OFFICE : **KANDAK**
MANGALORE- 575001
Gram- SAMAK
Phone- Off. 26715
Res. 6282 Ullal.



'रसराज' साठी

हार्दिक शुभेच्छा !

**मे. वामन यशवंत पोकळे**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड एजंट

जनरल मर्चंट आणि कमिशन एजंट

**देवगड, जि. सिंधुदुर्ग.** ☎ १

शाखा– भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटड

पेट्रोल डिझेल पंप : **कासार्डे** (तरळा)

वितरक– "नर्मदा सिमेंट"

# ॥ पराजित ॥

॥ सतीश कोयंडे / तृतीय वर्ष कला ॥

रंगाची उधळण करीत पश्चिमेकडे झुकणारा सूर्य, त्याला आपल्या कवेत घेण्यासाठी क्षणाक्षणाला उत्सुक असणारा समुद्र, या अथांग अशा सागरात कुठेतरी हेलकावणारी होडकी, घराकडे वाटचाल करणारी गाईवासरं, पक्षी असं नयनरम्य वातावरण प्रेमीजनांना नव्हे; तर अबालवृद्धांनाही हवंहवंसं वाटणारं खरंच ! तासन्तास पहात राहिलं तरी कंटाळा येणार नाही आणि अशाच वातावरणाची मौज लुटण्यासाठी माणसांची नेहमीच समुद्रावर वर्दळ असते. आणि अशा वातावरणाशी माणसं समरस होऊन जातात व आनंद ओंजळ भरभरुन लुटीत असतात.

असं सुंदर वातावरण असूनही तेथे फिरायला आलेली मंजू त्या वातावरणाशी समरस न होता शून्यात नजर लावून कोणत्यातरी गूढ विचारात बसली होती. तिला कशाचंच भान राहिलं नव्हतं. पुढे काय? हा प्रश्न तिला भेडसावत होता. मावळत्या सुर्याच्या साक्षीने समुद्राच्या कवेत चिरनिद्रा घ्यावी का अर्थहीन, निराशमय जीवन जगावे आणि जगायचं तर कोणासाठी ? व मरायचं तर कोणासाठी ? हा तिला न सुटणारा प्रश्न होता.

समुद्रात हेलकावणाऱ्या होडक्यासारखी तिची अवस्था होती. आपल्या गतकालीन जीवनाचे सिंहावलोकन करीत होती. कालपर्यंत याच सुरम्य निसर्गाच्या साक्षीने मंजू या इथेच याच वाळूवर मिलींदचं नाव कोरीत होती. तिला तो छंदच जडला होता. पण आज ? आज मिलींद तिचा कोण होता ? ती मिलींसाठी जीव ओवाळून टाकायला निघाली होती. त्याच्यासाठी रात्रंदिवस झुरत होती. तिने आपले सर्वस्व मिलींदला अर्पण केले होते. मिलींदला ही गोष्टच मान्य नव्हती.

खरंच, वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी आई गेली. पण घरातील काकु-आजीच्या प्रेमळ वर्षावाने आईची उणीव भरुन निघाली होती. घरची परिस्थितीही बेताचीच होती. गावातच वडलांचं किराणा-भुसार मालाचं दुकान होतं. त्यावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालायचा.

मंजू मॅट्रिक झाली. कॉलेजशिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी आली व तिथेच खोली घेऊन राहू लागली. मंजू प्रेमळ, शांत स्वभावाची होती. सर्वांशी मिळून-मिसळून वागत असे. बाहेरच्या जगात एकटं रहावं लागल्यानं सर्व

साधारणपणे येणाऱ्या अडचणी तिच्याही जीवनात येत होत्या. याचवेळी मन नकळत कणखर, खंबीर आधाराच्या शोधात असताना मिलींदच्या रुपानें हा आधार तिला मिळाला होता. मिलींद हा तिच्याच कॉलेजमधील उमदा प्राध्यापक ! नकळत तिने घातलेल्या प्रेमाच्या सादाला मिलींदने प्रतिसाद दिला होता आणि त्यांच्या प्रेमालापाच्या जीवनालाही बरेच दिवस होऊन गेले होते.


आज ती कॉलेजमधून खोलीवर परतण्यासाठी बाहेर पडली होती. दुपारची ती शांत वेळ मनात उदासीनता निर्माण करत होती. कदाचित पुढे येणाऱ्या संकटाची ती चाहूल होती का ? मागून हाक मारणाऱ्या ओळखीच्या आवाजाने ती भानावर आली. मिलींद तिला हाक मारत होता. ब्रेक लागावा तशी ती थांबली. 'आय अॅम सॉरी मंजू',मिलींद सांगू लागला,'मंजू, मला तुझ्या प्रेमाला नकार द्यावा लागत आहे' मिलींदच्या त्या वाक्याने मंजू पूर्ण उध्वस्त झाली. भोवतालचा परिसर आपल्याभोवती फिरत आहे असे वाटले. विजेचा लोळ अंगावर कोसळत आहे की काय, असा भास तिला झाला. पण मिलींदच्या पुढच्या बोलण्याने ती भानावर आली. 'मंजू मला अजून कुटुंबाचे अनेक प्रश्न सोडवायचे आहेत की जेणेकरुन मला माझ्या आयुष्याच्या मुख्य घटनेचा अर्थात् लग्नाचा विचार ३/४ वर्षे तरी करता येणार नाही. शिवाय माझी आर्थिक परिस्थिती...'

'अरे, हाताची सारी बोटे सारखीच असतात का ? मला पैसा नसला तरी चालेल. पण स्वाभिमान, धडाडी, स्वावलंबन हे गुण मला माझ्या जीवनसाथीदारात हवेत. तुझी आर्थिक परिस्थिती माहीत असूनही तू माझाच व्हावास, हीच माझी इच्छा आहे व राहील,' मंजूने आपले मन मोकळे केले. तिला पैशापेक्षा मनाची श्रीमंती महत्त्वाची वाटत होती. दोन घास कमी मिळाले तरी चालतील; पण प्रेम, वात्सल्यासाठी ती भुकेली होती. पण मंजूच्या बोलण्याचा कोणताच परिणाम मिलींदवर झाला नाही. तो त्याच्या निश्चयाशी दृढ होता.


ज्या व्यक्तीची निवड जीवनसाथी म्हणून केली होती, ज्याच्याबरोबर सुखी वैवाहिक जीवनाची विविधरंगी स्वप्ने रंगवली होती, अनेक मनोरे रचले होते, त्याच व्यक्तीने एका शब्दातूनच ते व्यर्थ ठरवले होते. स्त्रीसुलभ विचाराप्रमाणे शेवटी मंजूनेही स्वतःच्या नशिबालाच दोष दिला,

'जीना यहाँ मरना यहाँ ।
इसके सिवा जाना कहाँ ।।'

# रंगलेले काही क्षण



संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. शां.
कृ. तथा बापूसाहेब पंतवालावलकर
"आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.
आत्मविश्वासाने वाटचाल करा."




स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे
मान. डॉ. अंबादास माडगूळकर—
"दलित समस्येकडे वेगळ्या
दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे."



स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष
प्रा. टी. सेलव्हराज
आभारप्रदर्शन करीत असताना—

## ॥ उद्याचे नेतृत्व ॥



महाविद्यालयाचे विद्यार्थी महामंडळ : सुधाकर कदम, उदय दांडेकर, श्रीकांत धुपकर, एम्. आर. खान,
प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, सीमा गानू, सतीश कोयंडे, अंकुश आचरेकर व एन्. एस्. शेख

## ॥ संपादन श्रेय ॥



डावीकडून अनुक्रमे एम्. आर. खान, प्रा. अविनाश वि. कांबळे, प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर, प्रा. लता वळसंगकर, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, सुशील राणे, सदानंद देसाई, सतीश कोयंडे व विनोद मेस्त्री.

" शव हे कवीचें,
जाळू नका हो;
जन्मभरी तो जळताचि होता ।
फुलेंहि तयावरी,
उधळू नका हो;
जन्मभरी तो फुलताचि होता ॥"

-लोककवी मनमोहन

# रसगंध

माधुरी धुपकर / द्वितीय वर्ष कला

## निळ्या नभातून

निळ्या नभातुन नुपुर विजेचें वाजले
त्याच निळ्या नभातून शद्व मेघांचे लाजले
सायलीची वेल दारी पुन्हा बघ फुलली
रुसलेली राधा गाली बघ लाजली
अबोल प्रीत सांडलेली
सागरतीरी केवड्याची नक्षी बघ काढलेली
त्याच ठिकाणी वाट तुझी पाहिली
रुसवा तुझा हा संपला
गंधात धुंद झाला
जें तू मला वाहिले
ते चंद्र चांदण्यांनी पाहिले

'रसराज' पारितोषिकप्राप्त कविता

आशा गोखले / तृतीय वर्ष वाणिज्य

## इच्छा

विश्वरुपी प्रांगणात
वाट एकटे बसावे
नभातील पक्ष्यासमवेत
स्वैरपणे भटकावे
सागराच्या निळाईत
मुक्तपणे विहरावे
वेलीवरच्या फुलासंगे
गोड निरागस हसावे
बनातील ओढ्यासंगे
मंजुळपणें गात रहावे
धरित्रीच्या हिरवळीत
शांतपणे पहुडावे
चंद्र, सूर्याप्रमाणें
स्वच्छंदी जीवन जगावे
परंतु शेवटी वाटे मनाला
विश्व या गोष्टीने
फक्त साधतो 'परमार्थ'
मानव फक्त पाहतो
आपलाच 'स्वार्थ'!

शिवप्रसाद पेडणेकर / तृतीय वर्ष कला

## मी... तू...

स्वप्नांना सत्यात
उतरवू पाहणारा......मी
स्वप्नांना केवळ
स्वप्नातच पाहणारी......तू
जन्मोजन्मी तुझी साथ लाभावी
म्हणून धडपडणारा......मी
जन्मोजन्मीच्या साथीसाठी
तडफडणारा......तू
तुझ्या प्रेमासाठी
समाजाला पायदळी तुडवणारा......मी
समाजातील प्रतिष्ठेसाठी
प्रेमाचा बळी देणारी......तू

सुनंदा भांडारी / द्वितीय वर्ष कला

## इशारा

अत्तराची बाटली......
फुटलीच तर काचा गोळा करु नकोस
उगाच काचा लागून
जखमी होशील......

फुंकर कुणी घालणार नाही
(शालू फाडून चिंधी देणारी द्रौपदी
आता कुठे भेटायला ?)
जखमा मात्र वहात रहातात.

विनोद मेस्त्री / द्वितीय वर्ष कला

## स्वप्न

तुझ्या मनाने पाहिलेलं
स्वप्न मी समजलो नाही.
रंगाविना रंगलेले
चित्र मी कधी पाहिले नाही.
हाकेवीन प्रतिसाद
कोणी कधी दिला नाही.
शब्दावीन सांगितलेला
भाव कधी समजणार नाही.
अबोल राहुनी
पाहिजे ते मिळणार नाही.

अलका हर्डीकर / द्वितीय वर्ष कला

## निसर्ग आणि माणसे

धुक्याची दुलई हलकेच दूर सारतात
गारठलेले डोंगर हळूच बाहेर डोकावतात
सुस्तावलेले दवबिंदू डोळे हळूच मिचकावतात
गवताच्या पात्यावरुन चपळाईने उडी घेतात
किरणांच्या ऊबदार स्पर्शाने झाडं तृप्त होतात
पेंगणारी रानफुले कान टवकारुन वर पहातात
प्रसन्न अशा सकाळी पक्षी आभाळात झेपावतात
निसर्ग जागा झाला तरी माणसे मात्र
सुस्त असतात
माणसे मात्र सुस्त असतात

अलका बापट / द्वितीय वर्ष कला

## आर्जव

अशी दूर जाऊ नकोस
व्याकूळ मला करु नकोस,
नुकत्याच उमलणाऱ्या कळीला
अशी कुस्करुन टाकू नकोस !
सोबत मला करतेस तर
मध्येच सोडून जाऊ नकोस,
दिलेला शब्द असा तू
परत पाठी घेऊ नकोस !
बहरलेल्या वेलीचा
आधार काढून घेऊ नकोस,
वेगळ्या वाटेने जाताना
एकटी मला टाकू नकोस !
कठोर होऊन वागू नकोस
जखमी मला करु नकोस,
दिलेली साथ अशी तू
अर्ध्यावरच सोडू नकोस !

संतोष बांदेकर / अकरावी कला

## कां ?

अथांग सागरातील अनंत लाटा परतत असतात
किनाऱ्यास येतात......कां ?
घनदाट अरण्यातील भीषण वणवा शांत होतो
पेट घेतल्याबर
तो पुन्हा प्रज्वलीत होतो......कां ?
मृगजळाने तृष्णा भागत नसते, माहीत असते
त्यामागे धाव घेतात......कां ?
मासे पाण्यातून चालतात, पण--
हवेतून चालत नाहीत......कां ?
प्रेमात तडजोड असते, संपत्तीवर नजर असते
तरीही माणसे निर्व्याज प्रेम करतात......कां ?
क्षणभंगूर जीवन पाण्याचा बुडबुडा आहे हे
माहीत असते
तरीपण आशांची गवसणी घालतात......कां ?
माशांना पंख असतात, पण माणसांना नसतात
कां......?
आज भारतात कोळसा जळताना दिसतो
दगड जळताना दिसत नाही......कां ?
सफरचंदाला आत बिया असतात
बाहेर असत नाहीत......कां ?

प्रकाश मराठे / प्रथम वर्ष कला

## वेडा मुसाफिर

स्वरस्वप्न छेडले तू
सूर लागलाच नाही,
तू धुंद मारवा हा
कधी गाइलाच नाही.

मी भेटलो कितीदा
भेटायचे म्हणून,
का राहिली उराशी
ती शुष्क आठवण ?

या जाईच्या फुलाचा
का श्वास मंद होतो,
वेड्या मुशाफिराला
समजून कोण घेतो ?

चित्ररेखा पाटणकर / अकरावी वाणिज्य

## रातराणी

रातराणीच्या इवल्या फुला तू
सुगंध देशी तिमिराला ।
दूरवर बघ कडे भिडले
अथांग आकाशाला ।
हिरवा मंद रंग तुझा
अन् कितीतरी साधा वेश ।
वेलीवरील दोन पर्णांचा
फक्त तुझा तो देश ।
सांग का लाजसी
पानाआड लपूनी ।
तिमिराला काय सांगशी
गोष्टी तुझ्या दुरूनी ।
तुझा दिवस का अबोला
गुलजार त्या जुईशी ?
तिमिर फसवून घेतो
तुझा मादक गंध उशाशी ।

चित्ररेखा पाटणकर / अकरावी वाणिज्य

## पण–

सागराच्या लाटांवर तरंगायचं होतं
पण लहरच झाले नव्हते......
रातराणीच्या झुल्यावर गीत गायचं होतं
पण गंधच झाले नव्हते......
आकाशातून सुंदर विहरायचं होतं
पण पाखरूच झाले नव्हते......
सागराच्या निळाईत प्रतिबिंब पहायचं होतं
पण चांदणीच झाले नव्हते......
गुलजार फुलांचा स्वेद घ्यायचा होता
पण भृंगच झाले नव्हतें......
आकाशातल्या निळाईत डुंबायचं होतं
पण मेघच झाले नव्हतें......

राजेंद्र हिंदळेकर / प्रथम वर्ष कला

## पांथस्थ

विसरायचा प्रयत्न करतो,
आणि पुन्हा पुन्हा तुला आठवतो.
भंगली ती स्वप्ने त्या शपथा,
तू गेलीस सोडून मला दुजा पथा.
वाया गेले सर्व ते कुजबुजणे,
लचकले कसे मध्येच ते प्रेमगाणें ?
ठरले ते माझे अपुरे स्वप्न,
आणि झाले सारे उदास अन् भग्न.
मी विसरतो ज्यावेळी तुज,
वाटते सारखे तू आहेस संग.
विसरु कसा मी, मला नाही स्वास्थ्य,
तुझी वाट पाहणारा मी एक पांथस्थ.

नथुराम उपरकर / प्रथम वर्ष कला

## तुझाच

गालातल्या गालात तू
गोड गोड हसू नकोस,
कोवळ्या चांदण्यात
मंद तू होऊं नको !

जाईचा गंध तुझा
पाश त्याचा तोडू नको,
हेलावणाऱ्या गंधात
मला तू गुंतवू नको !

प्रीतीचें बाण ते
दृष्टीने फेकू नको,
नजरेनें घायाळ मी,
आणखी विद्ध करु नको !

उषेच्या आगमनात
गोड हाक मारु नको,
धीर धर तू थोडा
घाईत अशी येऊ नको !

वसंत हा तारुण्याचा
पारिजात हलवू नको,
तुझाच आहे सखे मी
उगीच अशी डवरु नको !

विलास राणे / प्रथम वर्ष वाणिज्य

## स्मृती

असाच एक दिवस येतो
सारे जीवन उजळून जातो,
स्मृती साऱ्या जिवंत करतो
असा दिन सुदिन ठरतो ॥१॥

असाच एक दिवस येतो
प्रेमपाश तोडून टाकतो,
आत्मा मात्र तळमळत असतो
प्रीतीसाठी झुरत असतो ॥२॥

असाच एक दिवस येतो
गतजन्मीची गाठ घालतो,
संसारचक्र हाती देतो
सारे जीवन गुंतवून जातो ॥३॥

असाच एक दिवस येतो
सारे जीवन कष्टमय करतो,
काटेरी जाळे पसरुन जातो
जीवन दुःखी करुन जातो ॥४॥

असाच एक दिवस येतो
मृत्यूलाही आव्हान देतो,
शरीर देह नष्ट करतो
स्मृती मागे ठेऊन जातो ॥५॥

प्रकाश सारंग / प्रथम वर्ष वाणिज्य

## निद्रिस्त ज्वालामुखी

या देशात–
तरुणांना विकावी लागतात
त्यांची स्वप्नभग्न धवल स्वप्ने,
या पंखविहीन आकाशझेपेच्या बदल्यात!
लाचारीच्या, निलाजऱ्या या जगात
उभार आकांक्षेची राखरांगोळी होते आहे.
कापावे लागतात पंख
गरुडझेप घेणाऱ्या पाखरांचे,
गहाण ठेवावी लागतेय जीवनाची सारी उभारी,
कापलेल्या पंखांनी मारलेल्या
भरारीच्या बदल्यात!
दारिद्र्यात धुमसवलेले हे ज्वलंत ज्वालामुखी
मनातच गोठवावे लागतात.
या निद्रिस्त ज्वालामुखीचा उद्रेक होणारच आहे,
फक्त यायची आहे ती वेळ
करायची आहे फक्त प्रतीक्षा, बस्स!

प्रकाश सारंग / प्रथम वर्ष वाणिज्य

## कां ?

तू कशी दिसत होतीस,
ते आठवण्याचा प्रयत्न करतोय.
नजर मिळवावी आकाशाच्या तटस्थतेशी
तर दिसतात तुझे मृदु मुलायम हात
चंद्रबिंबावरुन रेशमासारखे फिरताना,
पण क्षणार्धात ते असे पांढरेफेक कां पडतात ?
त्या चंद्रालाच पडलेल्या खळग्यासारखे!
सायंकाळी गणेशमंदिरात किणकिणणाऱ्या घंटा
चित्र रेखाटतात माझ्या मनात
तुझ्या डोळ्यावर लहरणाऱ्या अवखळ बटेचं!
पण दिवेलागण होताच तुझ्या गुलाबी बांगड्या
कां डसतात दुखावलेल्या नागासारख्या ?
कधी होतो भास गुलमोहोरावर
तुझे रक्तिमा ल्यालेले नाजूक ओठ पाहिल्याचा,
कधी होतो भास जहाजाच्या डोलकाठीवर,
तुझ्या मनाचा ' सीगल ' स्थिरावल्याचा,
कधी कृष्णकमळाच्या वेलीवर दिसतात,
तुझ्या भुवयांच्या कमानी,
कधी तळ्याच्या संथ पृष्ठभागावर होतो भास,
गालावरील खट्याळ खळीचा.
प्रयत्न न करताही सारं सहज आठवतंय,
जसे नुकतेच पाहिलेल्या चित्रपटासारखे.
पण फसवतात ते तुझे डोळे
तळ नसलेल्या डोहासारखे.
काळोखात तुडुंबलेले
दोन बदाम मनात ठसलेले.
हा बुब्बुळ नसलेला निव्वळ काळोख
आणि माझी विसरभोळी नजर
सारखा प्रयत्न करतेय पण काहीच जमत नाही
असं कां ?



श्रीकांत गावकर / अकरावी कला

## तारुण्य

भर तारुण्यात निश्चल असता
काळवंडलेले गगन पाहून
ऊर भरुन आले
पाहता--- पाहता---
मेघराजा आला धावून
सुगंधमाता दरवळे न्हाऊन
सुवासिकतेने नासिक भरले
चर्येवरती हास्य तरळले
क्षणभरीचा हा खेळ पाहुनी
झालो मी धुंद
मजला वाटे---
वारीमध्ये नाचावे
तारुण्याच्या भवसागरी
जीवनी हसावे फुलावाणी.

बिना सहकार नहीं उद्धार !

# देवगड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड

## देवगड, जि. सिंधुदुर्ग

शेतीसाठी रासायनिक खते, कीटकनाशक औषधे, दारु सामान, लोखंडी सामान, स्प्रे पंप इत्यादींचा पुरवठा करणारी एकमेव संस्था

हापूस आंबा व इतर फळझाडांसाठी रॅलीमिल,
सुफला व संपूर्णा खते वापरुन भरघोस पीक मिळवा.

जिल्ह्यातील सर्वाधिक खत विकणारी एकमेव संस्था

अधिकृत विक्रेते-- १) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित.
२) रॅलीज इंडिया लिमिटेड.

रा. रा. खानविलकर
मॅनेजर

र. य. राणे
चेअरमन

# निरोप



"शिक्षणाचे कार्य अनेकांच्या सहकार्याने चालत असते. संस्थेने मला पूर्ण स्वातंत्र्य दिले. म्हणूनच मी थोडाफार यशस्वी होऊ शकलो. याचे खरे श्रेय संस्थेला आहे हे मी कृतज्ञतापूर्वक सांगतो. चन्द्रकांत मणी फक्त चंद्रप्रकाशात पाझरू शकतो. चंद्रप्रकाश नसेल तर तो पाझरणार नाही. संस्था चंद्रप्रकाश होती म्हणूनच आम्ही पाझरत होतो. रामायणात सेतुबंधाची गोष्ट आहे. इवल्याशा खारीने त्या कामात जो सहभाग घेतला त्याने प्रसन्न होऊन प्रभू रामचंद्रांनी तिच्या पाठीवरून हात फिरवला. ते हाताचे पट्टे आजही दिसतात. मी येथून जाताना संस्थेने माझ्या पाठीवरून फिरवलेल्या हाताचे पट्टे असेच दिसत राहतील !

गेल्या आठ वर्षाचा माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा काळ मी देवगडला काढला. माझ्याकडून काही चुका घडल्या असतील तर मला क्षमा करा.


माझे आठ वर्षांच्या आयुष्याचे क्षण हे उरलेल्या आयुष्यापेक्षा जास्त मोलाचे आहेत.

देवगडसंबंधी माझी भावना–

नाते तुझे नि माझे, शब्द स गुंफले मी
वाटेतल्या फुलांना सांगून ठेवले मी !
अशीच सदैव राहील

(प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या निरोप-समारंभातील भाषणातून)

# स्वागत



ह्या स्वागताने मी भारावून गेलो आहे. आपण सर्वांनी ज्या वेगवेगळ्या अपेक्षा व्यक्त केल्यात त्या साऱ्या पुऱ्या करण्याचा मी पुरेपूर प्रयत्न करेन. विद्यार्थ्यांना आपले प्रश्न घेऊन संस्थाचालकांकडे जावं लागलं तर मी कमी पडलो असं होईल; असा प्रसंग मी येऊ देणार नाही.


खरं तर कला नि वाणिज्य या शाखांचं शिक्षण देणारी महाविद्यालये ही जीवनाचं खरं शिक्षण देणारी ज्ञानमंदिरे होत. विद्यार्थीवर्गावर टीका करीत असताना ते ज्या समाजात वाढताहेत त्याचा संदर्भ आपण लक्षात घेत नाही. कवी अनिल म्हणतात त्याप्रमाणे 'भावनांना चेव नाही. यौवना आव्हान नाही संघर्ष नाही, झुंज नाही,' अशी आज सर्वत्र अवस्था आहे. पण माझ्या विद्यार्थ्यांबद्दल मी आत्मविश्वास उराशी बाळगून आहे. आणि म्हणूनच अनिलांच्या सुरात सूर मिसळून मला म्हणावसं वाटतंय–

सारीकडे काळोख आहे
अंतरंगी त्यातही पण
ओळखीचा प्रकाश आहे !

(प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांच्या स्वागतसमारंभातील भाषणातून)

# श्रद्धांजली

आमचे देणगीदार



यशवंतराव नाईक
तुमच्या स्मृतीस आमचे अभिवादन !

आता फक्त स्मृती राहिल्या !



अविनाश सारंग,
तू गेलास
आणि महाविद्यालयातील
चैतन्य गेले.

★

१९८२-८३ या शैक्षणिक वर्षी आम्ही पुढील थोर व्यक्तींना मुकलो.

भूदान चळवळीचे प्रणेते व एक थोर गांधीवादी नेते आचार्य विनोबा भावे यांच्या निधनाने गांधीयुगाचा शेवटचा दुवा निखळला. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ चिंतामणराव देशमुख यांच्या निधनाने एका थोर प्रशासकाला आमचा देश मुकला.

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणमंत्री श्रीमती शरच्चंद्रिका पाटील यांच्या निधनाने स्त्रीमुक्ती चळवळ पोरकी झाली.


नामवंत प्रकाशक ह. वि. मोटे यांच्या निधनाने मराठी प्रकाशन व्यवसायातील प्रकाश हरपला.

तसेच सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष ब्रेझनेव्ह, संसदपटू पिलू मोदी, शिक्षणमहर्षी दादासाहेब रेगे, शिक्षणतज्ज्ञ सी. रा. तावडे, अभिनेत्री इंदिरा चिटणीस, दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी, मराठीतील थोर साहित्यिक अच्युत बर्वे, सोपानदेव चौधरी, सदानंद रेगे, नामदेव व्हटकर व वि. ह. कुलकर्णी या वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांच्या निधनाने ती ती क्षेत्रे पोरकी झाली.

"कोणतीही व्यक्ती घेतली तर एका बाजूने परिस्थितीचा तिच्या मनोव्यापारांवर परिणाम होत असतो, व दुसऱ्या बाजूने तिचे ते बदलते मनोव्यापार तिच्या शब्दांत व कृतींत व्यक्त होत असतात; व त्या शब्दांनी व कृतींनी तिच्या परिस्थितीत बरावाईट बदल होत असतो. एखाद्या परिवर्तनशील वस्तूच्या पृष्ठावर प्रकाशकिरण पडावे व पुन्हा वक्री होऊन फेकले जावे तद्वत परिस्थिती व व्यक्तीचे मन यांचे आहे."

**कै. ना. सी. फडके**

'प्रतिभासाधन, पृ. ११० – १११



# तीन व्यक्ती - तीन प्रतिक्रीया

## ॥ आठवणी दाटतात ॥

॥ अलका हर्डीकर / द्वितीय वर्ष कला ॥

प्रत्येकाच्याच आयुष्यात कोणती ना कोणती गोष्ट मनाविरुद्ध घडत असते. ती गोष्ट तशी घडू नये असं आपल्याला खूप वाटत असतं. एवढंच काय पण ती तशी घडू नये म्हणून आपल्या परीने आपण शक्य तेवढे प्रयत्नही करीत असतो. परंतु शेवटी घडायचं तेच घडतं आणि आपण पराजयी होतो. अनेक वेळा जीवनात विचित्र योग येतात. प्राचार्य मयेकर सरांसारख्या विद्यार्थीप्रिय माणसाचं कॉलेज सोडून जाणं हाही असाच एक दुर्दैवी योग ! व्यक्तिश: माझ्याशी त्यांचा फक्त एक वर्षापुरताच संबंध आला, परंतु त्या अल्प कालावधीतच सरांबद्दल इतरांप्रमाणे मलाही खूप आपुलकी निर्माण झाली आणि खरोखरच कॉलेजमध्ये येण्यापूर्वीची 'प्राचार्य' या शब्दाची कल्पनेतली व्याख्या पार चुकीची ठरली. खरं तर केवळ एका वर्षाच्या सहवासाने त्यांची ओळख करुन देणं म्हणजे काळोख्या रात्री लुकलुकणाऱ्या काजव्याने मध्यान्हीच्या परम तेजोमय सूर्यनारायणाची जगाला ओळख करुन देण्यासारखं हास्यास्पद ठरेल. परंतु हास्यास्पद ठरणाऱ्या गोष्टीसुद्धा काही वेळा कराव्या लागतात आपल्या इच्छापूर्तीसाठी !

मयेकर सरांची आणि माझी पहिल्यांदा ओळख झाली मी कॉलेजमध्ये एफ्. वाय्. ला ॲडमिशन घेतली तेव्हा ! त्यापूर्वी त्यांच्याबद्दल बरंच काही ऐकलं होतं आणि त्यामुळे एवढा मोठा माजी शिक्षण मंत्री आपल्याला प्राचार्य म्हणून लाभणार, याबद्दल खूप आनंद झाला आणि खरोखरच माझा हा आनंद अद्यापही कायम आहे. कारण निदान एक वर्ष का होईना, पण त्यांचा सहवास लाभला, हे मी फार मोठं भाग्य समजते. ह्या व्यक्तीनें जीवनात येऊन अनेक क्षेत्रं न्याहाळली. केवळ एकच एक ध्यास घेऊन ते गप्प बसले नाहीत, तर राजकारणातही तेवढाच रस घेतला. शिक्षणाच्या क्षेत्राला तर वाहूनच घेतलं होतं. ते उत्कृष्ट वक्ते तर होतेच. वाणीची अमोल देणगी तर ईश्वराने त्यांना भरभरुन दिली होती साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी खूप काही कमावलं आणि विद्यार्थ्यांना तें सढळ हस्ते दान केलं. वर्गात शिकवत असताना किंवा एखाद्या विषयावर व्याख्यान देताना तर अक्षरश: 'देता किती घेशिल दो कराने' अशी आमची सर्वांचीच अवस्था होत असे. व्याख्यान देताना विषय कोणताही असो, पण श्रोत्यांना स्वत:कडे केंद्रित करुन घेण्याची कला त्यांच्या रक्तातच भिनलेली ! त्यामुळे त्यासाठी त्यांना फारसा प्रयास कधीच करावा लागला नाही. ज्ञानेश्वरीतील ओव्या त्यांच्या तोंडून ऐकताना तर अगदी स्वर्गप्राप्तीचा आनंद

मिळे. ज्ञानेश्वरीवर त्यांचं फार प्रभुत्व होतं. त्यातील ओव्यांचे पाठांतर बघून अक्षरश: थक्क व्हायला होतं. मला तर नेहमीं वाटायचं की, सरांच्या मेंदूची रचना काही वेगळ्या प्रकारची आहे की काय? एवढी स्मरण-शक्ती त्यांच्याकडे आली तरी कोठून? आम्हाला एस्. वाय्. ला आलं की बारावीच्या कविता विसरायला होताल आणि सरांना एम्. ए. झाल्यानंतरही मराठी शाळेतल्या कविता आठवतात. खरंच त्यांची महती कोणत्या शब्दात वर्णावी, कळत नाही. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी, हे तत्व सरांनी अंगिकारलं होतं. प्रिन्सिपॉल म्हणून अगदी सूट, बूट, टाय असा पोषाख त्यांनीं कधीच केला नाही. विचारांच्या बाबतीत मात्र ते नेहमीच आधुनिकतेचा स्वीकार करीत आले. त्यांच्या या बहुढंगी व्यक्तिमत्वाचे ठसे मराठीच्या विद्यार्थ्यांवर जास्त उमटले. कारण सरांच्या शिकव-ण्याचा अलभ्य लाभ मिळवताना आम्हाला त्यांची अधिक जवळून ओळख झाली. त्यांच्या तासाच्या वेळीं आमच्या काहींची फार विचित्र परिस्थिती व्हायची. कारण त्यांच्या तोंडून बाहेर पडलेलं वाक्यन् वाक्य आ-म्हाला महत्वाचं वाटायचं आणि मग लिहून घेण्यासाठी फार धडपडत रहायचो. पण त्याचवेळीं त्यांची वाणी एवढी भुरळ पाडायची की, ऐकण्याच्या त्या तंद्रीतून बाहेर येऊन लिहून घेण्याचं भान राहात नसे. आणि मग पश्चात्तापाने मन उद्विग्न होत असे

सरांची खोली म्हणजे जणू काही पुस्तकांचे भांडारच ! खोलीचं कुलूप काढल्यावर ही सरस्वती नेहमीच त्यांच्या स्वागताला सिद्ध असे. सरस्वतीच्या सान्निध्यात राहा-णाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व कसें फुलत जाते, हे सरांच्या सहवासात कळले. विशेषत: मी अनेक प्रकार-च्या मार्गदर्शनासाठीं, सल्ला घेण्यासाठी नेहमी सरांकडे जात असल्यामुळे मला सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू जास्त जाणवले. जीवनात येणाऱ्या अनेक अडीअडचणीं-वर मात कशी करावीं, हें त्यांनीच मला शिकवलं. 'प्राप्तीपेक्षा प्रयत्नांचा आनंद जास्त असतो' ह्या त्यांच्या शिकवणुकीमुळेच मला प्रत्येक चळवळीत सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली.

'रसराज'साठीं हार्दिक शुभेच्छा !



दुकान : १५
निवास : ७३

बशीर हासन मेमन
फिशमिल व मासळी खताचे निर्माते
मु. पो. देवगड, जि. सिंधुदुर्ग. ४१६६१३

प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेल्या या कणखर ध्येयनिष्ठा, शिस्त, हिंमत, दीर्घ परिश्रम असे अनेक गुण होते. विशाल बुद्धिमता हे तर त्यांचं वैभवच होतं. या सर्वांबरोबरच त्यांच्याकडे मनमिळावूपणाही होता. त्यामुळेच तर ते आमच्यात एवढे प्रिय झाले. प्रिन्सिपॉल आणि विद्यार्थी यांच्यातलं दुरावाचं नातं त्यांच्याठिकाणी कधीच जाणवलं नाही. अशा या स्वच्छंदी, हसतमुख सरांच्या सहवासाला आम्ही विद्यार्थी दुरावलो, तरी त्यांचं रुप, त्यांच्या आठवणी, त्यांनी केलेलं मार्गदर्शन, सढळ हाताने दिलेलं विद्यारूपी दान हे आमच्यापासून केंव्हाच दुरावणार नाही, एवढं निश्चित !

सरांची उदाहरणे देण्याची पद्धत विशेषत: लक्षात घेण्यासारखी होती. उदाहरण कवितेतील असो किंवा कुठलेही असो, नेहमी ते वास्तव जीवनाचा संदर्भ सांगायचे आणि त्याचवेळी त्याचा समानतेने, विश्वाच्या निसर्गाच्या व्यापकतेशी संदर्भ असायचा.

उदा.– सखी तू अशी रुसल्यावरी
रुसतो नभातील चंद्रमा

त्यांनी जरी बरेच असे साहित्य निर्माण केले नसले तरी आपल्या जवळील प्रतिभेच्या सहाय्याने निसर्गातल्या घडामोडींचे यथार्थ संगीत त्यांच्या वाणीनें ऐकण्यात एक प्रकारची वेगळी अनुभूती मिळायची. ते वर्णन करत असताना शिशिरातली पर्णझड असो की चैत्रातली पालवी असो, मानवी मनातला रुसवा असो की लोभ असो, तुकारामाचे अभंग असोत की डिस्को संगीत असो त्यातली मानवी जीवनाशी संबंधित अशी ऋणानुबंधाची नातीच जणू ते गुंफून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करायचे. बरं, हे करत असताना अर्थानें सारखे वापरुन गुळगुळीत झालेले मराठीतले शब्द नव्याने वापरण्याचा त्यांचा अट्टाहास होता. त्यामुळे मराठीच्या भांडारातले नवेनवे शब्द आमच्या समोर यायचे. दररोजच्या व्यवहारी जीवनात आपल्याला आपल्या समोरच्या चराचराची आणि त्यांच्या लय आणि तालाचा सूक्ष्म अभ्यास करण्याची सवय लागली तर आपल्या रूक्ष जीवनात सुद्धा कायम प्रसन्नतेचे मळे निर्माण होऊ शकतात, हे सरांमुळेच आम्हाला जाणवलं!

---

## ॥ आजकालचे शब्दार्थ ॥

॥ संग्राहक : शुभदा जोशी / तृतीय वर्ष वाणिज्य ॥

**विवाहसंस्था** : दोन जिवाचे वेल्डिंग करण्याचा कारखाना.
**वैद्यकशास्त्र** : नसलेल्या व्याधी निर्माण करण्याचे शास्त्र.
**मानसशास्त्र** : असलेल्या व्याधी जास्त प्रमाणात निर्माण करण्याचे शास्त्र.
**कुशाग्रबुद्धी** : दर्भाच्या किंवा गवताच्या टोकावर मावेल एवढी बुद्धी.
**म्हातारपण** : तरुणीकडे अधिकारदृष्टीने पाहण्याचे वय.
**धक्का** : जो बायकांनी पुरुषाला मारला तर मेहरबानी समजली जाते.
व पुरुषानी बायकांना मारला तर विनयभंग होतो.
**चुंबन** : पैसे खर्च न करता मिळणारी साखर.
**विदुषी** : विदुषकाची बायको.
**विधिमंडळ** : जेथे हात वर करणे एवढाच विधी असतो ती जागा.

देवगड महाविद्यालयाला
आणि
"रसराज"ला हार्दिक शुभेच्छा !

**निर्मल फिशरीज**

**देवगड**

(१८०१, पऱ्याची आळी, रत्नागिरी)

रसराजला आमच्या—

卐 हार्दिक शुभेच्छा ! 卐

श्री. ल. य. कोयंडे
संचालक, रत्नागिरी जिल्हा
मच्छिमार सहकारी संघ

मालक :
रामदास लाँच
भागिरथी लाँच

रसराज या वार्षिक अंकासाठी—
हार्दिक शुभेच्छा !



**प्रविण बी. विलणकर**

**प्राऊन्स अँड फिश सप्लायर्स**

रत्नागिरी ० देवगड

## ॥ नव्या पहाटेची चाहूल ॥

॥ सुनंदा भांडारी / द्वितीय वर्ष कला ॥

यंदाच्या शैक्षणिक वर्षाची सुरवातच मुळी प्राचार्य मयेकर देवगड सोडून जाणार...... अशा बातमीने झाली. नेहमीप्रमाणेच जसं सर्वांच्या बाबतीत होतं तसं झालं. आताच कुठे कॉलेजवृक्षास बहर यायला लागला होता, त्यांना गोड फळे येत होती. अशा या वृक्षाला खतपाणी घालणारा, त्याला प्रेमाने वाढवणारा एक माळी आता जाणार— त्याच्या जागी नवीन कोणीतरी येणार हें निश्चितच होतं. पण येणारे नवीन प्राचार्य कसें असतील ? हा प्रश्न सगळ्यांनाच भेडसावत होता. कॉलेजचे संचालक मंडळ, विद्यार्थी, हितचिंतक आणि ह्या परिसरातील नागरिक या साऱ्यांनी अशाच मन:स्थितीत मयेकरांना निरोप दिला. म्हणजे हातचं सुटलं होतं आणि पुढं काही पळतंच नव्हतं. अशाच स्थितीत कॉलेज चार महिने चाललें. मुलं कॉलेजमध्ये जात होतीं आणि परतत होतीं. पण फारसें कार्यक्रम होत नव्हते, मुलांना विशेष रस असणारी अशी निवडणूकही रेंगाळली होती. आता कसं होणार ? कसं होणार ? हा प्रश्न भेडसावू लागला होता विद्यार्थ्यांनाही आणि संचालक मंडळालाही.

अशा परिस्थितीत १५ जानेवारी हा दिवस उजाडला. नेहमीसारखाच दिवस. पण एकेका दिवसाचं महत्व तो उजाडल्यावर, त्याचीं किरणं फाकायला लागल्यावर लक्षात येतं. नूतन प्राचार्यांच्या स्वागताचा तो दिवस होता. खरं तर आता हाही एक तोचतोचपणा असलेला सोपस्कार होऊन बसलाय. नवीन कोणी आलं की स्वागत करायचं, स्तुतीसुमने उधळायची, वरवरचा आशावाद बोलून दाखवायचा आणि त्याला उत्तर म्हणून आलेल्यांनाही अनेक आश्वासने, थोडंस बौद्धिक वगैरे द्यायचं हे नेंहमीचं चित्र. पण त्या दिवशी बदल घडला तो नेमका इथेच. एकेकाचं वेगळेंपण कृतीच्याही पूर्वी बोलण्यातून लक्षात येतं. नूतन प्राचार्य बोलायला उभे राहिले आणि त्यांनी पहिल्यांदाच सांगून टाकलं, ‘ मी कोणतीही आश्वासनें देणार नाही, बौद्धिकही देणार नाही. मी तुमच्याशी थोडंस हितगूज करणार आहें.’ आणि खरोखरच त्यांच्या थोड्याशा हितगुजानेंच आमच्यातील अनोळखीपणा संपून त्याचक्षणी आमच्यात एक जिव्हाळ्याचा बंध निर्माण झाला. बोलणं आणि करणं यात संगती राखणारे दिवस आता येणार याची ती चाहूल होती, विद्यार्थ्यांच्या जीवनात नवचैतन्य येऊन त्यांना विकासाच्या नवनव्या वाटा निर्माण करुन आमच्यात आत्मविश्वासाच्या जाणिवेचे संक्रमण झाल्याची ती संक्रांत होती ! नव्या विचारांची, नव्या उपक्रमांची,

नव्या श्रद्धेची ती जणू सुरवात होती. जीवनातील महत्वाच्या घडामोडीची ती प्रभात होती.

आदल्याच दिवशी संक्रांत होऊन गेली होती. संक्रमण सुरु झालं होतं. लहान दिवस आणि मोठ्या रात्रीचं निसर्गचक्र बदलायला सुरवात झाली होती. अंधारात गुजरणारा दिवसाचा बराचसा वेळ हळूहळू उजेडाकडे वळायला लागला होता. हा निसर्गातील एक बदल, नूतन प्राचार्यांच्या आगमनाने आमचं कॉलेजही संक्रमणाभिमुख झालं.

गेली काही वर्षं कॉलेजचं कार्य चांगल्याप्रकारे सुरु होतंच. नवे नवे उपक्रम हाती घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना जास्तीत जास्त संधी देण्याचे प्रयत्न सुरु होते. पण बाहेरच्या समाजात मात्र कॉलेजबद्दलची अप्रीती वाढत चालली होती. त्याची झळ, बोच आम्हा विद्यार्थ्यांपर्यंत वारंवार, कोणत्या ना कोणत्या कारणावरुन येऊन पोचत असे. काही तरी चुकतंय, खटकतंय असं अधूनमधून वाटत राहयचं. नेमकं दुखणं कुणाला उमजलं होत की नाही, हे सांगणं मात्र कठीण होतं. अशा एका विशिष्ट वेळी ही संक्रांत उजाडली.

नूतन प्राचार्यांनी आगमनानंतर लगेच काही नव्या आणि हव्या वाटणाऱ्या सुधारणा घडवून आणायला सुरवात केली, ती देखील कोणत्याही प्रकारचा गाजावाजा भपका न करता; आज कॉलेजमध्ये पूर्वी कमी प्रमाणात अनुभवलेलं वक्तशीरपणाचं, शिस्तीचं वातावरण निर्माण होऊ लागलंय. अर्थात शिस्त म्हणजे कोरडा ताठरपणा, बंदिस्तपणा नव्हे. आवश्यक तेवढी किमान शिस्त पाळून मनमोकळं, नैसर्गिक खुलं वातावरण राहू शकतं आणि ते अधिक सुखावणारं असतं. कुलकर्णी सरांच्या आगमनापासून ह्या नव्या वातावरणाची चाहूल लागली आहे. कुठल्याही माणसावर चटकन् छाप पाडणारं दर्शनी आकर्षक व्यक्तिमत्व त्यांना कदाचित लाभलं नसेल, पण त्यांच्या वागण्यातून, वावरण्यातून एका आगळ्या व्यक्तिमत्वाचं दर्शन घडतं. आणि ते पुरेसं प्रभावी असतं. त्यांची साधी,

रॅलिफॅन्स, मेरिट शिलाई मशीन,
बॉम्बे पेंटस्
तसेच सर्व प्रकारच्या स्टेशनरी मालाचे
स्टँडनजिक एकमेव विक्रेते !

मे. गणेश ट्रेडर्स

मेनरोड, एस्. टी. स्टँड शेजारी, देवगड
प्रोप्रा : पी. एन्. लिमये

महाराष्ट्र राज्य लॉटरी एजंट

रसराज या वार्षिक अंकाला आमच्या
☆ हार्दिक शुभेच्छा ☆

देवगड महाविद्यालय व
वार्षिक अंक 'रसराज'साठी आमच्या
卐 हार्दिक शुभेच्छा 卐

★

श्री. लतीफ शरफुद्दीन मुल्ला
मु. पो. वाघोटण
ता. देवगड

सालस प्रेमळ पण आवश्यक तिथे जरुर तेवढी कठोर वागणूक विद्यार्थ्यांना आपलेसे करुन घ्यायला पुरेशी आहे. आमच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक नाबरसर निवृत्त झाले, तेव्हा कुणीतरी म्हणालं होतं की, 'भितीतून निर्माण झालेल्या आदरापेक्षा प्रेम व आदरातून निर्माण झालेला दरारा व त्यातून निर्माण झालेली शिस्त ही खरी असते. आणि ती अधिक काळ टिकतेसुद्धा संस्थेच्या व विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशा शिस्तीची गरज असते.' आज नूतन प्राचार्यांना पाहिल्यावर, अनुभवल्यावर हे उद्गार प्रकर्षाने जाणवतात— तेव्हा समजले नव्हते. पण आता समजतात, पटतात !

मयेकर सरांच्या शिकवण्यात संतवाङ्मय आणि विशेषत: ज्ञानेश्वरीचे दर्शन सतत घडत असे; तर कुलकर्णी सरांच्या व्याख्यानामधून आजवर अपरिचित असलेल्या इंग्रजी साहित्याची नवी ओळख होत रहाते. मयेकर सरानंतर मराठी कोण शिकवेल ? कसं शिकवेल ? या शंकांनी पोटात गोळा उठायचा. पण काहीसा खालच्या आवाजात, नर्म विनोद करत शिकवणाऱ्या कुलकर्णी सरांनी ही शंका शिल्लकच ठेवली नाही. आता मयेकर सरांची आठवण झाली तरी उणीव जाणवत नाही. आता तर येत्या वर्षी विद्यार्थ्यांसाठी दोन नवे विषय— इंग्रजी व मराठी (पूर्ण) उपलब्ध होत आहेत. अभ्यासाची दोन नवी दालनं उघडी होत आहेत. स्पेशल मराठी घेण्याची विद्यार्थ्यांची तीव्र इच्छा लक्षात घेतल्यावर स्वत: अधिक त्रास घेण्याची तयारी दाखवून तर त्यांनी सर्वांसाठी एक नवा आदर्श स्वत:च्या वागणुकीतून घालून दिला आहे. आता आम्ही त्याचा किती फायदा घेतो हा प्रश्न आहे.

या शैक्षणिक वर्षाची सुरवात अनिश्चिततेत, निराशेत झाली खरी; पण त्याचा शेवट मात्र गोड झाला आहे, निश्चितीचे आश्वासन देऊन झाला आहे. परिक्षांचा चांगला निकाल लागणं हे त्यावर कळस चढवण्यासारखं ठरेल. प्राचार्यांनी सुरु केलेल्या नवीन उपक्रमात आम्ही त्यांना पूर्ण सहकार्य देऊन कॉलेजची वाटचाल यशोमंदिराकडे नेण्यासाठी सतत प्रयत्नशील राहू, हे नि:संशय !

****

## ॥ विनोद ॥

॥ संग्राहक : जयंत साटम / अकरावी कला ॥

### वेडा आणि शहाणा

एकदा एक मंत्रिमहाशय वेड्यांच्या इस्पितळाला भेट देण्यासाठी गेले. सुधारु लागलेल्या वेड्यांच्या विभागात गेल्यानंतर तिथल्या एका वेड्याची सहज चाचणी घेण्यासाठी त्याच्या कानाला हात लावून त्यांनी विचारले.

"हे काय ?" "कान," वेडा उत्तरला "शाबास !" मंत्रिमहाशय,—

"पण समजा हा कान कापून काढला तर काय होईल ?"

"काय म्हणजे, ऐकायला येणार नाही," वेडा म्हणाला.

"अरे वा ! तू चांगला सुधारलास हं, पण काय रे ! दुसरा कानही कापून काढला तर काय होईल ?" मंत्रीपृच्छा.

"वा महाराज ! मग तर मुळीच दिसणार नाही ना !," वेडा पटकन् म्हणाला.

मंत्रिमहाशयांचा उजळलेला चेहरा काहीसा पडला. ते म्हणाले,

"कानांचा नि डोळ्यांचा काय संबंध रे ? शुद्ध वेडाच आहेस तू !"

"मंत्रिमहाशय ! आपण वेडे आहात," वेडा उत्तरला, "माझे दोन्ही कान कापल्यावर मला चष्मा तरी घालता येईल का ? चष्म्याशिवाय मला दिसत नाही ना !"

'रसराज'ला आमच्या हार्दिक शुभेच्छा!

**गुरुनाथ शांताराम शिरसाट**
किराणा मालाचे व्यापारी,
देवगड, जि. सिंधुदुर्ग.

'रसराज'साठी हार्दिक शुभेच्छा!



**श्री. के. जे. ठाकूर**
**श्री. व्ही. जे. ठाकूर**
आंबे बागाईतदार,
मु. पो. आमसंडे (वळकुवाडी) ता. देवगड

## ॥ तयाचा वेलू नेला....॥

॥ माधुरी धुपकर / द्वितीय वर्ष कला ॥

बरेच दिवसापासुन मॅडमबद्दल खूप काहीतरी व्यक्त करावंसं वाटतंय, पण शब्दच आकार घेत नाहीत. आजसुद्धा हे कितपत व्यक्त करु शकेल याबद्दल साशंकच आहे. तरीपण मनातले भावतरंग व्यक्त करावेत असं फार तीव्रतेनं वाटतंय. कुठलीच् गोष्ट अवघड नसते. आपण अनुभवातून खूप काहीतरी सजीव शिल्प तयार करु शकतो. पण हे मनापासून करु तेंव्हाच. याचा प्रत्यय आज निश्चित येत आहे.

आपण महाविद्यालयात प्रवेश घेऊ, एखादी डिग्री मिळवू व ती मिळवताना खूप चांगली माणसं भेटतील जी मायेचा ओलावा देऊन व्यक्तिमत्व सपन्न करण्यास परिश्रम घेतील, असं कधीच वाटत नव्हतं सत्यात न उतरणारी स्वप्नं रंगवीत आहोत, असं उगाचच वाटायचं. पण डिग्री घेण्यापूर्वीच स्वप्नपूर्तीच समाधान आज लाभतंय. वादळात सापडलेली नौका तुफानाच्या वेगामुळे अडखळत आपला प्रवास करीत असतानाच त्या नौकेला अंधाऱ्या रात्री प्रकाशज्योत दाखवली होती त्या ओळखीच्या प्रकाशातच आज माझ्या जीवनात ज्ञानदीप तेवत आहे.

कॉलेज जीवनाला सुरवात करताना प्रथमच आई-वडिलांना सोडून जाताना होणाऱ्या यातना जेवढ्या तीव्र होत्या, त्या या रम्य प्रांगणात पदार्पण करताच नाहीशा झाल्या. काहीं काही वेळा आलेले अश्रूच जणू काही पुढे जाण्याचा मार्ग दाखवत असतात. अश्रुतूनच पुढे सुखाची फुलबाग उमलायची असते. पण याची कल्पना आपल्याला नसते. अचानक घडणाऱ्या गोष्टी मनात रुतून बसतात, ज्याप्रमाणे चिखलात कमळ रुतून बसतें त्याप्रमाणे. कॉलेज म्हटल्यावर एक विशिष्ट प्रतिमा लगेच डोळ्यासमोर उभी राहते. पण ती प्रतिमा केवळ प्रतिमेतच राहिली.

मायेने ओथंबलेल्या मॅडमच्या सहवासात परिस्थितीने दिलेले चटके सुसह्य झाले. मयेकर सरांना निरोप देताना मनात अनेक विचारांनी गर्दी केली होती. त्यांनी लावलेले हे इवलेसे साहित्यप्रेम निर्माण करणारे रोप, त्याचा वेलू गगनावर नेण्यासाठी तितकेच खंबीर व्यक्तिमत्व लाभेल की नाही, ही शंका धीर खचवत होती. हे रोपटं कुणाच्या आधाराने आपला विस्तार करणार की नाही, याबद्दल साशंकता निर्माण होत होती. पण या निराशेतून विफलता प्राप्त झाली नव्हती. मनात एकसारखं वाटत राही की या इवल्याशा रोपाला गगनावर नेण्यासाठी आधार मिळणार. पण आपण नेहमीच प्रत्येक गोष्टीत घाईगडबड करतो. आम्हालाही हा आधार लवकर मिळावा, ही अपेक्षा होतीच.

या संभ्रमात असतानाच कॉलेजमध्ये मॅडम येणार, ही बातमी पसरली. मन प्रसन्नतेने निर्मळ झऱ्याप्रमाणे खळाळून हसू लागले. तेव्हा आम्हाला आमचा विसर पडला होता. आमच्यातही काही साहित्यगुण आहेत, याचे भान नव्हते. ज्याप्रमाणे हरवलेल्या मुलाला आई मिळावी तसाच आनंद आम्हाला मॅडमच्या आगमनाच्या नुसत्या बातमीनेच झाला. मॅडमना बघण्याची खूप उत्सुकता, ओढ निर्माण झाली. 'मॅडम' हा शब्द हायस्कूल सोडल्यापासून ऐकण्यातच नव्हता. त्यामुळे हरवलेला शब्द आज सापडणार की काय असेही वाटत होते. त्या आल्या त्या दिवशी १५ ऑगस्ट हा दिवस होता. त्या दिवशी कॉलेजमध्ये गाण्याचा कार्यक्रम होता. जणू मॅडमचे स्वागत करण्यासाठी गाणी सुरु आहेत, असं मला वाटलं. अनपेक्षितपणे गाण्यांनी स्वागत झाले. त्या दिवशी मॅडम लगेच निघून गेल्या व दोन दिवसांनी त्यांनी आमच्या वर्गावर पिरीयड घेतला. त्यांच्या बोलण्यातून त्यांचे व्यक्तिमत्व स्पष्ट होत होते. त्यांचे लाघवी हास्य, मनमिळावूपणा पाहून मन उत्साहित होत होते.

त्याचवेळी मनाने खूणगाठ बांधली की, अर्धवट राहिलेल्या शिल्पाला आकार येणार. व्यक्तिमत्वाचं शिल्प पूर्ण करायला कसबी शिल्पकार मिळाला. त्यांच्या बोलण्यातून व ऐकलेल्या कीर्तीतून त्यांच्या यशाच्या चांदण्या आमच्या मनात मूळ धरुन बसल्या. खरंच, मॅडम खूप चांगल्या आहेत. मॅडमच्या नात्यापेक्षा त्या आम्हाला मोठ्या बहिणीप्रमाणे वाटतात. हेच नाते जास्त आवडते. त्यांना विविध क्षेत्राचे ज्ञान आहे. त्यांच्या विजयाची पताका सतत फडकत आहे. आमच्यातील सुप्त गुणांना त्यामुळे मूर्त स्वरुप प्राप्त झाले. आमच्यातील लेखक, कवीवृत्तीला त्या सतत आवाहन करीत असतात आणि हे करताना साहित्यातील साहित्यिकत्वाचा स्पर्श आमच्या विचारांना होण्यासाठी सतत जागरुकही असतात. त्यामुळेच आम्हाला नवनव्या क्षेत्रात पदार्पण करायला मिळत आहे. त्यांचा सहवास मिळून थोडेच दिवस झाले. आणि आता एकच वर्षाने आम्ही जाणार असल्याने तो संपणारही आहे. त्यांच्या-


'देवगड महाविद्यालय कला व वाणिज्य' ला हार्दिक शुभेच्छा !

" ग्रंथरसिक व ग्रंथसंग्राहक यासाठी "

दर महा शंभर रुपयांची पुस्तके विनामूल्य

मॅजेस्टिक बुक स्टॉल

दर महा दहा रुपये भरुन वर्ष अखेर १४० रुपयांची पुस्तके मिळवा !
तसेच सुदैवी सभासदांना दरमहा १०० रुपयांची पुस्तके बोनस म्हणून विनामूल्य !!

―: अधिक माहितीसाठी आजच लिहा :―

मॅजेस्टिक बुक स्टॉल
शनिपाराजवळ, पुणे २
☎ ४४३३५७

बद्दल लिहावं तेवढं थोडंच आहे. मला जे जाणवलं ते मनापासून लिहीत आहे.

ही साहित्यवेल जोपासायला लागून नुकतेच काही दिवस होत होते. ही वेल नुकतीच आकार घेऊ लागली होती. तोच ती उन्मळणार की काय वाटू लागले. मॅडम म्हणाल्या, 'मी जाणार.' या प्रचंड धक्क्याने आम्ही पुन्हा बावरलो, 'आता कसं होणार ?, त्या दिवशी आम्हो त्यांना तास घेऊच दिला नाही. मन दाटून आलं. मीही यातून सुटू शकले नाही. आम्ही खूप विनवणी केली, तरी मॅडम आपला निर्णय मागे घेत नव्हत्या. त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या भावना व्यक्त करणाऱ्या कविता आम्ही बऱ्याचजणांनी केल्या. मीही यातून सुटले नाही. तोच माझ्या काव्यस्फूर्तीचा पहिला प्रसंग होय. त्यामुळे त्याना कळले सूर्य जसा पृथ्वीवर प्रेम करतो तशा मुली आपल्यावर प्रेम करतात.

> तुझ्या चाहुलीने
> हर्ष झाला रोमारोमातुनी
> हास्याची बरसात झाली
> गाण्यांचे जल्लोष जाहले.
> तो दिन स्मृतींत आहे का ?
> का केले स्वतंत्र विचारांनी प्रेरीत
> का दिले तू कळीला जीवन
> का केले मन अर्पण ?
> जाणार होतीस मग
> तर का केले व्यर्थ बहाणे ?
> का पाहिले तू प्रेम अमुचे ?
> का आटले तुझीया
> प्रेमझऱ्याचे पाणी ?
> अबोल का ?
> बोल ना.

या शब्दांना ओलांडून जाण्याची ताकद मॅडममध्ये नव्हती. शब्दात एवढे सामर्थ्य असते की शब्द माणसांना परतवून आणू शकतात. त्याची प्रचीती त्या दिवशी आली. त्यांनीच दिलेल्या शब्दाच्या आधाराने आम्ही त्यांना परत मिळवले. त्या आमच्या स्फुर्तीदेवता आहेत. अशाच प्रकारच्या अनेक कविता आम्ही मराठीचे विद्यार्थी करु लागलो व समीक्षणात्मक लेख लिहू लागलो. याचे श्रेय मॅडमनाच आहे. देवगड कॉलेजमध्ये मॅडम म्हणजे कॉलेजचं सौंदर्य आहे. ज्याप्रमाणे घराला स्त्री शिवाय शोभा नाही तसेच मॅडमशिवाय कॉलेजला शोभा नाही.

त्यांची शिकवण्याची ढबही वेगळीच आहे. त्याला अभिनयाची जोड आहे. मयेकर सरांनी लावलेल्या वेलीची जोपासना करण्यासाठी योग्य व्यक्ती लाभलीय. वेल फुलांनी बहरुन येत आहे. थोड्याच दिवसात आसमंत सुगंधाने बहरुन येईल. सागरात शिपले मिळतात. पण प्रत्येक शिंपल्यात मोती मिळेलच असे नाही. पण आम्हाला मिळालेल्या शिंपल्यात अगणित मोती मिळाले. त्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडत आहेत.

आणखी एक वर्षाने आम्ही कॉलेज सोडून जाणार आहोत. त्याची खंत आजपासूनच मनाला पोखरत आहे. हे प्रेम, माया नंतर या व्यवहारी जगात मिळणे अशक्य आहे. आमच्या मॅडम आम्हाला दिसणार नाहीत. त्यांचा आमचा सहवास संपणार या कल्पनेनेच मनात भयाणतेचे, पोकळीचे चित्र उमटवते. पण मॅडमच्या सहवासात, या व्यवहारी जगात वागण्यासाठी लागणारे आमचे मन खंबीर बनत आहे. त्यांनी दिलेली शिकवण आम्हाला सतत मदत करेल.

मॅडम म्हणजे एक स्मितहास्य करणारी कळी आहे. सगळ्या गोष्टीवर मात करुन विजय कसा मिळवावा, निराश व्हायचं नाही, निराशेतून आशेचा किरण डोकावत असतो. हे सर्व त्यांच्या बोलण्यातून सतत ऐकायला मिळते. त्यांचा जीवनविषयक व्यापक दृष्टिकोन भविष्यकाळ उजळ करणार आहे. हृदयावर उमटलेले एक आगळे वेगळे व्यक्तिमत्व म्हणजे मॅडम होय. आमच्या हृदयाच्या कोंदणातला हा हिरा कधीच गळणार नाही. मॅडमच्या व्यक्तिमत्त्वाला उपमा, उत्प्रेक्षा अलंकारांनी सजवलं तरी त्याच्याहून अधिक सरस असं त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे. मॅडम म्हणजे ज्ञानाचा अखंड वाहणारा झरा आहे, सतत तेवणारा हा नंदादीप आहे, हा ठसा असाच कायम रहाणार आहे. निरोप देणे म्हणजे एकमेकांचे रुप डोळ्यात साठवून ठेवणे होय. मॅडम, आम्ही तुम्हाला खरंच सांगतो की मिळालेल्या ओलाव्याने तुम्ही वाढवलेली ही साहित्यवेल आम्ही सतत टवटवीत, तजेलदार ठेवू.

देवगड कॉलेज

卐 रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा ! 卐

**श्री. वळंजू बंधु**
**मिठबांव**
**ता. देवगड**

धान्य, किराणा, स्टेशनरी व
देशी औषधांचे व्यापारी.

**मेसर्स पारकर बंधु**
**हिंदळे**
**ता. देवगड**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी,
ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर

**मेसर्स- अे. अे. आगा**
**आणि कंपनी**
**हिंदळे, ता. देवगड**

किराणा व भुसारी मालाचे
घाऊक तसेच किरकोळ विक्रेते.

**श्री. अंबिका विजय सॉ मिल**
प्रोप्रा. पटेल आणि कं.

**मु. पो. विजयदुर्ग, ता. देवगड**
पिन- ४१६८०६

कारवारी इमारती लाकडाचे व्यापारी

"ललित-निबंधाच्या संग्रहाचे एखादे पुस्तक ज्याच्याजवळ असेल त्याला आपल्या मार्मिक व सुंदर भाषणांनी रिझविणाऱ्या मित्रांची कधी वाण भासणार नाही. एकंदरीत पाहता हे मानवी जीवित जगण्यात मौज आहे असे सांगणारे मित्र सहसा लाभत नाहीत. परंतु ललितनिबंधाचा संग्रह ज्यांच्या संग्रही असेल त्यांना अशा मित्रांचा परिवार आपल्याभोवती गोळा केल्यासारखे होईल. त्या पुस्तकाचे कुठलेही पान त्यांनी उघडावे आणि सन्मित्र संभाषणाचा आस्वाद घ्यावा!"

**कै. ना. सी. फडके**
'प्रतिभासाधन, पृ. २२४

# — लेख —
# ललित / वैचारिक

# ॥ माझे शिव मनोगत ॥

॥ विजय खवळे / बारावी कला ॥

'रसराज' पारितोषिकप्राप्त लेख



'दिव्यत्वाची जेथे प्रचीती। तेथे कर माझे जुळती॥' या भावनेने आपले कर अशा राष्ट्रधर्म पित्याच्या चरणी जुळतात. राष्ट्रधर्माचा वाली, सुराज्याचा नेणता, स्वराज्य स्थापनेचा प्रणेता महाराज छत्रपती, मनुष्यास स्वाभिमानाने जगता यावे व स्वाभिमानाने मरता यावे या भावनेची बीजे प्रथम संपूर्ण महाराष्ट्रात कोणी प्रत्यक्ष रुजवली असतील तर ती कुलवंत महाराज छत्रपतींनी ! म्हणूनच त्यांना ३०० वर्षे होऊन गेली तरी त्यांच्या पराक्रमामुळे सारा महाराष्ट्र मान झुकवत आहे आणि यापुढेही झुकविणार आहे.

बेबंदशाही आणि जुलूम यांचा अंधार पसरलेला असतेवेळी शिवनेरीवर एका राजमातेच्या पोटी जन्म घेऊन रामायण महाभारत यांच्या स्फूर्तीने प्रेरीत होऊन अवघ्या सोळाव्या वर्षीच तोरण गडावर भवानी मातेच्या साक्षीनें स्वराज्याचे तोरण बांधून नवीन सोनेरी इतिहासाची पाने उलटली. केवढा हा मोठा महापराक्रमी भिष्म–प्रतिज्ञी महाराजा ! त्याच वेळी मोगलांची जुलमी राजवट चालू होती. महाराजांनी आपल्या पराक्रमाने आणि गनिमी काव्याने मोगलांचे परिपत्य केले. महाराष्ट्रभर आपला विजयी भगवा झेंडा स्वाभिमानाने फडकाविला आणि घाटमाथ्यापासून कोकणापर्यंत त्यांच्या पराक्रमाची तुतारी कड्या-कपारीतून दुम-दुमू लागली. असा हा शिस्तप्रिय दूर दृष्टिवादी आणि वाकबगार राजा परत होणे नाही. त्याकाळी राजेशाही असताना अष्टप्रधान मंडळाची स्थापना करुन जनतेला आपले स्वातंत्र्य सर्व हक्क प्राप्त करुन देणारा लोकहितवादी राजा स्वतः हातात तलवार घेऊन रणभूमीवर झुंजला, अमर कीर्तीनें जगला आणि प्रतिदिनी उगवणाऱ्या सूर्याप्रमाणे क्षितिजावर मावळला. त्याच्या पराक्रमाची गाथा महाराष्ट्रभर कौतुकाने सांगितली जात आहे.

अशा या शिवचरित्राचे संशोधन आम्हा भारतीयांच्या लेखणीतून प्रेरीत न व्हावे हो आम्हा सर्वांना अपमानास्पद गोष्ट आहे. लोकमान्य टिळकांसारखे जिवंत लेखणीचे प्रणेते असते तर त्यांनी नक्कीच याची दाव घेतली असती.

गीता-रहस्यासारखा महान् ग्रंथ लिहिल्यावर वेळे-अभावी म्हणा किंवा राजकीय दगदगीमुळे त्यांच्या कडून शिवचरित्र लिहिले जाऊ नये या गोष्टींची खंत टिळकांच्या आत्म्याला सतत टोचत असणार. ते काम शिवशाहीर बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या प्रत्यक्ष लेखणीतून आणि मुखातून साकार होत आहे. समाजजागृतीसाठी टिळकांनीं शिवजयंतीसारख्या सार्वजनिक उत्सवाची प्रेरणा दिली. त्यांचा वारसा आजही चालवला जात आहे.

शिवाजी महाराजांची प्रत्येक कृती, पराक्रम हे एकेका वाङ्मयपुरुषाचा विषय होऊ शकेल एवढी त्यात ताकद आहे. पाश्चिमात्य देशात असा महापुरुष जन्मास आला असता तर त्याच्यावर हजारो ग्रंथ आणि काव्ये, नाटके निघाली असती. कालिदासाच्या लेखणीतून 'शाकुंतल' नाटकाची निर्मिती झाली व या नाटकाला जर्मनचा प्रसिद्ध महाकवी गटे डोक्यावर घेऊन नाचला.

अशा ऐतिहासिक भारतीय वाङ्मयाचा वारसा म्हणून महाराष्ट्रात आता बाबासाहेब पुरंदऱ्यांसारखे शिव-चरित्रकार जन्मास आले व त्यांनी अशा पराक्रमी महापुरुषाची ओळख भारतीयांना आणि जगातील बांधवांना करून दिली आहे. असे अनेक शिवचरित्र-कार माझ्या महाराष्ट्रात निपजावेत आणि त्यांनी त्यांच्या महान कीर्तीला आकार द्यावा, हीच भवानी मातेच्या चरणी विनम्र प्रार्थना !

★

---

## व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

सर्व शिक्षणाचा हेतू माणसाचे व्यक्तिमत्व घडविणे हाच असायला पाहिजे. पण त्याऐवजी आपण बाहेरच्या बाजूलाच रंगसफेती करण्यात गढून गेलो आहोत. आत व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव असताना केवळ बाहेरुन रंगसफेती करण्यात काय स्वारस्य आहे ? सर्व शिक्षणाचे ध्येय आणि कार्य माणसाचा विकास घडवून आणणे हे आहे. जो 'माणूस' – जे व्यक्तिमत्त्व दुसऱ्यांवर प्रभाव पाडू शकते, जे आपल्या बांधवांवर जादूची मोहिनी पाडते ते शक्तीचे केंद्र असते. जेव्हा हे शक्तिशाली व्यक्तिमत्व तयार होते तेव्हा तो मनुष्य वाटेल ती गोष्ट करु शकतो. ज्या कशावर अशा व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल ते कार्यक्षम होऊन जाईल.

–स्वामी विवेकानंद

# ।। निसर्गाचा सौंदर्यसोहळा ।।

।। अरुण दांडेकर / द्वितीय वर्ष वाणिज्य ।।

श्रावणमासाचा स्वागतोत्सव हा मोठा काव्यमय असतो. वर्षभर उन्हाळ्याने कंटाळलेली माणसें मृगाचा पहिला पाऊस पडतो आणि मातीच्या मंदमधुर सुगंधाने सारे वातावरण धुंद होऊन जाते. इथपासून वातावरणाची नवी नवी रुपे साकारु लागतात. सगळीकडे हिरवळच हिरवळ दिसू लागते. निसर्गाचे हे सारे रूप मनाला वेड लावणारे असते. निसर्गाच्या कलात्मक कृतीने बालकवींची काव्यपंक्ती नकळत ओठांबाहेर पडतात:

" श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे ।
क्षणात येते सर ऽ सर शिरवे, क्षणात फिरुनी उन पडे ।। "

बरेच दिवस विश्रांतीसाठी गेलेल्या पावसाची मंद रिमझिम सुरु होते आणि याचवेळी सोनेरी किरणांचा फ्लॅश चमकू लागता. श्रावणराजाच्या या चित्रपटास सुरुवात होते आणि निसर्गाची अनेक दृश्ये मनःपटलावरुन पुढे सरकत असतात. श्रावणातील संध्याकाळी फेरफटका मारण्यात खूप मौज वाटते. रोज-रोज नवीन रूपे दृष्टीस पडतात. श्रावणमासाच्या या अवर्णनीय सोहळ्याचे वर्णन करण्यास शब्दच अपुरे पडतात. निळ्याशार ढगांच्या छत्राखाली साज-शृंगारसे नटलेल्या निसर्गराजाच्या सप्तरंगाची उधळण आणि त्यातच चाललेली पक्षांची किलबील खूपच शोभून दिसते. अशा या सौंदर्यसोहळ्यात पावसाची मंद रिमझिम आणि संथ वहाणारा वारा संगीताला साथ देत असतो. वाऱ्याच्या लहरीवर तरळत येणारा फुलांचा सुगंध सारे वातावरण आनंदित करत असतो. अशी ही संगीतमय मैफल ऐकण्यात सारी सृष्टी तल्लीन होऊन जाते.

निसर्गराजाचे हे सारे रुप दररोज बदलत असते. सारे वातावरण कसे तृप्त झालेले असते. उंच कड्यावरुन कोसळणारे धबधबे फुलबाजाप्रमाणे कारंजाचे तुषार उडवीत असतात, तर लहान मोठे वहाणारे ओहोळ नागमोडी वळणाने नदीकडे धावत असतात. दोन प्रेमी जीव बरेच दिवसात एकमेकांना न भेटल्यामुळे त्यांना जो विरह होतो, तद्वत ओहोळ आणि नदीचे नाते असावे.

साऱ्या सृष्टीतील तृप्त झालेल्या वातावरणात शेतकरी मोठ्या आनंदाने कामे करु लागतात. लहान मुले तर आनंदाने पावसात बागडू लागतात. पाऊस येताच त्यांचे बोबडे स्वरकानी येतात,

**रसराज**ला हार्दिक शुभेच्छा !



**गडकरी कंपनी**
**कर्ला, रत्नागिरी**

**रसराज**ला हार्दिक शुभेच्छा !



**नासिरी आणि इब्राहिमी**
**कर्ला, रत्नागिरी**

'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !



**गोगटे बंधू**
**जामसंडे**

" आई मला पावसात जाऊ दे ।
आई गं, भिजुनी मला चिंब चिंब होऊ दे ॥"

शाळेतून घरी आल्यावर सारी मुले कागदाच्या होड्या करण्यात दंग असतात, तर काहीजण नाल्यामध्ये आंघोळ करत असतात. त्यांना एक अपूर्व आनंद झालेला असतो.

श्रावणापासुन सणांना तर खूपच भर येतो. नागपंचमी, नारळीपौर्णिमा, रक्षाबंधन, कालाष्टमी, पिठोरी, हरितालिका, गौरी-गणपती- सगळीकडे धांदल सुरू होते. उपवासांना तर ऊतच येतो. शनिवारी पिंपळाची पूजा, सोमवारी शिवामूठ, तर मंगळवारीचे व्रत केले जाते. या दिवशी साऱ्या भगिनी नाच फुगडच्या गाण्यात दंग असतात. सारे वातावरण कसे आनंदाने भरून जाते !

इतके दिवस संपावर गेलेल्या फुलांना खूपच बहर येतो. बागेमध्ये, वनामध्ये विविध रंगाची आणि सुवासाची फुले उमलू लागतात. फुलांनी बहरलेल्या फांदीच्या पाना-पानामधी उत्साह दिसून येतो. हिरव्या-गार पानांच्या घोळक्यात विसावलेली फुले आणि फुलांतील मध खाण्यासाठी आरूढ झालेली फुलपाखरे खूपच शोभून दिसतात. जाई, जुई, चंपा, चमेली, गुलाब, गुलबक्षी, कण्हेरी, मोगरा इत्यादी अनेक तऱ्हेची फुले साऱ्या दिशांना सुगंध उधळत असतात. सायंकाळी झोपाळ्यावर बसून मुलांना परवचा शिकवत असताना प्राजक्ताच्या कळ्यांना सुटणारा सुगंध मन प्रसन्न करतो. या प्राजक्ताची महती तर रुक्मिणी-सत्यभामेच्या भांडणातूनच स्पष्ट होते. अंगणामध्ये रांगोळी घालण्यासाठी श्रीकृष्णाने याच वृक्षाची योजना केली असावी. कारण उषःकाली हिरव्यागार गालिचा-वर प्राजक्ताच्या फुलांची रांगोळी कोणत्याही प्रदर्शनात पहायला मिळणार नाही.

हसतमुखाने तयार असलेली गुलमाक्षी आणि जाईची पांढरीशुभ्र फुले वातावरणात एक प्रकारचा गोडवा निर्माण करतात. विविधरंगी तेरडे तर डौलाने उभे असतात. कर्दळीना तर भरच आलेला असतो. उषःकालाचे स्वागत करण्यासाठी तगर तर हसतच उभी असते. स्वतःला शिष्ट समजणारी कण्हेरी तोऱ्यात उभी असते. या सर्वांत अबोल असलेली शेवंती मात्र गप्पच उभी असते. या सर्वांमध्ये कृष्णकमळाचे तेज तर अधिकच झळकत असते. फुलांच्या या बाजारात सर्वांचा राजा गुलाब काटेरी कुंपणामध्ये आरुढ झालेला असतो. त्याला विशेष कोणाचा सहवास आवडत नसावा. त्याची भेट घेण्यास जरा भीती वाटते.

श्रावणमासातील निसर्गाच्या या सौंदर्यसोहळ्यात कधी कधी ऊन-पावसाचा लपंडाव सुरु होतो आणि याचवेळी निळ्याशार ढगातून हळूच इंद्रधनुष्य डोकावू लागते. मन आनंदाने बेहोश होते आणि निसर्गाची सारी कलाकौशल्ये नकळत पांढऱ्या कागदावर उमटतात. आनंद, काव्य आणि संगीताने नटलेल्या या सौंदर्यसोहळ्यात श्रावण कधी सरतो ते कळतच नाही. प्रेम आणि सौंदर्याचा एक नवीन अनुभव प्राप्त होतो. नवचैतन्य घेऊन येतो तो भाद्रपद ! पुन्हा हरितालिका, गौरी-गणपती सगळीकडे एकच धांदल सुरु होते. सर्वांचे डोळे गणेशोत्सवाकडे लागलेले असतात. निसर्गाच्या कलात्मक कृतीचा आस्वाद घेतल्यानंतर मानवी कलेची वेगवेगळी दृश्ये दिसू लागतात.

## खरा गुरु कोणाला म्हणावयाचे ?

जो आध्यात्मिक शक्तीच्या भांडाराच्या रुपांत पुनःपुन्हा जन्म घेतो आणि जो ही आध्यात्मिक शक्ति गुरुशिष्यांच्या अनेक परंपरांच्या द्वारे भावी पिढ्यांच्या ठायी संक्रामित करतो त्याला खरा गुरु म्हणावयचे ज्याप्रमाणे पाण्याचा एखादा प्रचंड प्रवाह आपला जुना मार्ग कायमचा सोडून नवीन मार्गाने वाहू लागतो त्याप्रमाणेच आध्यात्मिक शक्तीचा हा प्रवाह वेळोवेळी आपला मार्ग बदलतो. यावरुन असे दिसते की जुने धर्मपंथ कालान्तराने निष्प्राण होतात व नवीन पंथ उदयास येतात आणि त्यांच्यामध्ये नवजीवनाचे तेज भरलेले असते. जे खरे शहाणे पुरुष असतात ते ज्यांतून जीवनप्रवाह वाहत असतो अशा धर्मपंथाचा आश्रय घेतात. पदार्थ-संग्रहालयात ज्याप्रमाणें एकेकाळच्या प्रचंड प्राण्यांचे सापळे जतन करुन ठवलेले असतात त्याप्रमाणें हे जुने धर्मपंथ असतात. त्यांच्याविषयी योग्य तो आदर बाळगला पाहिजे. एखादा मेलेला आम्रवृक्ष ज्याप्रमाणे मनुष्याची रसाळ आंबे खाण्याची इच्छा तृप्त करु शकत नाही त्याचप्रमाणे आत्म्याला लागलेली परमात्ममीलनाची आस जुने धर्मपथ पुरवू शकत नाहीत.

— स्वामी विवेकानंद


देवगड महाविद्यालयाला आणि "रसराज"ला हार्दिक शुभेच्छा !



हॉटेल सुखमन

लक्ष्मी राईस अँड फ्लोअर मील

विठ्ठल सदाशिव मोर्ये

नांदगांव, ता. कणकवली

# ॥ विद्यार्थी आणि राष्ट्रीयत्व ॥

॥ विलास राणे / प्रथम वर्ष वाणिज्य ॥

शाळेत होणाऱ्या राष्ट्रगीतासाठी एक-दीड मिनिटही शांत उभे राहू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांत राष्ट्रीयत्व आहे का, हा खरोखरच प्रश्न आहे.

गेल्या पिढीतील विद्यार्थ्यांमधील राष्ट्रीयत्वाची भावना व आजच्या विद्यार्थ्यांची तुलना केल्यास 'व्यर्थ' हे शब्द तोंडून बाहेर पडतात. टी. व्ही, रेडिओ यावर अहोरात्र चालू असलेल्या हिंदी गाण्याच्या तालावर अभ्यास करणारे विद्यार्थी फारच पुरोगामी (?) झाल्याने भारताविषयी प्रेम बाळगणे त्यांना मूर्खपणाचे वाटते. पाश्चात्य नृत्य, संगीत, पोषाख यांनी त्यांच्यावर इतकी जबरजस्त मोहिनी घातली आहे की त्यांना आपण हिंदुस्थानी आहोत याचीच लाज वाटू लागली आहे. दुसऱ्यांच्या चांगल्या गुणावर प्रेम करणे वाईट नाही, पण त्यासाठी आपली परंपरा वाईट ठरवण्याची काहीही गरज नाही.

पण या बाबतीत विद्यार्थ्यांनाच दोषी ठरवता येणार नाही. मोठी माणसे तरी त्यांच्यापुढे कोणते आदर्श ठेवतात? भारतात शिकून डॉक्टर वा इंजिनियर बनलेला त्यांचा भाऊ परदेशातील बड्या पगाराच्या नोकरीवर नजर ठेवून असतो. कारण भारतात असणाऱ्या डॉक्टर इंजिनियर्सच्या गरजेपेक्षा त्याला स्वतःला असणारी पैशाची गरज मोठी वाटते. सतत जपान, अमेरिका यांचे कौतुक करुन भारताची निंदा करणारे हे लक्षात घेत नाहीत की भारत अवघ्या ३३ वर्षांपूर्वी स्वतंत्र झाला आहे. पण त्यांना याचेही भान रहात नाही की याचा मुलांच्या मनावर काय परिणाम होणार आहे? सतत आपल्या देशाची टीका मोठ्यांकडून ऐकणारी मुलंही त्यांचंच अनुकरण करतात.

मुले भारताच्या गरिबीचं व पाश्चात्य देशांच्या श्रीमंतीचं वर्णन ऐकत असतात. त्या देशामध्ये विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोयी पाहून मुलांना साहजिकच ते देश फार चांगले आहेतच, पण नाण्याची दुसरी बाजू म्हणून त्यांना भारत अतिशय मागासलेला देश वाटतो.

यातूनच निर्माण होते एक बेजबाबदार, सतत नवनव्या फॅशन शोधून काढणारी, पैशाच्या मागे लागलेली,

देशाभिमान गमावलेली तरुण पिढी. ही पिढी निर्माण होऊ द्यायची नसेल तर आजच्या विद्यार्थ्यांत राष्ट्रीयत्वाची भावना जागविणे अत्यंत महत्वाचे आहे.

भारतात आलेल्या पहिल्या मुसलमान आक्रमणानंतर हजारो आक्रमकांनी प्रवेश केला. यात भारतीय जनतेने राष्ट्रीयत्वाची वृत्ती गमावली. एकच पिढी अशी निर्माण झाली की जिने परदेशी कपड्यांच्या होळ्या केल्या, देशासाठी हालअपेष्टा सोसल्या, प्रसंगी प्राणार्पणही केले. आणि यानंतर पुन्हा एक पिढी निर्माण झाली, जिने राष्ट्रीयत्व गमावले. त्या तेजस्वी पिढीचा वारसा जिला चालवता आला नाही. राष्ट्रीयत्व म्हणजे देशाबद्दलचा अभिमान, आपलेपणा, ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात जागवणे अत्यंत आवश्यक आहे. पण आज त्या दृष्टीने फारच कमी प्रयत्न केला जातो.

भारत हा विकसनशील देश म्हटला जातो. या देशाच्या विकासाला, जागतिक प्रतिष्ठेला जपणे आवश्यक आहे. राष्ट्रीत्वाची जाणीव असलेले नागरिक खऱ्या अर्थाने निर्माण करायचे असतील तर स्वतःतील राष्ट्रीयत्व कायम राखून विद्यार्थ्यांत ते निर्माण होण्यासाठी कसोटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

'रसराज' साठी हार्दिक शुभेच्छा !

मे. मिलिंद इंजिनिअरींग वर्क्स
देवगड.

'रसराज' साठी हार्दिक शुभेच्छा !

मे. मोहिद्दिन इंजिनिअरींग वर्क्स
देवगड.

'रसराज' साठी हार्दिक शुभेच्छा !

नवयुग फोटो स्टुडिओ, देवगड
फोटोग्राफर– बाळ पाटील.

देवगड महाविद्यालय व
वार्षिक अंक 'रसराज'साठी आमच्या
卐 हार्दिक शुभेच्छा 卐

मे. जब्बार गफार मेनन
विजयदुर्ग
किराणा मालाचे व्यापारी
☎ ३२

# ॥ कवी अनिल आणि त्यांची काव्यसंपदा ॥

॥ अलका हुर्डीकर / तृतीय वर्ष कला ॥

आजच्या मराठी काव्यमंदाकिनीच्या संथ, शांत, विशाल प्रवाहाचे डोळे भरुन दर्शन घेताना या प्रवाहाची गती आणि व्याप्ती वाढवण्यास कारणीभूत झालेल्या 'अनिल' उर्फ 'आत्माराम रावजी देवपांडे' यांची प्रकर्षाने आठवण झाल्याशिवाय रहात नाही. रविकिरण मंडळाच्या कवितेने कविता लोकाभिमुख केली, लोकप्रिय केली, विषयानुलक्षी केली. असे असले तरी त्या कवितेने सांकेतिकतेमुळे व तांत्रिक बडेजावामुळे मराठी कवितेला साचलेपणाची कळा आणली. डबक्यासारख्या साचून राहिलेल्या या मराठी कवितेला नवचैतन्य पुरवून ती बंधमुक्त करुन तिचा बंदिस्त प्रवाह इष्ट वळण देऊन मुक्त करणाऱ्यात कुसुमाग्रजांबरोबरच कवी अनिलांचाही फार मोठा वाटा आहे. कवी अनिलांच्या कवितेने आधुनिक युगाला जवळ असलेल्या नव्या आशयाचे दर्शन घडविले. आणि त्यासाठी अभिव्यक्तीची नवनवी रुपे सिद्ध केली.

एकेक आहे तो, जिवंत क्षण
ऊन रक्ताने अनुभवलेला

ही उक्ती अनिलांच्या सर्वच कवितांना लागू पडते. अनिलांचे अनुभवविश्व फार व्यापक होते. प्रेम आणि निसर्ग ही त्यांच्या अनुभवक्षेत्राची केंद्रे वेगवेगळ्या अनुभवांना स्पर्श करुनही 'प्रेम' हे भावजीवनाचे केंद्र कधीच बदलले नाही. त्यातूनच 'प्रेम आणि जीवन' ही पहिली मुक्तछंदात्मक कविता जन्मली. जिथे अनिलांच्या आत्मनिष्ठ अनुभवांची प्रत्यक्ष गाठभेट होते, तिथे ती कविता अधिक संयमी, शब्दसंकोची असल्याचे जाणवून मनात खरोखर भिडते. त्यांची कविता म्हणजे त्यांनी केलेला अनंत अनुभवांचा प्रवास होय. अनिलांच्या कवितेने सतत वेगवेगळी रुपे धारण केली आणि केवळ हा बदल बाह्याकारी नव्हता, तर अनिलांच्या कवितेचा कायापालटच होत राहिला. 'फुलवात' मधल्या सांकेतिक भावगीतानंतर अनिलांना खोलवर जाणवलं की, एकच एक प्रेमभावना एकाच एका पद्धतीने व्यक्त करण्यापेक्षा आपण जरा अधिक व्यापक दृष्टीने जगाचा विचार केला तर अनेक अनुभव सापडतील आणि ते संपूर्ण नवीन अनुभव व्यक्त करायला मार्गही नवाच हवा. जर ह्या नवीन अनुभवावर जुन्या छंदवृत्तांची मर्यादा घातली, तर हा अनुभव आपल्याला मोकळपणाने व्यक्त करता येणार नाही, या जाणिवेतूनच अनिलांना मुक्तछंद सापडला.

अनिलांच्या विकासाचा आलेख पाहण्याजोगा आहे. फुलवात हा अचल प्रेमनिष्ठेचा प्रथमाविष्कार आहे. 'पेर्ते व्हा' तील कवितावरुन त्यांच्या मनाचे दुहेरी रुप लक्षात येते. महायुद्धाच्या संकटानें घायाळ झालेल्या मनाचे कोपरे 'झळ' मध्ये व्यक्त होताना,

किती दूरचि लागे झळ
आतल्या जिवा
गाभ्यातील जीवनरस
सुकत ओलावा

हे शद्ब खोलवर भिडतात. तसेच निसर्गातील सूक्ष्म अशी संवेदनाही अनिलांनी शद्बातून पकडली आहे. लाचारीच्या शरणागतीने माणसाचे कर्तृत्व संपते, हे सांगताना–

'हाती हात धरुन चालविणारा
माझा कोण तू ?'

इथे शद्बाला थोडी तिखट धारही चढते. आपल्या प्रिय व्यक्तीच्या सहवासातून मानवतेच्या धाग्याने जोडल्या गेलेल्या अद्ययातव माणसाबाबत, जीवनाचा अविभाज्य घटक होऊन बसलेल्या सृष्टीचे विभ्रम आणि या सर्वातून तयार झालेली एक जीवनविषयक कल्पना, तसेच व्यक्तिजीवनाचा अविभाज्य भाग होऊन बसलेल्या प्रीतीसारख्या अत्यंत हळुवार सौंदर्यपूर्ण असा गूढ भावनेचा विकसनशील असा आलेख अशा विविध रुपात हा कविता प्रकटतानाच जीवनाची जिद्द, अन्यायाबद्दलची चीड, अखिल मानव जातिविषयीची करुणा, जीवनाविषयक सखोल चिंतन, संकेतांना दूर सारण्याची हिंमत, सौंदर्याची उत्कट ओढ, कोवळ्या भावजीवनाचा हळुवार स्पर्श, निसर्गाविषयीची संवेदनेच्या आधारे एकरुप होऊ बघणारी कविवृत्ती असे विविध विभ्रम या कवितांमधून जाणवतात. अनिलांचे व्यक्तित्त्व हे अनेक परस्परविरोधी प्रवाह सामावून घेण्याइतके निर्भर आहे.

प्रेमाच्या गूढ वातावरणाचे वलय असलेली गोड गीतरचना, हृदयंगम प्रतिकांच्याद्वारे निर्माण केलेल्या शद्बप्रतिमा, मानवतेच्या उज्वल आदर्शाचा धडाडीने केलेला पुरस्कार यामुळे कवी अनिल यांचे मराठी काव्यातील स्थान श्रेष्ठ आणि वैशिष्टयपूर्ण आहे. मुक्तछंदाचे एक प्रवर्तक म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अतिशय श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यांचे काव्यातील व्यक्तिमत्त्वही प्रभावी असल्यामुळे त्यांच्या मुक्तछंदालाही एक तेज प्राप्त झाले आहे. उपमा-उत्प्रेक्षांनी नटलेला मुक्तछंद त्यांनी फारसा लिहिलाच नाही. अनिलांचे सर्व काव्यविश्व सूक्ष्मार्थाने आत्मनिष्ठ आहे, हृदयस्थ आहे. त्यामुळे त्यांची दीर्घकाव्येदेखील एकप्रकारे भावकाव्येच आहेत. विचारप्रतिमांचे अविष्करण करतानाही तळमळत्या हृदयांची स्पंदने त्यात उमटत असतात. त्यांचे जीवनावर अत्यंत प्रेम होते आणि कविता हे त्यांचे जीवन होते. त्यांची वृत्ती ही चिरयौवनाची होती. आणि म्हणूनच सत्तरी ओलांडल्यावरही ते बजावतात,

नसे मुमुक्षू मुक्त मी,
अजून यौवनात मी ।

# ॥ टोपण नावे ॥

॥ संग्राहक : एस्. एस्. पाटील (ग्रंथपाल)
M. A. B. Lib. Sc.

| | टोपण नाव | मूळ नाव | कालखंड |
|---|---|---|---|
| १) | अनंततनय (कवी) | आपटे दत्तात्रय अनंत | १८७९–१९२९ |
| २) | अनिल (कवी) | देशपांडे आत्माराम रावजी | १९०१–१९८२ |
| ३) | अनिरुद्ध पुनर्वसू | आठवले नारायण | १९३२– |
| ४) | आनंद (कवी) | बर्वे विनायक लक्ष्मण | १८९६–१९४८ |
| ५) | अण्णासाहेब किर्लोस्कर | किर्लोस्कर बळवंत पांडुरंग | १८४३–१८८५ |
| ६) | आचार्य अत्रे | अत्रे प्रल्हाद केशव | १८९८–१९६९ |
| ७) | आचार्य कृपलानी | कृपलानी जीवनराम भगवानदास | १८८८–१९८२ |
| ८) | आरती प्रभू | खानोलकर चिंतामणी त्र्यंबक | १९३०–१९७६ |
| ९) | इंदिरा (कवयित्री) | संत इंदिरा नारायण | १९१४– |
| १०) | कर्मवीर भाऊराव पाटील | पाटील भाऊराव पायगोंडा | १८४७–१९५९ |
| ११) | काकासाहेब खाडिलकर | खाडिलकर कृष्णाजी प्रभाकर | १८७२–१९४८ |
| १२) | कांत (कवी) | कांत वा. रा. | १९१३– |
| १३) | किरात (नाटकार) | सोमण कृष्णाजी लक्ष्मण | १८६५–१९४५ |
| १४) | कुसुमाग्रज (कवी) | शिरवाडकर विष्णु वामन | १९१२– |
| १५) | कुमार गंधर्व | कोमकळी शिवपुत्र सिद्धरामय्या | १९२५– |
| १६) | कृष्णाग्रज (कवी) | गद्रे यशवंत महादेव | १८८७–१९६३ |
| १७) | केशवसुत (कवी) | दामले कृष्णाजी केशव | १८६६–१९०५ |

| | टोपण नाव | मूळ नाव | कालखंड |
|---|---|---|---|
| १८) | केशव कुमार (कवी) | अत्रे प्रल्हाद केशव | १८९८–१९६९ |
| १९) | केशव छापखाने | कानिटकर केशव रामचंद्र | १८७५–१९४० |
| २०) | गिरीश (कवी) | कानेटकर शंकर केशव | १८९३–१९७२ |
| २१) | गाडगेमहाराज | जाणोकर डेबूजी झिंगराजी | १८७६–१९५६ |
| २२) | गीतावाचस्पती | किंड सदाशिवशास्त्री गोपाळ | १८७६–१९३९ |
| २३) | गुलाबराव महाराज | मोहोड गुलाबराव गोंदुजी | १८८१–१९१५ |
| २४) | चंद्रशेखर | गोऱ्हे चंद्रशेखर शिवराम | १८७१–१९३७ |
| २५) | गोविंदाग्रज (कवी) | गडकरी राम गणेश | १८८५–१९१९ |
| २६) | ग्रेस (कवी) | गोडघाटे माणिक | १९३७– |
| २७) | तांबे (कवी) | तांबे भास्कर रामचंद्र | १८७३–१९४१ |
| २८) | तुकडोजी महाराज | ब्रह्मभट माणिक बंडुजी (पांडुरंग) | १९०९–१९६८ |
| २९) | तुकाराम (संत) | मोटे तुकाराम | १६०८–१६४९ |
| ३०) | दिवाकर (नाट्यछटाकार) | गर्गे शंकर काशिनाथ | १८८५–१९१९ |
| ३१) | दिवाकर कृष्ण (कथाकार) | केळकर दिवाकर कृष्ण | १९०२–१९७३ |
| ३२) | नानासाहेब पेशवे | पेशवे बाळाजी बाजीराव | |
| ३३) | नाना फडणीस | भानू बाळाजी जनार्दन | १७४२–१८०० |
| ३४) | नाथमाधव | पितळे द्वारकानाथ माधवराव | १८८२–१९२८ |
| ३५) | निरंजन माधव | माधव बनाजी तिमाजी | १७०९–१७७२ |
| ३६) | निवृत्तीनाथ (संत) | कुलकर्णी निवृत्ती विठ्ठलराव | तेरावे शतक |
| ३७) | नेताजी सुभाषचंद्र | बोस सुभाषचंद्र जानकीनाथ | १८९७–१९४५ |
| ३८) | पद्मा (कवयित्री) | गोळे पद्मा | १९१३– |
| ३९) | पट्ठे बापूराव | कुलकर्णी श्रीधर कृष्णाजी | १८६८–१९४६ |
| ४०) | प्रभाकर (शाहीर) | दातार प्रभाकर जनार्दन | १७६९–१८४३ |
| ४१) | बळवंत | करंदीकर बळवंत जनार्दन | १८५५–१९०३ |
| ४२) | बाळकराम | गडकरी राम गणेश | १८५५–१९१९ |
| ४३) | बालकवी | ठोंबरे त्र्यंबक बापूजी | १८९०–१९१८ |
| ४४) | बालगंधर्व | राजहंस नारायण श्रीपाद | १८८८–१९६७ |
| ४५) | बाजी प्रभू | देशपांडे बाजी कृष्णाजीप्रभू | |
| ४६) | बी कवी | गुप्ते नारायण मुरलीधर | १८७२–१९४७ |
| ४७) | बी रघुनाथ | कुलकर्णी भगवान रघुनाथ | १९१४–१९५३ |

| | टोपण नाव | मूळ नाव | कालखंड |
|---|---|---|---|
| ४८) | ब्रम्हगिरीबुवा | चांदवडकर केशव श्रीपत | |
| ४९) | भालचंद्र | टिपणीस गणपत नारायण | –१९३६ |
| ५०) | भारद्वाज | भारदे शिवराम एकनाथ | १८६२–१९२० |
| ५१) | भाऊशास्त्री | लेले काशिनाथ वामन | १८६३–१९१८ |
| ५२) | महर्षी कर्वे | कर्वे धोंडो केशव | १८५८–१९६२ |
| ५३) | महर्षी शिंदे | शिंदे विठ्ठल रामजी | १८७३–१९४४ |
| ५४) | मनमोहन (कवी) | नातू गोपाळ नरहर | १९११– |
| ५५) | म. फुले | फुले जोतीराव गोविंदराव | १८२७–१८९० |
| ५६) | माधवानुज | मोडक काशिनाथ हरी | १८७२–१९१६ |
| ५७) | माधव ज्यूलियन् | पटवर्धन माधव त्रिंबक | १८९४–१९३९ |
| ५८) | माधव (कवी) | काटदरे माधव केशव | १८९२–१९५८ |
| ५९) | मामा वरेरकर | वरेरकर भार्गवराम विठ्ठल | १८८३–१९६४ |
| ६०) | विभावरी शिरुरकर | बेडेकर मालतीबाई विश्राम | १९०५– |
| ६१) | मुक्तेश्वर (पंडित कवी) | मुक्तेश्वर चिंतामणी मुद्गल | १५७४–१६४४ |
| ६२) | मुक्ताबाई (संत कवयित्री) | कुलकर्णी मुक्ताबाई विठ्ठलपंत | तेरावे शतक |
| ६३) | मोरोपंत (पंडित कवी) | पराडकर मोरोपंत रामजीपंत | १७२९–१७९४ |
| ६४) | यशवंत (कवी) | पेंढरकर यशवंत दिनकर | १८९९– |
| ६५) | रामदास (संत) | ठोसर (कुलकर्णी) नारायण सुर्याजी | १६०८–१६८१ |
| ६६) | रवींद्रनाथ | टागोर रवींद्रनाथ देवेंद्रनाथ | १८६१–१९४१ |
| ६७) | राम जोशी (शाहीर कवी) | जोशी रामचंद्र जगन्नाथ | १७६२–१८१२ |
| ६८) | राधारमण | लिमये कृष्णाजी पांडुरंग | १८७७–१९२२ |
| ६९) | रेंदाळकर (कवी) | रेंदाळकर एकनाथ पांडुरंग | १८८७–१९२० |
| ७०) | लालबहादुर शास्त्री | प्रसाद लालबहादुर शारदा | १९०४–१९६६ |
| ७१) | लोकहितवादी | देशमुख गोपाळ हरी | १८२३–१८९२ |
| ७२) | लो. टिळक | टिळक बाळ गंगाधर | १५५६–१९२० |
| ७३) | वसंत (कवी) | पटवर्धन वासुदेव बळवंत | |
| ७४) | वसंत बापट (कवी) | बापट विश्वनाथ वामन | १९२२– |
| ७५) | वाङ्मयप्रभू | त्रिलोकेकर ख स. | |
| ७६) | विनायक (कवी) | करंदीकर विनायक जनार्दन | १८७२–१९०९ |
| ७७) | विंदा करंदीकर (कवी) | करंदीकर गोविंद विनायक | १९१८– |

| | टोपण नाव | मूळ नाव | कालखंड |
|---|---|---|---|
| ७८) | शाहू महाराज | घाटगे यशवंतराव आबासाहेब | १८७४–१९२२ |
| ७९) | शांताराम | पुरोहित के. ज. | १९२३– |
| ८०) | संजीवनी (कवयित्री) | मराठे संजीवनी | १९१६– |
| ८१) | सामराज (पंडित कवी) | मुद्‌गल शामभट लक्ष्मणभट | १६०८–१६८८ |
| ८२) | सानेगुरुजी | साने पांडुरंग सदाशिव | १८९९–१९५० |
| ८३) | साधुदास | मुजुमदार गोपाळ गोविंद | १८८३–१९४८ |
| ८४) | सेनापती बापट | बापट पांडुरंग महादेव | १८८०–१९६७ |
| ८५) | सोपानदेव | कुलकर्णी सोपानदेव विठ्ठलपंत | तेरावे शतक |
| ८६) | स्वातंत्र्यवीर सावरकर | सावरकर विनायक दामोदर | १८८३–१९६६ |
| ८७) | होनाजी | शिलारखाने होनाजी सय्याजी | |
| ८८) | ज्ञानेश्वर | कुलकर्णी ज्ञानेश्वर विठ्ठलपंत | १२७५–१२९६ |


देवगड कॉलेजला व 'रसराज'ला
हार्दिक शुभेच्छा !

**बी. जी. ठाकुरदेसाई**
पडेल, ता. देवगड

**अत्यंत विश्वसनीय आंबा सर्व्हिस**
**पडेल ते मुंबई**

देवगड कॉलेजला व 'रसराज'ला
हार्दिक शुभेच्छा !


**भागिरथी पोहा मिल**
**आंबेखोल, शिरगांव**

सौ. शिला गजानन साटम

राष्ट्रीय सेवा योजना— "जिओ और जिने दो"



**"लाल रंग तो रक्ताचा । करुणेचा अन् त्यागाचा ।।"**
रक्तदान करीत असताना शबनम काद्री



'**राष्ट्रीय सेवा योजना समिती' सभासद**— शबनम काद्री, लता हरम, प्रा. सुरेश सोनटक्के, प्राचार्य आर ए कुलकर्णी, प्रा. ल. दा. गोलतकर, प्रा. शशिकांत धुमाळ व सुशील राणे.




"**केल्याने देशाटन**"— गगनबावडा सहलीतील एक आनंदाचा क्षण !



"**साथी हाथ बढ़ाना !**" —विजयदुर्ग येथील श्रमसंस्कार शिबिरात शिबिरार्थी


# प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी



डावीकडून अनुक्रमे बसलेले: प्रा. भारत भोसले, प्रा. अनंत मिरीकर, प्रा. शशिकांत धुमाळ, प्रा. मधुकर गावडे, प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, प्रा. ल. दा. गोलतकर, प्रा. टी. सेल्व्हराज, प्रा. सुरेश सोनटक्के, प्रा. दत्तात्रय बलवान, प्रा. लता वळसंगकर

उभे: चंद्रकांत महाडिक, यशवंत देऊलकर, महेश्वर लेले, गणेश गोडबोले, प्रा. कालिदास जोशी, प्रा. प्रकाश उपाध्ये, प्रा. अरुण पणदुरकर, प्रा. अविनाश त्रि. कांबळे, प्रा. श्याम पाटील, प्रा. श्रीकृष्ण बोराटे, एस्. एस्. पाटील, श्रीनिवास पळसुले, वसंत धोपटे नामदेव केतकर.

|| Not me, but you. ||



# राष्ट्रीय सेवा योजना

# ॥ राष्ट्रीय सेवा योजना– एक सामाजिक गरज ॥

॥ अलका हुर्डीकर / द्वितीय वर्ष कला ॥

राष्ट्रीय सेवायोजना ही योजना सरकारच्या इतर योजनांप्रमाणे नसून एक आगळीवेगळी योजना आहे. ही योजना प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून राबविण्यात येते. सुमारे १९६९-७० मध्ये देशातील काही निवडक विद्यापिठांतर्गत महाविद्यालयातून या योजनेचा शुभारंभ झाला. त्यानंतर बहुतेक महाविद्यालयामधून ही योजना राबवली जात असून त्यामध्ये लाखो विद्यार्थी स्वयंप्रेरणेने सहभागी होत आहेत.

ग्रामीण पुनर्रचना, समाजविकास ही जरी या योजनेची उद्दिष्टे असली, तरी यापूर्वी भारतात अशा उद्दिष्टांच्या काही योजना होत्या. त्यांचाही याठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे. कै. रविंद्रनाथ टागोरांचे बंगालमधील ग्रामीण पुनर्रचनेचे प्रयोग तर प्रसिद्धच आहेत. त्यामध्ये श्रीनिकेतन योजनेत, सर्वसामान्य व्यक्तीस समर्थ बनवण्याचे प्रयत्न करण्यात आले. पंजाबमधील एफ्. एल्. ब्रायन यांची गुरगांव योजनादेखील सर्वश्रुत आहे. व्ही. टी. कृष्णमाचारींनीदेखील ग्रामीण पुनर्रचना कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केले नाही. उत्तर प्रदेशातील इटवा प्रकल्पाचा देखील यामध्ये मोठा वाटा आहे म. गांधींचा ग्रामीण स्वराज्याचा प्रयोग तर जगप्रसिद्धच आहे. यामध्ये ग्रामीण अर्थ व्यवस्थेच्या विकासावर, ग्रामीण भागातील समाजाच्या उन्नतीवर विशेष भर दिलेला होता. म. गांधींचे अनुयायी कै. विनोबा भावे यांची सर्वोदय योजना हीसुद्धा एक अशाच प्रकारची योजना म्हणता येईल. वरील सर्व योजनांचे प्रयोग या समाजरचनेत झाले असले तरी आज खरी गरज आहे ती 'राष्ट्रीय सेवा योजनेची'!

भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातील ६.५ लाख खेड्यांमधून रहात आहे आणि गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे 'हाच खरा भारत आहे.' स्वातंत्र्यपूर्व काळात या समाजासाठी तसे फारसे प्रयत्न कोणी केले नव्हते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र समाजाच्या पुनर्रचनेसाठी खूप काही केले जात आहे आणि त्याप्रमाणे आम्हालाही या राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे ग्रामीण समाजाची पुनर्रचना करायची आहे. या ग्रामीण भागातील लोकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यासंबंधी त्यांना मार्गदर्शन करुन त्यांचा विकास करण्याची ही एक अपूर्व संधी आहे. वर्षानुवर्षे अज्ञानाच्या, अंधश्रद्धेच्या गर्तेत सापडलेल्या या समाजाला सुधारणे हेच आयुष्यात

केलेले फार मोठे पुण्य आहे. ज्या समाजाला केवळ चार भितीच्या आतील जगापलीकडे जगाच्या रंगभूमीवर कोणती नाटके घडताहेत याची तिळमात्र जाणीवही नसते, त्या समाजाला जगात घडणाऱ्या घटनांची माहिती करुन देणेही या योजनेद्वारे शक्य होते. या समाजातील सगळेच लोक मंदबुद्धीचे असतात असे नाही. पण त्याची वृद्धी होण्यासाठी त्याला योग्य दिशा मिळणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सेवा योजना अशा गोष्टीस हातभार लावत असते.

शहरी भागातील विद्यार्थ्यांना ग्रामीण लोकांची, त्यांच्या जीवनाची, त्यांच्या शहरीमानाची कल्पना यावी एवढाच संकुचित दृष्टिकोन या योजनेचा नसून या ग्रामीण समाजरचनेत नव्याने बदल करण्याचे महत्वाचे उद्दिष्ट या योजनेने डोळ्यापुढे ठेवले आहे. यामध्ये केवळ ग्रामीण भागातील लोकांच्या अडीअडचणींची तोंड-ओळख करुन घ्यायची नाही तर त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाय-योजना करता येतील याविषयी प्रयत्न करणे महत्वाचे आहे. मग हे प्रयत्न कशाप्रकारे करता येतील ? तर आपण नेहमी म्हणतो की शिक्षणाशिवाय सर्वांगिण विकास होऊ शकत नाही. जर ग्रामीण विकास किंवा ग्रामीण पुनर्रचना करायची असेल तर प्रथम ग्रामीण जनतेला शिक्षण देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी या योजनेंतर्गत 'प्रौढ साक्षरता मोहिम' राबवून अशिक्षित लोकांना शिक्षण देण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. ग्रामीण विकासासाठी सरकारच्या असलेल्या अनेक योजनांची प्रत्यक्ष त्यांनाच कल्पना नाही. आणि म्हणून अल्पभूधारक सीमांत शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना सरकारकडून मिळणाऱ्या सोयी सवलती, भिन्न भिन्न संस्थांपासून मिळणारे फायदे कोणते आणि ते कसे मिळवावे या-संबधीची माहिती पुरवायचे काम ही योजना करत आहे. त्याचप्रमाणे अज्ञान, अंधश्रद्धा अशा कारणामुळे ग्रामीण भागात लोकसंख्यावाढीचे प्रमाण जास्त असते. त्याचे परिणाम काय होतात ? ते टाळण्याठी लोकसंख्येवर नियंत्रण कसे ठेवावे ? यासाठी आवश्यक असणारी वातावरणनिर्मिती करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.



ग्रामीण भागात शेती हे उत्पादनाचे एकमेव साधन असते. या साधनाकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहिले तर निश्चितच शेतीचा विकास होऊ शकेल. अशा-प्रकारे विकास करण्यासाठी शेतीउत्पादनाचे महत्व व त्यासंबंधी घ्यावयाची काळजी इ. गोष्टीसंबंधी माहिती देण्याची आवश्यकता आहे की जेणेकरुन शेत-करी व्यापारी दृष्टीने शेती करण्यास प्रवृत्त होईल आणि शेतीचा विकास झाला की पर्यायाने राष्ट्राच्या विकासास हातभार लागू शकेल. शेतीव्यतिरिक्त ग्रामीण भागातून करता येणारे जोडधंदे म्हणजे मासे-मारी, कुक्कुटपालन, पशुपालन, दुग्धव्यवसाय इ. होत. अशा उद्योगांकडे लोकांची मने वळवून त्यातून आर्थिक-दृष्टया स्वावलंबी होण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करता येणे कसे शक्य आहे, यासंबंधीचे मार्गदर्शन करणे अशा विविध उपक्रमाद्वारे 'राष्ट्रीय सेवा योजना' ग्रामीण विकासास हातभार लावत आहे.

ग्रामीण समाजात कुटुंबसंस्था, जातिसंस्था, उदासीनता, धार्मिक कल्पना अजूनही लोकांच्या मनातून गेलेल्या नाहीत की ज्यामुळे ग्रामीण विकासामध्ये एक प्रकारचा अडसर निर्माण झाला आहे. विकासातील हे अडसर दूर करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना भरीव कार्य करत आहे. त्यासाठी जातिभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, हुंडापद्धत निर्मूलन अशा विषयांवर शिबिरे घेऊन त्या ठिकाणच्या समाजाला त्या त्या विषयाची योग्य ती माहिती पुरवून कोणत्या गोष्टीमुळे कोणते तोटे होतात ते समजावून सांगून त्या लोकांना दुरसट विचारापासून परावृत्त करणे, समाजातील बुवाबाजी, ढोंगीपणा, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी काहीं कलापथ-कांचा त्याचप्रमाणे चित्रपटांचा वापरही ही योजना करत आहे. समाजामध्ये 'युवाशक्ती' ही एक फार मोठी शक्ती आहे. या शक्तीचा योग्य वापर केला तर फार मोठे विधायक स्वरुपाचे बदल होऊ शकतात. त्यासाठी ही योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून राबवण्यात येते. यामध्ये स्वयंस्फुर्ती आणि स्वयंप्रेरणेनें विद्यार्थी सहभागी होत असतात. भारतीय समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकास करायचा असेल तर 'राष्ट्रीय सेवा योजना' ही एक सामाजिक गरज आहे.

देवगड कॉलेज

# ॥ विजयदुर्ग— एक अविस्मरणीय शिबिर ॥

॥ श्रीकांत धुपकर / द्वितीय वर्ष कला ॥

देवगड तालुक्यातील निसर्गसौंदर्याचा वारसा असलेले एक छोटेसे विजयदुर्ग हे गांव ! तिन्ही बाजूंनी विस्तृत पसरलेला समुद्र आणि तेथील 'विजयदुर्ग' किल्ला हे तेथील खास वैशिष्ट्य आहे. सभोवताली दिसणारा निसर्ग तर कुणाचेही मन वेधून घेतल्याशिवाय रहाणार नाही, अशा निसर्गरम्य ठिकाणी आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे ग्रामीण पुनर्रचना शिबिर २४–१२–८२ ते २–१–८३ या कालावधीत संपन्न झाले.

आमचा मुक्काम ज्या ठिकाणी होता, तो नानासाहेब धुळप यांचा प्रशस्त ऐतिहासिक वाडा, प्रवेश करतानाचे भव्य प्रवेशद्वार, सभामंडप आणि मध्येच एक मोठा चौक, वाड्यासाठी वापरलेले प्रचंड मोठे लाकूडसामान इत्यादी सर्व गोष्टी इतिहासाची प्रत्यक्ष साक्ष देत होत्या. वाड्याच्या प्रवेशद्वारामध्ये उभे राहिल्यानंतर समोरच भव्य पसरलेल्या समुद्राने आपल्या कुशीत घेतलेला 'विजयदुर्ग' किल्ला चटकन् दृष्टीस पडल्याशिवाय रहात नाही आणि त्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी वेळेचे भान हरपून जाते. चांदण्यारात्री तर हे निसर्गसौंदर्य इतके खुलून दिसते की पाहून कोणाचेही मन ते निसर्गसौंदर्यदृश्य काबीज केल्यावाचून रहात नाही.

यंदाच्या ह्या शिबिरात एकूण ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात ४० विद्यार्थी आणि ३० विद्यार्थिनी यांचा सहभाग होता. आमच्याबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. शशिकांत धुमाळ आणि प्रा. सुरेश सोनटक्के होते. या व्यतिरिक्त शिबिराच्या कालावधीत ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी व्हायचे आणि आम्हाला सहकार्य करायचे. त्यांचे मार्गदर्शन तर होतेच, शिवाय गांवाबाहेरील प्रतिष्ठित लोकही आमच्या शिबिराला भेट देऊन मार्गदर्शन करायचे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर म्हटल्यानंतर केवळ श्रमदान करणे हेच एकमेव कार्य होऊ शकत नाही, याचा प्रत्यय या शिबिरात आला. या कालावधीत आम्ही विजयदुर्ग गांवातील गिर्येवाडी येथील स्मशानघाटीकडे जाणारा सुमारे ६६० फूट लांबीचा आणि ८ फूट रुंद असा रस्ता तयार केला. त्याचबरोबर आम्ही श्री. रामेश्वरमंदिराकडे

साफ-सफाई केली. त्याचबरोबर गावातील लोकांची आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक पाहणी करून त्यांच्या समस्यांचीही माहिती जमा केली. काही विद्यार्थीनी विजयदुर्ग येथील हायस्कूलमध्ये अध्यापनाचेही काम केले. गावातील लोकांच्या विहिरीत जंतुनाशक औषध टाकले. रात्री विविध करमणुकीचे कार्यक्रम पार पडले. त्यात स्थानिक लोकांचाही सहभाग होता. त्याशिवाय दुपारच्या कालावधीत निरनिराळ्या व्यक्तींची व्याख्याने झाली. ह्या व्याख्यानामार्फत आम्हा विद्यार्थ्यांना बरीच अपरिचित माहिती उपलब्ध झाली. ह्या कामी शिबिरसंयोजकांनी घेतलेली मेहनत, परिश्रम विसरुन मुळीच चालणार नाही. त्यांच्या कौशल्यामुळे आणि योग्य धोरणामुळेच हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला. वरील व्याख्यानामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टींचा ह्या ठिकाणी उल्लेख केलाच पाहिजे, तो म्हणजे श्री. धनवटकरसाहेबांनी दिलेली बँकविषयक माहिती आणि कॅ. डाफरे यांनी बोटीविषयी म्हणजे प्रवासी बोट आणि वाहतूक बोट याबद्दल दिलेली मौल्यवान माहिती, यामुळे अनेक विद्यार्थी त्याचा फायदा घेऊ शकतील.

ह्या सर्व कार्यक्रमात आणखी एका वैशिष्टयपूर्ण घटनेचा, कार्यक्रमाचा उल्लेख करावाच लागेल, आणि तो खास असा कार्यक्रम म्हणजे वेंगुर्ला येथील प्रा. साळुंखे यांच्या चित्रकलेचे भव्य प्रदर्शन ! प्रा. साळुंखे जरी पेशाने शिक्षक असले, तरी कलाकारही आहेत. देवाने त्यांच्या बोटात एक आगळीच कला दिली आहे ती म्हणजे चित्रकला ! देव कुणाच्या हातात काय देईल त्याचा नेम नाही ! मानवी भावनांचे तसेच निसर्गाचे बोलके चित्र त्यांनी ह्या आपल्या निरनिराळ्या चित्रांद्वारे प्रगट केले आहे. त्यांच्या चित्रांमध्ये एकंदर पाहता निसर्गचित्रांकडेच त्यांचा कल दिसतो. ह्या चित्रकला प्रदर्शनाचा लाभ स्थानिक तसेच इतरही खूप लोकांना मिळाला. हे चित्रप्रदर्शन ज्यांनी घडवून आणले ते आमचे प्राध्यापक, यांना तेथील खूप लोकांनी दुवा दिला आणि समाधान व्यक्त केले.

या सर्व कार्यक्रमात आम्ही सर्व विद्यार्थी अगदी शिस्तीत तसेच प्रामाणिकपणे, निष्ठेने, जिद्दीने कुठल्याही प्रकारचा भेदाभेद न बाळगता काम केले. हा शिबिर कालावधी केव्हा संपला, ते समजलेच नाही. ह्यात विशेष म्हणजे रस्त्याच्या कामी मुलीही स्वखुषीने, स्वयंस्फुर्तीने काम करीत होत्या. आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होता

एकंदरीत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात तसेच जिव्हाळ्याच्या वातावरणात आणि कौशल्यपूर्ण शिबिरसंयोजकांच्या मार्गदर्शनाखाली हे विजयदुर्ग येथील श्रमदान शिबिर संपन्न झाले. शिबिरानंतर घरी आल्यावर त्या तेथील आठवणी पुन्हापुन्हा त्या सौंदर्याची, प्रसंगाची, कार्यक्रमांची मनामध्ये हुरहूर लावून राहिल्या आहेत. अशा प्रकारे ' विजयदुर्ग ' येथील श्रमदानशिबिर एक अविस्मरणीय शिबिर होय.

## ॥ प्राध्यापक विशेष ॥

**प्राचार्य आर. ए. कुलकर्णी**

१) म. गांधी विद्यामंदिर, **तळेबाजार**
वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष

२) जामसंडे हायस्कूल, **जामसंडे**
वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष

३) अ. कृ. केळकर हायस्कूल, **वाडा**
एस्. एस्. सी. केंद्राचे उद्‌घाटक

४) प्रौढ शिक्षण संघटक शिबिर, **शिरगांव**
समारोप समारंभाप्रसंगी अध्यक्ष म्हणून व्याख्यान
विषय : प्रौढ शिक्षण-मर्यादा व अपेक्षा

**प्रा. ल. दा. गोलतकर**

१) इळये गावी ग्रामस्थांसमोर व्याख्यान
विषय : क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमातून गावाचा विकास

२) फिशरीज स्कूल, **तांबळडेग-मिठबांव**
वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे

३) रामेश्वर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि डी.एड्. महाविद्यालय, **मिठबांव**
डॉ. शिरोडकर पुण्यतिथिप्रसंगी भाषण

४) जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग तर्फे आयोजित केलेल्या देवगड येथील उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटक

**प्रा. सुरेश सोनटक्के**

सप्टेंबर ८२ च्या 'रत्नागिरी टाईम्स्' मध्ये प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्यावरील लेख प्रसिद्ध.

**प्रा. अनंत मिरीकर**

देवगड येथील स्थानिक हौशी कलाकारांच्या 'कथा कुणाची व्यथा कुणा' या नाटकात प्रमुख भूमिका.

**प्रा. अरुण पणदुरकर**

१) शेठ म. ग. हायस्कूल, **देवगड**
काव्यवाचन कार्यक्रमात सहभाग

२) शेठ म. ग. हायस्कूल, **देवगड**
कै. डॉ. टेंकशे स्मृति एकांकिका स्पर्धेचे परीक्षक

**प्रा. कु. लता बळसंगकर**

१) शेठ म. ग. हायस्कूल, **देवगड**
काव्यवाचन कार्यक्रमात सहभाग

२) शेठ म. ग. हायस्कूल, **देवगड**
कै. डॉ. टेंकशे स्मृति एकांकिका स्पर्धेचे परीक्षक

३) शेठ म. ग. हायस्कूल, **देवगड**
'श्रीराम' या वर्धापनदिन विशेषांकाचे परीक्षक

४) रोटरी क्लब, देवगड
'आनंद बाजार'चे परीक्षक

५) हौशी नाट्यसंस्थेतर्फे सादर केल्या जाणाऱ्या 'संगीत मत्स्यगंधा' या नाटकात प्रमुख भूमिका

६) महिला मंडळ, तळेबाजार
व्याख्यान : भारतीय स्त्री— काल : आज : उद्या

७) कुडाळ येथे कथाकथन

८) इनर व्हील क्लब, सावंतवाडी
व्याख्यान : अनिर्बंध स्त्रीस्वातंत्र्य वाढत्या गुन्हेगारीस जबाबदार आहे.

९) इनर व्हील क्लब, सावंतवाडी
परिसंवादात सहभाग: प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांच्या गुणसंवर्धनात सहभाग

१०) 'सिंधुदुर्ग' १९८२ दिवाळी अंकात कथा व कविता प्रसिद्ध

११) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण शिबिर, शिरगांव
व्याख्यान : ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न आणि महिला मंडळाची भूमिका.

१२) श्रीराम वाचन मंदिर व क्रीडाभुवन सावन्तवाडी
स्वा सावरकररांचे सामाजिक विचार

**प्रा. अविनाश वि. कांबळे**

१) शेठ म. ग. हायस्कूल, देवगड
काव्यवाचन कार्यक्रमात सहभाग

२) शेठ म. ग. हायस्कूल, देवगड
'श्रीराम' या वर्धापनदिन विशेषांकाचे परीक्षक

३) शेठ म. ग. हायस्कूल, देवगड
वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक

४) सांगोला विद्यामंदिर प्रशाला व उप-महाविद्यालय, सांगोला, जि. सोलापूर
व्याख्यान : आजच्या शैक्षणिक दुरावस्थेस जबाबदार कोण ? विद्यार्थी, शिक्षक, पालक की सरकार ?

५) पुणे आकाशवाणी केंद्र, पुणे
'स्वरचित्र' कार्यक्रमात भावगीतांची निवड

६) रत्नागिरी आकाशवाणी केंद्र, रत्नागिरी
'कोकणवाणी' कार्यक्रमात काव्यवाचन

७) रविवार तरुण भारत, रविवार कोल्हापूर सकाळ, रविवार पुढारी, रत्नागिरी टाईम्स् दिवाळी अंक, सांगोला टाइम्स आदिमधून कथा, कविता व लेख प्रसिद्ध


**श्री. एस्. एस्. पाटील (ग्रंथपाल)**
'दीपलक्ष्मी' मासिक, मुंबई
राज्य पातळीवरील समीक्षणात्मक निबंधस्पर्धेत प्रथम क्रमांक

विद्यापीठ प्रतिनिधी (U.R.)
व जनरल सेक्रेटरी (G.S.)



एम्. आर. खान

विद्यार्थिनी प्रतिनिधी (L.R.)



सीमा भानू

बारावी वाणिज्य 'प्रथम'



नीला राणे

"अनंत अमुची ध्येयासक्ती ।
अनंत अन् आशा ॥"

बारावी कला 'प्रथम'




अंकुश आचरेकर

जिल्हा जलतरण स्पर्धेत
प्रथम क्रमांक




सतीश धुरत

राष्ट्रीय शिष्यवृत्तीधारक




विजया पेठे


# ....रंगल्या रात्री अशा !
## स्नेहसंमेलनातील एकांकिका क्षणचित्रे




← 'गुंता' –राजेंद्र लांबोरे, राजेंद्र हिंदळेकर, हनुमंत इळकर, तुषार भाबल, जयंत साटम व एन्. एस्. शेख.



↑ 'तीन तेरा नऊ बारा'– शुभांगी सप्रे, चित्रा गानू व उज्वला सबनीस



↑ 'डाग' –श्रीकांत धुपकर व दिनेश खाडिलकर



← 'नाटक बसले आहे' – जयंत साटम, विनायक म्हापसेकर, राजेंद्र हिंदळेकर तुषार भाबल, दामोदर मेस्त्री व छाया वझे

...वाटचाल, मग ती एखाद्या व्यक्तीची असो की एखाद्या संस्थेची असो– ती महत्वपूर्णच असते. वाट चालल्यानंतर पांथस्थ थोडे मागे वळून ज्यावेळी पाहतो, त्यावेळी त्याला आपण तोडलेल्या अंतराची पूर्ण कल्पना येते आणि मग तो परत नव्या आवेशात पुढची वाट चालू लागतो. संस्थेचेसुध्दा असेच असते. संस्थेने केलेली वर्षभरातील वाटचाल वार्षिक अहवालांमधून प्रतिबिंबित होत असते, तिने केलेली प्रगती त्यामधून स्पंदन पावत असते....

# 'वाटचाल'

# १९८२-८३

## ॥ वाटचाल ॥

चालू वर्षी आमचे महाविद्यालय २० जून १९८२ पासून सुरू झाले. आम्ही वर्षभर विविध सांस्कृतिक उपक्रम व्यवस्थितपणे पार पाडले. १ जुलै १९८२ रोजी महाविद्यालयाचा वर्धापनदिन 'देवदुर्ग' चे व्यवस्थापक श्री. शि. स. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून आमच्या शिक्षण विकास मंडळ' या संस्थेचे कार्यवाह श्री. वसंतराव साटम हे उपस्थित होते. त्या वेळचे आमचे प्राचार्य गोपाळराव मयेकर यांनी याप्रसंगी महाविद्यालयाची आजपर्यंतची वाटचाल व शिस्तीची परंपरा आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितली.

१ ऑगस्ट हा लो. टिळकांचा पुण्यतिथी दिवस! त्यानिमित्त प्रा. ल. दा. गोलतकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी टिळकांच्या जीवनविषयी आपले विचार व्यक्त करणारी भाषणे केली. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन! या दिवशी सकाळी झेंडावंदन झाल्यानंतर आमच्या 'रसराज' या भित्तिपत्रकाच्या प्रथमांकाचे प्रकाशन प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

५ सप्टेंबर रोजी प्राचार्य गोपाळराव मयेकर यांना महाविद्यालय, संस्था व नागरिक या सर्वांच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला. या निरोप समारंभास आम. दादासाहेब राणे हें प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थि होते. संस्थेचे कार्यवाह श्री. वसंतरव साटम यांनी अध्यक्षपद भूषविले होते.

२ ऑक्टोबर हा लालबहादुर शास्त्री व म. गांधी या दोन राष्ट्रपुरुषांचा जन्मदिन! त्यानिमित्त पुण्याचे प्रा. न. म. जोशी यांचे एक व्याख्यान ठेवण्यात आले. याच वेळी काही विद्यार्थी-विद्यार्थिनींचेही समयोचित भाषणे झाली.

६ व ७ सप्टेंबर या दिवशी आमचे महाविद्यालय व येथील 'लोकमित्र मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य गोपाळराव मयेकर यांची ज्ञानेश्वरीवर दोन व्याख्याने गुरुदक्षिणा प्रेक्षागृहात जाहीर स्वरुपात ठेवण्यात आली.

दिवाळीनंतरच्या दुसऱ्या सत्रामध्ये जानेवारी ८३ मध्ये जनता पक्षाचे नेते खासदार प्रा. मधु दंडवते

यांचे 'भारतीय लोकशाही' या विषयावर एक सैद्धांतिक स्वरुपाचे व्याख्यान महाविद्यालयात झाले. प्राचार्य गोपाळराव मयेकरांना निरोप दिल्यानंतरच्या मधल्या कालावधीत प्रभारी प्राचार्य म्हणून प्रा. ल दा. गोलतकरांनी महाविद्यालयाचे कामकाज पाहिले. १५ जाने. ८३ पासून मात्र महाविद्यालयाला प्रा. आर. ए. कुलकर्णी हे नूतन प्राचार्य लाभले. त्यांच्या स्वागताप्रित्यर्थ महाविद्यालय व संस्था यांच्या विद्यमाने एक उत्स्फूर्त असा समारंभ आयोजित करण्यात आला. या प्रसंगी संस्थासदस्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांची नूतन प्राचार्यांचे स्वागत करणारी भाषणे झाली. स्वागताला उत्तर म्हणून शेवटी प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांचे भाषण झाले.

१४ जानेवारी मकर संक्रांतीचा दिन ! त्यानिमित्त आमचे माजी प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाने 'तिळगूळ वाटप समारंभ' आयोजित केला. या समारंभात प्राचार्य मयेकर व प्रा. ल. दा. गोलतकर यांची संक्रातीचे महत्त्व कथन करणारी भाषणे झाली.

२६ जानेवारी प्रजासत्ताकदिन ! या दिवशी आमचे नूतन प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांच्या हस्ते झेंडा-वंदन संपन्न झाले. नंतर 'प्रजासत्ताकदिन विशेषांक' म्हणून काढण्यात आलेल्या 'रसराज' च्या अंकाचे प्रकाशन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले

३० जानेवारी म. गांधी पुण्यतिथीदिन ! त्यानिमित्त आयोजित केलेल्या 'गांधी:जीवन व कार्य' या विषया-वरील ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन व मराठीतील नामवंत एककावन्न साहित्यिकांच्या छायाचित्रांचे अनावरण आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्रीमान शां. कृ. तथा बापू-साहेब पंतवालावलकर यांच्या हस्ते करण्यात आले. याचवेळी मान. पंतवालावलकरांच्या स्वागताप्रित्यर्थ एक छोटासा समारंभही संपन्न झाला. या प्रसंगी


देवगड महाविद्यालयाला आणि "रसराज"ला हार्दिक शुभेच्छा !

**मे. दामोदर दत्तात्रय खाडये**

किराणा भुसारी मालाचे व्यापारी, कोळोशी

होलसेल काजू, कोकम बी व्यापारी, कणकवली

**पाध्ये मेडिकल स्टोअर्स**

**कणकवली**

गावातील प्रतिष्ठित नागरीक, आमचे प्राचार्य व प्राध्यापक आणि विद्यार्थी यांची समयोचित भाषणे झाली.

३ फेब्रुवारी रोजी शिवसेनेचे झुंजार नेते व आमच्या महाविद्यालयाचे हितचिंतक आम. वामनराव महाडिक हे महाविद्यालयास भेट देऊन गेले. त्यांनी प्राध्यापकांशी हितगूज केले.

२२ मार्च रोजी कोकण विकास महामंडळाचे अध्यक्ष बॅ. शरद पालव यांनी महाविद्यालयाला धावती भेट दिली. त्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

२४ मार्च रोजी महाराष्ट्र बँक, शाखा जामसंडे यांच्यातर्फे महाविद्यालयात एक छोटे शिबिर आयोजित करण्यात आले. 'रोजगार प्रोत्साहन योजना' या विषयावरील या शिबिरात जामसंडे शाखेचे व्यवस्थापक श्री. अभ्यंकर, कट्टा शाखेचे व्यवस्थापक श्री. नाटेकर व रत्नागिरी शाखेचे टेक्निकल ऑफिसर श्री. गोळे या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिबिराचे प्रास्ताविक प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांनी केले, तर आभारप्रदर्शनाचे काम प्रा. टी सेलव्हराज यांनी पार पाडले. प्रा. अरुण पणदुरकर, प्रा. ल. दा. गोलतकर व स्वतः प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने काही प्रश्न विचारून चर्चेला रंगत आणली.

३१ मार्च रोजी या वर्षीच्या तृतीय वर्षाच्या कला व वाणिज्य या वर्गांना महाविद्यालयातर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला. या निरोप समारंभात १८ विद्यार्थी-विद्यार्थिनी व ६ प्राध्यापक यांची समयोचित भाषणे झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. ए. कुलकर्णी हे होते. या प्रसंगी तृतीय वर्षाच्या वर्गातर्फे जनरल सेक्रेटरी एस्. आर. खान याने महाविद्यालयाला विद्युत् घंटा भेट म्हणून दिली. या समारंभाचे प्रास्ताविक प्रा. शशिकांत धुमाळ यांनी केले, तर आभाराचे काम सुशील राणे याने पार पाडले.

या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा एक विविधगुणदर्शनपर कार्यक्रम रत्नागिरी आकाशवाणी केंद्रावर 'युववाणी'-मध्ये यशस्वीरीत्या सादर करण्यात आला.

केंद्र सरकारचे फिल्ड पब्लिसिटी ऑफिसर श्री. पुजारी यांनी नुकतीच महाविद्यालयास भेट देऊन महाविद्यालयाने हाती घेतलेल्या सामाजिक कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

महाविद्यालयासमोर बागबगिचा करण्याचे काम नुकतेच प्रा. श्रीकृष्ण बोराटे यांनी शिपायांच्या सहकार्याने जोरात सुरू केले आहे.

चालू शैक्षणिक वर्षी भारताचे माजी अर्थमंत्री थोर अर्थतज्ज्ञ चिंतामणराव देशमुख, मराठी प्रकाशन व्यवसायातील नामवंत प्रकाशक ह. वि. मोटे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जवाहिरे व आमच्या महाविद्यालयाचे देणगीदार यशवंतराव नाईक, भारताचे ऋषितुल्य थोर गांधीवादी नेते आचार्य विनोबा भावे, महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्री श्रीमती शरच्चंद्रिका पाटील तसेच आमच्या महाविद्यालयाचा एस्. वाय्. बी. कॉम्. मधील विद्यार्थी अविनाश सारंग यांच्या निधनाबद्दल त्या त्या वेळी महाविद्यालयात शोकसभा घेऊन मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

महाविद्यालयात वेगवेगळ्या विभागांच्या द्वारे संपूर्ण वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्या विभागाचे अहवाल पुढीलप्रमाणे होत:

## || स्नेहसंमेलन ||

मागील वर्षीचे स्नेहसंमेलन २७ जाने. ८२ रोजी बॅ. शरद पालव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. सुप्रसिद्ध कविवर्य बा. भ. बोरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. हे संमेलन यशस्वी करण्यामध्ये त्यावेळचे स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा. टी. सेलव्हराज, स्नेहसंमेलन विद्यार्थी प्रतिनिधी मोहन तेली व जनरल सेक्रेटरी मनोहर राणे यांचा सिंहाचा वाटा आहे.

चालू वर्षीचे स्नेहसंमेलन सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. अंबादास माडगूळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. दि. १३ जानेवारी रोजी या

संमेलनाला प्रारंभ होऊन त्याचदिवशी प्रमुख कार्यक्रमात अध्यक्षांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. रात्री सादर करण्यात आलेल्या करमणुकीच्या कार्यक्रमात ४ एकांकिका व विविधगुणदर्शन सादर करण्यात आले. 'गुंता,' 'नाटक बसते आहे,' 'डाग' व पुरूषपात्रविरहित असलेली एकांकिका 'तीन तेरा नऊ बारा' या सर्व एकांकिकांना अनुक्रमे प्रा. अरुण पणदुरकर, प्रा. कु. लता वळसंगकर व प्रा. अनंत मिरींकर यांचे दिग्दर्शन लाभले होते. विविधगुणदर्शनाचा कार्यक्रम प्रा. प्रकाश उपाध्ये यांनी बसविला होता.

दि. १४ जानेवारी रोजी महाविद्यालयात विविध कार्यक्रम करण्यात आले. त्यात मनोरंजनात्मक खेळ, शेला-पागोटे, अल्पोपहार यांचा समावेश होता. प्रा. गोलतकरांच्या अध्यक्षतेखालील समितीत असलेल्या प्रा. धुमाळ, प्रा. पाटील, प्रा. बलवान व प्रा. बोराटे या सर्वांनी मनोरंजनात्मक खेळ व्यवस्थित पार पाडले. 'शेला पागोटे' कार्यक्रमासाठी प्रा. टी. सेलव्हराज यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. गोलतकर, प्रा. गोठोसकर व प्रा. गावडे यांची निवड समिती नेमण्यात आली होती. या समितीने निवडलेल्या 'शेला-पागोटचां' चे वाचन प्रा. कालिदास जोशी, दिनेश खाडिलकर व कु. अलका हर्डीकर यांनी रंजक पद्धतीने सादर केले. 'उत्कृष्ट शेला-पागोटया' ची पारितोषिके कु. शरयू परब व कु. आशा गोखले यांना देण्यात आली. प्रा. सुरेश सोनटक्के, प्रा. भारत भोसले व श्री. एस्. एस्. पाटील यांच्या समितीने आटोपशीर अल्पोहार देऊ केला.

स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थी विरुद्ध प्राध्यापक असा एक मित्रत्वाचा क्रिकेट सामना आयोजित करण्यात आला होता. या सामन्यात विद्यार्थ्यांचा संघ विजयी झाला. प्राध्यापक-संघाचे नेतृत्व प्रा. भोसले यांनी


आमची दर्जेदार उत्पादनें...

**अंबिका**

☆ हापूस आंबारस
(हवाबंद डब्यामध्ये)

☆ आंबा सरबत

☆ आंबा लोणचे

☆ मिश्र लोणचे

आणि बरेच काही.

– उत्पादक –

**द्वारका फुडस्**

जामसंडे, पिन– ४१६६१२

जिल्हा : सिंधुदुर्ग

☎ ४०

आमचेकडे ट्रक, रिक्षा, टॅक्सी मोटारसायकल इत्यादींचे पंक्चर काढले जातील. हवा भरुन दिली जाईल. तसेच व्हॉल्कनायझींगची कामे केली जातील.

**खान टायर सर्व्हिस**

मेनरोड, देवगड

केले, तर विद्यार्थी-संघाचे नेतृत्व विश्वनाथ वायगणकर यांनी केले.

दोन दिवसांचे हे स्नेहसंमेलन शिस्तबद्ध रीतीने उत्साही वातावरणात पार पडले. संमेलन कार्याध्यक्ष प्रा. टी. सेल्व्हराज व जनरल सेक्रेटरी एम्. आर खान, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. सीमा गानू, स्नेहसंमेलन विद्यार्थी प्रतिनिधी श्रीकांत धुपकर या सर्वांचे परिश्रम संमेलनाच्या यशास कारणीभूत ठरले.

| स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष | विद्यार्थी प्रतिनिधी |
|---|---|
| प्रा टी. सेल्व्हराज | एम्. आर. खान |
| | कु. सीमा गानू |
| | श्रीकांत धुपकर |

## ।। ग्रंथालय ।।

ग्रंथालय म्हणजे ज्ञानभांडार! महाद्यालयीन अभ्यासक्रमात ग्रंथालयाला अनन्यसाधारण महत्त्व असते. शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांना जसे प्रयोगशाळेवर अवलंबून रहावे लागते, त्याप्रमाणे कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना ग्रंथालयावर अवलंबून रहावे लागते. ज्ञानार्जन करण्यासाठी व विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्यासाठी सुसज्ज व उच्च प्रतीच्या ग्रंथांनी समृद्ध असे आमचे ग्रंथालय आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मुबलक वाचनसाहित्य आम्ही उपलब्ध करुन देत आहोत. ग्रंथालयाचा सर्वांना पुरेपूर फायदा करुन घेता यावा यासाठी ग्रंथालय सकाळी ८ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळेत उघडे असते. आमच्या ग्रंथालयात विविध भाषेतील विविध विषयावरील सुमारे १ लाख रुपये किमतीचे ७ हजार ग्रंथ आहेत. चालू शैक्षणिक वर्षी आम्ही एकूण सुमारे १० हजार रुपये रकमेची एकूण ४३० पुस्तके खरेदी केली आहेत. आमच्या ग्रंथालयात दररोज सुमारे १०० ग्रंथांची देवघेव होते. कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाबरोबर इतर विषयाचेही ज्ञान मिळावे म्हणून इतर विषयांवरील ग्रंथ आम्ही ग्रंथालयात घेतलेले आहेत. तसेच ग्रंथालयामध्ये विविध विषयावरील ५० नियतकालिके व ८ वर्तमानपत्रे घेतली जातात. संदर्भ, संशोधन व मनोरंजन यासाठी उपयोग व्हावा म्हणून ग्रंथालयामध्ये आतापर्यंत घेतलेल्या सर्व नियतकालिकांचे सुमारे ३०० खंड बांधून घेतलेले आहेत.

बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भागातून येतात. आर्थिक अडचणींमुळे त्यांना ग्रंथालयातील पुस्तकांवरच अवलंबून रहावे लागते. म्हणून गृहवाचनासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासाची एकाच वेळी २ ते ४ पुस्तके आठवड्याच्या मुदतीने दिली जातात

पुस्तकपेढीतर्फे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना नाममात्र रक्कम भरुन वर्षभर वापरण्यासाठी पुस्तके दिली जातात. चालू वर्षी सुमारे ४ हजार रुपये किमतीची ३७५ पुस्तके १५० विद्यार्थ्यांना दिली आहेत.

या वर्षी ३० जानेवारी ८३ रोजी महाविद्यालयाने 'म. गांधी : जीवन व कार्य' यावरील एक ग्रंथप्रदर्शन आयोजित केले होते. तसेच मराठीतील नामवन्त ५१ साहित्यिकांच्या छायाचित्रांचे व त्यासोबत त्यांच्या गाजलेल्या एकेक ग्रंथांचे एक प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाचा लाभ बहुसंख्य विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी घेतला. वरील दोन्ही प्रदर्शनांचे उद्घाटन शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष मान. शां. कृ. पंतबालावलकर यांनी केले.

**श्री. एस्. एस्. पाटील,**
एम्. ए. बी. लिब्. एस्सी.
ग्रंथपाल

## ।। 'रसराज' भित्तिपत्रक ।।

'रसराज' भित्तिपत्रक हा आमच्या महाविद्यालयातील एक विद्यार्थीप्रिय व महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. गेल्या ८ वर्षांपासून हे भित्तिपत्रक विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाट करुन देत आले आहे.

चालू वर्षीचा प्रथमांक १५ ऑगस्ट रोजी 'स्वातंत्र्य-दिन विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करण्यात आला. या अंकाचे प्रकाशन आमचे त्यावेळचे प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. 'रसराज' चे

मागील वर्षीचे विद्यार्थी-संपादक एम्. आर. खान व संजीव कुलकर्णी यांनी 'रसराज' चा प्रथमांक व नंतरचा दिवाळीपूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेला दुसरा अंक या दोन्ही अंकांची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. दिवाळीनंतरच्या दुसऱ्या सत्रामध्ये महाविद्यालयाला नूतन प्राचार्य आर. ए. कुलकर्णी हे लाभले आणि मग त्यांच्या प्रेरणेने 'रसराज' आपली कात टाकून नव्या तेजस्वी रुपात प्रगटू लागला. या वर्षीच्या 'रसराज' चे संपादनकार्य सांभाळण्यासाठी प्रा. पुरुषोत्तम गोठोसकरांशिवाय प्रा. अविनाश कांबळे व प्रा. लता वळसंगकर हे दोन नवे प्राध्यापक पुढे आले. तसेच विद्यार्थी-संपादक म्हणून सतीश कोयंडे, एम्. आर. खान, सुशील राणे, सदानंद देसाई या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या नव्या संपादक मंडळाने तयार केलेल्या 'रसराज' च्या प्रजासत्ताकदिन विशेषांकाचे प्रकाशन २६ जानेवारी रोजी प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न झाले. या अंकातील साहित्य व सजावट दर्जेदार तर होतीच, पण सुभाष कुलकर्णींचे मुखपृष्ठ अधिक लक्षवेधक ठरले.

'रसराज' मधून वर्षभर जे साहित्य प्रसिद्ध केले जाते, ते दर्जेदार असावे म्हणून दर वर्षी उत्तम साहित्यकृतींना पारितोषिके देण्यात येतात. या वर्षी पुढील विद्यार्थ्यांना 'रसराज' ची पारितोषिके देण्यात आली आहेत :

१) **सर्वोत्कृष्ट लेख**— 'माझे शिवमनोगत'
विजय खवळे, बारावी कला

२) **सर्वोत्कृष्ट कथा**— 'उध्वस्त'
संजीव कुलकर्णी, प्रथम वर्ष वाणिज्य

३) **सर्वोत्कृष्ट कविता**— 'निळ्या नभातून'
कु. माधुरी धुपकर, द्वितीय वर्ष कला

'रसराज' साठी हार्दिक शुभेच्छा !

आमच्याकडे स्टेशनरी व कटलरी साहित्य माफक दरात मिळेल.
तसेच सायकल सामान मिळेल.

**साजन स्टोअर्स**
**देवगड**
प्रोप्रा. मधुकर कडू

'रसराज' साठी हार्दिक शुभेच्छा !

आमचेकडे शालोपयोगी क्रमिक पुस्तके, धार्मिक पुस्तके, स्टेशनरी सामान, हार्डवेअर माफक दरांत मिळेल.

**विविध वस्तु भांडार**
**देवगड**
प्रोप्रा. प्रभाकर कार्लेकर

४) सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ— प्रजासत्ताकदिन विशेषांक

सुभाष कुलकर्णी, प्रथम वर्ष कला

५) सर्वोत्कृष्ट संपादन—

सतीश कोयंडे, तृतीय वर्ष कला

'रसराज' भित्तिपत्रकाचे रुपांतर आम्ही या वर्षापासून वार्षिकामध्ये करीत आहोत. तत्पूर्वी आम्ही अशा प्रकारचे २ मुद्रित अंक प्रसिद्ध केले आहेत.

| प्राध्यापक-संपादक | विद्यार्थी-संपादक |
|---|---|
| **प्रा. पुरुषोत्तम गोठोसकर** | **सतीश कोयंडे,** |
| **प्रा. अविनाश बि. कांबळे** | **एस्. आर. खान,** |
| **प्रा. लता बळसंगकर** | **सुशील राणे,** |
| | **सदानंद देसाई** |

## ॥ सहल विभाग ॥

सहलीला विद्यार्थीजीवनात एक आगळे महत्त्व असते. पुस्तकी ज्ञानापेक्षा बाहेरच्या जगातले ज्ञान या सहलीतून अनायसे मिळत असते. या वर्षी आम्ही एक दिवसाची गगनबावडा येथे सहल नेली होती. या सहलीचा फायदा ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घेतला. सहलीची व्यवस्था सहल विभागप्रमुख प्रा. मधुकर गावडे व विद्यार्थी-प्रतिनिधी एन्. एस्. शेख या दोघांनी उत्तम ठेवली. त्यांना मोलाची मदत आमच्या महाविद्यालयाचे लिपिक श्रीनिवास पळसुले यांनी केली.

डोंगरदऱ्या व वृक्षवेली यांनी वेढलेले गगनबावडा हे स्थळ आमच्या विद्यार्थ्यांना खूपच आवडले. त्यानिमित्ताने त्यांना निसर्गाशी जवळीक साधता आली. पुढील वर्षी दूरच्या स्थळांना भेटी देण्याचा आमचा मनोदय आहे.

| | |
|---|---|
| सहल विभागप्रमुख, | विद्यार्थी-प्रतिनिधी |
| **प्रा. मधुकर गावडे** | **एन्. एस्. शेख** |

## ॥ राष्ट्रीय सेवा योजना ॥

आमच्या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून 'राष्ट्रीय सेवा योजना' हा विभाग सुरु करण्यात आलेला आहे. ग्रामीण सामाजिक, आर्थिक जीवनाची ओळख व्हावी; नव्हे त्यात काही बदल करावा, हे याचे प्रयोजन! आणि म्हणूनच या वर्षी सुमारे १२० विद्यार्थ्यांनी आपली नावे 'राष्ट्रीय सेवा योजना' मध्ये नोंदवलेली आहेत. अर्थात यामध्ये केवळ वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाच भाग घेता येतो, हे इथे नमूद करणे आवश्यक आहे. या वर्षी १५ ऑगस्ट १९८२ या दिवशी महाविद्यालयाच्या परिसरातील श्रमदानाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

गोवा कर्करोग संस्थेच्या मदतीसाठी निधी जमवण्याच्या उपक्रमामध्ये ५०–६० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. संस्थेसाठी निधी गोळा करीत असतानाच कर्करोगा- (कॅन्सर) बद्दल समाजात निर्माण झालेले गैरसमज दूर करणे, त्या रोगावर काय व कोठे उपाययोजना करता येते याबद्दलची प्राथमिक स्वरूपाची माहिती ग्रामीण लोकांना सांगणे ही कामेही विद्यार्थ्यांनी केली. एकूण ४ हजार रुपयांचा निधी जमवून संस्थेला पाठवून देण्यात आला आहे.

देवगड महाविद्यालयाच्या परिसरात साफसफाई, मैदानाची दुरुस्ती, देवगड प्राथमिक शाळा नं. १ येथील खेळाच्या मैदानावर मातीची भर टाकणे ही कामे श्रमदानाने केली आहेत. नसबंदी शस्त्रक्रिया शिबिराच्या कालावधीत देवगड, शिरगाव, मिठबाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येकी १५ विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले आहे. तसेच देवगड येथील ग्रामीण रुग्णालयात ३० मार्च ८३ पासून ४ दिवस चालू असलेल्या नेत्रशस्त्रक्रिया शिबिरामध्ये आमच्या विभागाच्या वतीने सिद्धार्थ जाधव, निझाम शेख, विजय खवळे व सतीश धुरत या कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले आहे.

## मुंबई विद्यापीठासाठी आमची दर्जेदार पुस्तके

### F. Y. B. Com.

1) A Text Book of Accountancy & Financial Management - M. G. Patkar
2) Accouutancy & Financial Management Solution - M. G. Patkar Rs. 20/-
3) A Text Book of Mathematical Techniques - G. V. Kumbhojkar Rs. 20/-
4) A Text Book of Statistical Techniques - G V. Kumbhojkar Rs. 30/-

### S. Y. B. Com.

1) Accountancy & Financial Management Solution - M. G. Patkar Rs. 14/-

### T. Y. B. Com.

1) Einancial Accounting - M. G. Patkar Rs. 25/-
2) Cost Accounting & Income-Tax - M. G. Patkar Rs. 15/-

वरील पुस्तकांसाठी लिहा :

## फडके बुक सेलर्स,

महाद्वार रोड, कोल्हापूर- ४१६ ००२

(शिवाजी विद्यापीठासाठी लागणारी सर्व पुस्तके पोस्टाने घरपोच पाठवण्याची खास सोय)

## ।। क्रीडा विभाग (जिमखाना) ।।

महाविद्यालयामध्ये देशी व विदेशी खेळांची सोय केली आहे. महाविद्यालयाचे भव्य क्रीडांगण असून त्यात ४०० मीटर धावपट्टी, उड्यांसाठी खड्डे, फेकीसाठी मैदान यांचा समावेश आहे.

मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी–सिंधुदुर्ग विभागीय स्पर्धेसाठी महाविद्यालयाने आपला क्रिकेट संघ सावंतवाडी येथे पाठवला होता. खेळाडूंनी चांगले कौशल्य दाखवले. पण यश मात्र मिळाले नाही. संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रा. भारत भोसले यांनी जबाबदारी पार पाडली.

जिल्हास्तरावर शालेय स्पर्धेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे कबड्डी व खो खो संघ कसाल येथे पाठवले होते. एक-दोन संघावर मात करुन पुढच्या फेरीत संघाने पदार्पण केले. टेबल टेनिसमध्येसुद्धा महाविद्यालयाच्या संघाने भाग घेतला होता. संघव्यवस्थापक म्हणून प्रा. सुरेश सोनटक्के यांनी काम पाहिले.

राज्यपातळीवरील विभागीय जलतरण स्पर्धेसाठी श्री. सतीश धुरत यास कोल्हापूरला पाठवण्यात आले. तत्पूर्वी जिल्हा स्तरावरील स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक पटकावला होता. मार्गदर्शक प्रा. ल. दा. गोलतकर होते.

वर्षभरात आम्ही क्रिकेट, व्हॉलीबॉल व कबड्डीमध्ये मित्रत्वाचे सामने आयोजित केले होते.

दि. ९ व १० फेब्रुवारी ८३ दुसऱ्या दिवशी आम्ही क्रीडा महोत्सवात सुमारे १५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सुमारे ३६ स्पर्धांमध्ये भाग घेतला. क्रीडा महोत्सवाचे ध्वजारोहण व उद्‌घाटन देवगड एस्. टी. डेपोचे मॅनेजर श्री. आर. आर. भागवत यांनी केले. प्राचार्य कुलकर्णी व आमच्या महाविद्यालयातील क्रीडातज्ञ प्रा. गोलतकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी वैयक्तिक विजेतेपद श्री. एस्. व्ही. कणेरकर यास, तर विद्यार्थिनी वैयक्तिक विजेतेपद कु. माधुरी ठाकूर हीस मिळाले; तर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी वैयक्तिक विजेतेपद श्री. राजेंद्र लांबोरे याने पटकावले, तर विद्यार्थिनी वैयक्तिक विजेतेपद कु. पी. एस्. पारकर हीस लाभले. कबड्डी स्पर्धेमध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विजेतेपद कला विभागाने पटकावले, तर कनिष्ठ महाविद्यालयातील विजेतेपद वाणिज्य विभागाने पटकावले. व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विजेतेपद वाणिज्य विभागाने संपादन केले, तर कनिष्ठ महाविद्यालयातील विजेतेपद वाणिज्यच विभागाने संपादन केले. क्रीडा महोत्सवाचे संचालन प्रा. ल. दा. गोलतकर यांनी केले. त्यांना प्राध्यापकवर्ग व कर्मचारीवर्ग यांची मोलाची मदत झाली.

| प्रमुख | विद्यार्थी प्रतिनिधी |
|---|---|
| प्रा. ल. दा. गोलतकर | संजय कदम |

## ।। निवडणूक ।।

दर वर्षी होणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी-प्रतिनिधींच्या निवडणुका म्हणजे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आनंदाची पर्वणीच् ! या निवडणुकांमधूनच विद्यार्थ्यांना लोकशाहीचा आधारस्तंभ असलेली निवडणूक-पद्धत जवळून अभ्यासायला मिळते.

यंदा २८ ऑक्टो. ८२ रोजी वर्गप्रतिनिधींच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकामध्ये अगदी उत्साहाच्या, आनंदाच्या वातावरणात खेळीमेळीने मतदान झाले. लगेच मतमोजणी करुन निकाल जाहीर करण्यात आले, ते पुढीलप्रमाणे :

अकरावी कला– उदय दांडेकर
अकरावी वाणिज्य– सुधाकर कदम
बारावी कला– तुळशीदास धामरी
बारावी वाणिज्य– निजामुद्दीन शेख
प्रथम वर्ष कला– अंकुश आचरेकर
प्रथम वर्ष वाणिज्य– संजय कदम
द्वितीय वर्ष कला– श्रीकांत धुपकर
द्वितीय वर्ष वाणिज्य– अविनाश सावंत
तृतीय वर्ष कला– सतीश कोयंडे
तृतीय वर्ष वाणिज्य– एम्. आर. खान

तसेच विद्यार्थिनींमधून एल्. आर. (विद्यार्थिनी प्रतिनिधी) म्हणून कु. सीमा गावू ही बिनविरोध निवडून

आली. यु. आर. ( विद्यापीठ प्रतिनिधी ) म्हणून एम्. आर. खान हा बिनविरोध निवडून आला. निवडून आलेल्या प्रतिनिधींमधून महाविद्यालयाचे विद्यार्थी महामंडळ तयार करण्यात आले. प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांच्या आवाहनानुसार या महामंडळाची रचना खेळीमेळीच्या वातावरणात करण्यात आली. या प्रसंगी प्रतिनिधींनी दाखवलेला खिलाडूपणा महत्त्वपूर्ण ठरला. विद्यार्थी महामंडळ पुढीलप्रमाणे आहे:

१) जनरल सेक्रेटरी व विद्यापीठ प्रतिनिधी } एम्. आर. खान
२) विद्यार्थिनी प्रतिनिधी (L.R.)– सीमा गानू
३) क्रीडा विभाग (जिमखाना)– संजय कदम
४) स्नेहसंमेलन– श्रीकांत धुपकर
५) 'रसराज' भित्तिपत्र- सतीश कोयंडे
६) सहल– एन्. एस्. शेख
७) वादविवाद मंडळ- तुळशीदास डामरी
८) अभ्यास मंडळ– अंकुश आचरेकर
९) अल्पोपहार– सुधाकर कदम
१०) प्रसिद्धी विभाग– अविनाश सावंत
११) सजावट– उदय दांडेकर

वरील सर्व निवडणुकांचे काम प्रा. अनंत सिरीकर यांनी इतर प्राध्यापकवर्ग व कर्मचारीवर्ग यांच्या सहकार्याने व्यवस्थितपणे पार पाडले. विद्यार्थ्यांनीही त्यांना उत्साहपूर्ण पण शिस्तबद्ध प्रतिसाद दिला.

निवडणूक प्रमुख,
**प्रा. अनंत सिरीकर**

## ॥ इतर ॥

या वेगवेगळ्या विभागांच्या द्वारे आमचे महाविद्यालय प्रगतीचे उपक्रम हाताळत असते. त्याद्वारे होत असलेली प्रगती ही महत्त्वपूर्ण असली, तरी सध्याच्या वातावरणात शैक्षणिक निकाल कसा आहे, याकडेच सर्वांचे लक्ष लागलेले असते. दर वर्षीप्रमाणे याही वर्षी आम्ही उत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे. आमचे काही शैक्षणिक निकाल पुढीलप्रमाणे :

बारावी वाणिज्य– ७३.४७ टक्के
प्रथम वर्ष कला– ८७ टक्के
द्वितीय वर्ष कला– १०० टक्के
तृतीय वर्ष कला– ७०.७ टक्के

या शैक्षणिक निकालाशिवाय आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी बाहेरच्या जगातही यशस्वी होत आहेत. देवगड येथील हनुमान क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या धावण्याच्या स्पर्धेत बारावी कला या वर्गातील राजेंद्र लांबोरे यास नेत्रदीपक यश मिळाले. तसेच, याच मंडळाच्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये सुधाकर पेठे द्वितीय वर्ष कला व दत्तात्रय दातार, बारावी वाणिज्य या आमच्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे पहिला व चौथा क्रमांक पटकावला. मध्यंतरी मुंबईच्या पिगेज क्लासेस वाङ्मय मंडळाने महाराष्ट्र पातळीवर 'कवी अनिलांची काव्यसंपदा' या विषयावर एक निबंधस्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये आमच्या महाविद्यालयातील अलका हर्डीकर, द्वितीय वर्ष कला या विद्यार्थिनीला २०० रुपये रकमेचे तिसरे पारितोषिक मिळाले.

१९८२–८३ या शैक्षणिक वर्षात खालील प्राध्यापकांची उणीव आम्हास जाणवली. ते मागील वर्षी आमच्या महाविद्यालयात होते. पण काही कारणांमुळे ते येथून निघून गेले.

१) प्रा. एस्. जी. कुलकर्णी
२) प्रा. एम्. एस्. चव्हाण
३) प्रा. के. डी. जाधव
४) प्रा. देवदत्त तुंगार
५) प्रा. बाबूराव गायकवाड
६) प्राचार्य गोपाळराव मयेकर

तसेच या चालू शैक्षणिक वर्षात पुढील प्राध्यापकांचे आगमन झाले. त्यांचे स्वागत करण्यास आम्हांस अत्यानंद होत आहे. त्यांची नावे कालानुक्रमाने अशी :

१) प्रा. प्रकाश उपाध्ये,
२) प्रा. अविनाश वि. कांबळे,
३) प्रा. कालिदास जोशी,
४) प्रा. भारत भोसले,
५) प्रा. लता वळसंगकर,
६) प्रा. श्रीकृष्ण बोराटे,
७) प्रा. शाम पाटील,
८) प्राचार्य आर. ए. कुलकर्णी.

महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल हा एकप्रकारचा आरसाच असतो. कारण त्यात महाविद्यालयाच्या रुपाचे बरे-वाईट प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येत असते. म्हणूनच या 'वाटचाली' च्या द्वारे हा आरसा सादर केला आहे.



देवगड कॉलेज

# ॥ पारितोषिके १९८२-८३ ॥

१) कै. काशिबाई शंकर तावडे (पुर्वाश्रमीच्या काशिबाई नलावडे) पारितोषिके

अ) एफ्. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रु. ७०/–

कु. परुळेकर विद्या राजाराम

ब) एफ्. वाय. बी. ए. च्या परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक रु. ७०/–

कु. गांवकर सुरेखा काशिनाथ

२) कै. सौ. यशोदा रघुनाथ शिंडे पारितोषिके–

अ) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/–

कु. राणे नीला रमाकांत

ब) एफ्. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/–

श्री. करंदीकर सुभाष कृष्णाजी

क) एस्. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/–

कु. गोखले आशा मोरेश्वर

ड) टी. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/–

श्री. हरम तुकाराम नारायण

३) सौ. यशोदा रघुनाथ व रघुनाथ सदाशिव शिंडे पारितोषिके

अ) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

कु. माणगांवकर लीना शंकर

ब) एफ्. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

श्री. सावंत अविनाश बाळकृष्ण

क) एस्. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

श्री. खान मोहम्म रफीक रज्जाक

ड) टी. वाय्. बी. कॉम्. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

**४) कै हरी वामन लिमये पारितोषिके–**

अ) बारावी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

कु. राणे नीला रमाकांत

ब) टी. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

श्री. हरम तुकाराम नारायण

**५) कै. लक्ष्मण वामन लिमये पारितोषिके–**

अ) १२ वी आर्टस्च्या परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ३५/–

श्री आचरेकर अंकुश गोविंद

ब) टी. वाय. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ३५/–

श्री. कुलकर्णी प्रदीप मधुकर

**६) कै. मंगेश गणेश कुलकर्णी (पिंगे) वरेरी, पारितोषिक–**

महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास पारीतोषिक रु. ७५/–

**विभागून–**

१) श्री. करंदीकर सुभाष कृष्णाजी.

२) कु. गोखले आशा मोरेश्वर.

**७) कै श्री. सुधीर श्रीपाद झांटये पारितोषिक–**

वाणिज्य शाखेतील शेवटच्या पदवी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ७५/–

श्री. हरम तुकाराम नारायण

**८) डॉ. शांताराम सिताराम शिरसाट पारितोषिके–**

अ) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४५/–

कु राणे नीला रमाकांत

ब) एफ्. वाय. बी. कॉम्. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४५/–

श्री. करंदीकर सुभाष कृष्णाजी.

**९) कै. वामन सिताराम शिरसाट पारितोषिके–**

अ) १२ वी आर्टस्च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४५/–

श्री. आचरेकर अंकुश गोविंद.

ब) एफ्. वाय. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४५/–

कु. गांवकर सुरेखा काशिनाथ

१०) डॉ. भा. वा. आठवले पारितोषिक–

एस्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रू. २०/–

कु. मोंडकर कृत्तिका विष्णु

११) श्री. बाळकृष्ण परशराम उर्फ मामा जोशी पारितोषिके

अ) १२ वीं आर्टस्च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

श्री. आचरेकर अंकुश गोविंद

ब) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४ /–

कु. राणे नीला रमाकांत

क) एफ. वाय. बी. ए. च्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

कु. गांवकर सुरेखा काशिनाथ

ड) एस्. वाय. बी. ए. च्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

कु. मोंडकर कृत्तिका विष्णु

इ) टि. वाय. बी. ए. च्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ५०/–

श्री. कुलकर्णी प्रदीप मधुकर

प) एफ. वाय. बी. कॉम. च्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

श्री. करंदीकर सुभाष कृष्णाजी

फ) एस्. वाय. बी. कॉम. च्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ४०/–

कु. गोखले आशा मोरेश्वर

ब) टि. वाय. बी. कॉम. च्या वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ५०/–

श्री हरम तुकाराम नारायण

११) श्री बाळकृष्ण परशराम उर्फ मामा जोशी पारितोषिके–

अ) १२ वी आर्टस्च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०

श्री परब अनिल पांडुरंग

ब) १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

कु. माणगांवकर लीना शंकर

क) एफ. वाय. बी. ए. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

श्री. पेठे सुधाकर वासुदेव

ड) एस. वाय. बी. ए. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

कु. गुमास्ते अंजली कृष्णराव

ई) टि. वाय. बी. ए. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

श्री गोगटे सुहास श्रीराम

प) एफ. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक २०/–

श्री. सावंत अविनाश बाळकृष्ण

फ) एस. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकानें उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

श्री. खान मोहमंद रफीक रज्जाक

ब) टि. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २०/–

**१२) कै. जानकीबाई रामचंद्र बोडस पारितोषिक—**

टि. वाय. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ११०/–

श्री. कुलकर्णी प्रदीप मधुकर

**१२) ब) कै. रामचंद्र गणेश बोडस पारितोषिक—**

टि. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. ११०/–

श्री. हुरम तुकाराम नारायण

**१३) कै. सौ. लक्ष्मीबाई मुरलीधरराव सोनटक्के पारितोषिक-**

टि. वाय. बी. ए. च्या वर्गात अर्थशास्त्र प्रमुख विषय घेऊन सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु- २५/–

श्री. कुलकर्णी प्रदीप मधुकर

**१४) श्री विठ्ठलराव कांबळ पारितोषिक–**

१२ वी च्या परीक्षेत कला व वाणिज्य या शाखेतून मराठी विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक रु. २५/–

कु राणे विद्या अमृतराव

## ॥ शिष्यवृत्त्या १९८२-८३ ॥

१) कै. दत्तात्रय भास्कर पाटणकर शिष्यवृत्ती रु १५०/-

अ) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वी कॉमर्सच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शिष्यवृत्ती रु. १५०/-

कु. राणे नीला रमाकांत

ब) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एफ. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शिष्यवृत्ती रु. १५०/-

श्री. करंदीकर सुभाष कृष्णाजी

क) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एस्. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शिष्यवृत्ती रु. १५०/-

कु. गोखले आशा मोरेश्वर

२) श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रय पाटणकर शिष्यवृत्ती

अ) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वी आर्टस् च्या परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या मुलीस शिष्यवृत्ती रु. १५०/-

कु. हिंदळेकर वनिता राजाराम

ब) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एफ्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत मुलींमध्ये द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या मुलीस शिष्यवृत्ती रु. १५०/-

कु. हर्डीकर अलका भास्कर

क) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एस्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या मुलीस शिष्यवृत्ती रु. १५०/-

कु. मोंडकर कृत्तिका विष्णु

**(३ कै. नारायण दत्तात्रय पाटणकर शिष्यवृत्ती**

अ) मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वी कलाच्या परीक्षेत सर्वप्रथम आल्याबद्दल शिष्यवृत्ती रु. १५०/–

श्री. आचरेकर अंकुश गोविंद

ब) एफ्. वाय्. बी. ए, च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रु. १५०/–

कु गांवकर सुरेखा काशिनाथ

क) एफ्. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या मुलीस शिष्यवृत्ती रु. १५०/–

कु. परुळेकर विद्या राजाराम

## ।। पारितोषिके ।।

**१) कै. दत्तात्रय भास्कर पाटणकर, श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रय पाटणकर व कै. नारायण दत्तात्रय पाटणकर पारितोषिके–**

अ) एफ्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत मराठी या विषयात सर्व विद्यार्थ्यांत जास्त गुण मिळविल्याबद्दल पारितोषिके रु. २५/– प्रत्येकी.

कु. गानू चित्रा जगन्नाथ

कु. बापट अलका श्रीधर

ब) एफ्. वाय्. बी. ए. च्या परीक्षेत इंग्रजी विषयात सर्व विद्यार्थ्यांत जास्त गुण मिळविल्याबद्दल पारितोषिक रु. २५/–

श्री. पेठे सुधाकर वासुदेव

क) एस्. वाय. बी. ए. च्या परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात सर्व विद्यार्थ्यांत जास्त गुण मिळविल्याबद्दल पारितोषिक रु. २५/-

कु मोंडकर कृत्तिका विष्णु

ड) एफ्. वाय. बी. कॉम. च्या परीक्षेत इंग्रजी या विषयात सर्व विद्यार्थ्यांत जास्त गुण मिळविल्याबद्दल पारितोषिक रु. २५/-

श्री. सावंत अविनाश बाळकृष्ण


इ) एफ्. वाय्. बी. कॉम. च्या परीक्षेत Statistics या विषयात सर्व विद्यार्थ्यांत जास्त गुण मिळविल्याबद्दल पारितोषिक रु. २५/–

श्री. गोगटे बाळकृष्ण केशव

# ।। आमच्या महाविद्यालयाला लाभलेले कर्ण ।।



कै. जगन्नाथ तथा भाऊ पारकर



श्रीमती निराबाई जगन्नाथ पारकर

ईश्वरी प्रेरणेने स्थापन झालेल्या देवगड महाविद्यालयाला सुरवातीसच शुभशकुन झाला तो श्रीमती निराबाई जगन्नाथ पारकर आणि कै. जगन्नाथ भाऊ पारकर यांनी महाविद्यालयाच्या इमारतीसाठी विनाअट दिलेल्या २३ एकर जमिनीच्या दानाचा! त्याप्रित्यर्थ महाविद्यालयाच्या परिसराचे नांव "श्रीमती निराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी" असे करण्यात येणार आहे.



मे. एस्. एच्. केळकर आणि कंपनी लि. चे संचालक श्री. गोविंद दामोदर ऊर्फ भाऊसाहेब केळकर यांनी कै. दादासाहेब केळकरांच्या नावाने संस्थेस १,५०,००१ रुपयांची बहुमोल देणगी दिली. त्याप्रित्यर्थ देवगड महाविद्यालयाचे नांव "सदाशिव हरी केळकर महाविद्यालय" असे करण्यांत येणार आहे.

कै. सदाशिव हरी ऊर्फ दादासाहेब केळकर

।। श्री लक्ष्मी नारायण बालावधूत प्रसन्न ।।

'रसराज'ला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

दक्षिण महाराष्ट्राचा गौरवशाली वस्त्रमहाल

धर्मादाय संस्थेचे प्रमुख वस्त्रकेंद्र

ॐ श्री लक्ष्मीनारायण बालमुकुंद

# शां. कृ. पंतवालावलकर कापड दुकान ट्रस्ट

लक्ष्मीरोड, कोल्हापूर - ४१६००२

आमची वैशिष्टये :

- नामांकित मिल्स्चे दर्जेदार कापड
- विनम्र सेवा
- बाजारभावापेक्षां १० ते १५ टक्के कमी दर

दूरध्वनी : २६१८९  तार : लक्ष्मीकृपा